

# कामसूत्र

मूळ लेखक वात्स्यायन

अनुवाद सुनील सामंत

खजुराहो शिल्पचित्र हर्षज पाटकर



# कामसूत्र

www.esahity.com



# कामसूत्र

मूळ लेखक :वात्स्यायन

अनुवाद : सुनील सामंत

खजुराहो छायाचित्रे : हर्षज पाटकर

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

# कामसूत्र

मूळ लेखक : वात्स्यायन

अनुवाद : सुनील सामंत

**Sunil.samant.g@gmail.com**

या अनुवादाचे सर्व हक्क अनुवादकाच्या स्वाधीन आहेत.

खजुराहो छायाचित्रे : हर्षज पाटकर

**harshaj.patkar@gmail.com**

**iraharsh@gmail.com**

www.touchthroughlens.com

https://www.facebook.com/Touchthroughlens

या पुस्तकातील सर्व चित्रांचे हक्क श्री हर्षज पाटकर यांचेकडे असून त्यांचा कोठेही वापर करण्यापुर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन : ३१ डिसेंबर २०१६

## घाबरू नका! या पुस्तकात काहीही अश्लील वगैरे नाहीये.

आणि हा विषय तर...

सजीवांच्या दोन मूल गरजा असतात. एक जिवंत रहाणं. दुसरं आपला वंश टिकवणं. जगण्यासाठी अन्न लागतं. गाई गुरं गवत पाला खाऊन पोट भरतात. मांसाहारी प्राणी इतर प्राण्यांना मारून कच्चं खातात. हे सगळेच प्राणी जे जसं आणि जेव्हा मिळेल तेव्हा खातात. पण माणसाचं तसं नाही. त्याला जेवण चमचमीत लागतं. मसालेदार लागतं. व्हरायटी लागते. अन्न ही आवश्यक गोष्ट तर आहेच. पण ती आनंददायी पण आहे. जीभ ही पचनासाठी आवश्यक आहेच. पण तिचे स्वतःचे म्हणून बरेच चोचले आहेत. एवढंच नव्हे तर त्याला श्वासोछ्वास करण्यासाठी जी हवा लागते ती सुद्धा चांगली, शक्यतो निर्मळच हवी असते. इतर किड्या मुंग्यांसारखं मिळेल त्या जागी तो (मनापासून) रहायला तयार नसतो.

पुनरुत्पादनाचंही तसंच आहे. पुनरुत्पादन ही आवश्यक कष्टाची गोष्ट आहेच. पण हे कष्ट आनंददायी असतात. आणि त्यात अधिकाधिक आनंद हवा असेल तर त्यासाठी त्यात सौंदर्यासक्ती यायला हवी. जसे अन्नग्रहणाच्या वेळी आपण “ उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म” असे म्हणून ते आनंदमय करतो तसेच मैथुनही केवळ वासनेचा क्षणिक उद्रेक न होता तो एक आनंदमय सोहळा व्हावा असं माणसाला वाटतं. स्त्री आणि पुरुष दोघांनाही.

ही गरज काही हजार वर्षांपुर्वी आपल्या भारतातल्या (काही) लोकांनी ओळखली आणि काही विद्वान ऋषी मुनींनी कामसूत्र लिहीलं.

पण कामसूत्र फ़ारसं वाचलं जात नाही (असं मला पुर्वी वाटत असे, आता तो समज खोटा ठरला). निदान उघड उघड तरी वाचलं जात नाही. सभ्य घरात कामसूत्राची कॉपी (रामायण, गीता किंवा इतर पुस्तकांप्रमाणे) दर्शनी भागात ठेवण्याची प्रथा नाही. मात्र आम्ही ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े कामसूत्राचा पहिला भाग भाषांतर करून पोस्ट केल्यावर त्यावर वाचकांच्या अक्षरशः उड्या पडल्या. पहिल्या महिन्यातच मोबाईल ऍपवर पाच लाख डाऊनलोड झाले. कारण मोबाईलवर जेवढी प्रायव्हसी मिळते तेवढी घरात नसते. म्हणजे लोकांना कामसूत्राचं आकर्षण आहे. पण आपण कामसूत्र वाचतो हे लोकांना दिसायला नको आहे. हा संभावितपणा इतका सार्वत्रिक आहे की त्यात कोणी कोणाला दोष द्यायला जागाच नाही.

धर्म, अर्थ आणि काम हे आयुष्याचे तीन आधारस्तंभ आहेत. (चवथा मोक्ष, हा आयुष्यानंतरचा). यांतलं धर्मशास्त्र सगळ्यांकडून अभ्यासलं जात नसलं तरी बऱ्यापैकी चर्चेला येतं. निदान आपल्या संतांनी लिहून ठेवलेले धार्मिक, अध्यात्मिक विचार तरी आपण वाचतोच. ऐकतो. त्यांचे अभंग भीमसेन जोशी, लता मंगेशकर असे लोक गातात आणि आपण ते ऐकतो. अर्थशास्त्राचे तर पंडितच असतात. आपण कॉलेजात जाऊन शिकतो. टिव्हीवर चर्चा होतात. मग कामशास्त्राचा अभ्यास तरी लपूनछपून का करावा? कामसूत्राचं भाषांतर करायला खरं तर गदिमा, पाडगांवकर, ग्रेस, संदिप खरेंसारखे रसिक शब्दप्रभूच हवेत. हे काव्य आहे. त्याला रसरशीत कवितेसारखं हळूवार उलगडायला हवं. एकेक शब्द रसिकतेने कल्पनाविलासाच्या पाकात घोळवून अलंकारांच्या तुपात तळून शब्दमाणकांनी सजवलेल्या कनकाच्या नक्षीदार ताटात पेश करायला हवा. कामसूत्र पुस्तक रेशमी गुलाबी पाकळ्यांनी सजवून सॅटिनच्या मृदू तलम झिरझिरीत कव्हरसह हळूवारपणे पेश केलं जावं. आणि उघडणाऱ्याने (किंवा उघडणारीने)

आपल्या थरथरत्या हळुवार बोटांनी आणि धडधडत्या हृदयानिशी त्या अक्षरांवरून नजर फ़िरवतानाच एका सप्तस्वर्गीय आनंदाच्या लाटेवर स्वार व्हावं. हे पुस्तक जमिनीवर पाय ठेवून वाचू नये (दोन्हीही अर्थांनी). आणि बुद्धी तर गहाणच ठेवावी.

**ईश्कपर जोर नहीं है ये वो आतिश गालिब**

**जो लगाये न लगे और बुझाये न बने...**

असं मानून त्या आगीच्या लवलवत्या तलम ज्वाळेत ज्याला किंवा जिला पोळून घ्यायची तीव्र इच्छा आहे त्यांच्यासाठी हे पुस्तक आहे.

मित्रहो. मी गदिमा, पाडगांवकर, ग्रेस, संदिप यांच्या नखाच्या पासंगाला पुरणाराही नाही. पण जमेल तशा मोडक्या तोडक्या भाषेत मी वात्स्यायन मुनींच्या स्वर्गीय शब्दकळेचा अमृतवाणी मराठीत अनुवाद करायचा एक अल्पसा प्रयत्न केला आहे. आजवर दशलक्ष लोकांनी त्याची (गुपचुप) सराहना केली. म्हणून पुन्हा पुढचा काही भाग अंतर्भूत करून हे तुमच्या भॆटीला आणलंय. गोड मानून घ्या. तसं तर प्रत्येकच पुस्तक हे आयुष्याला आकार देणारं असतं. पण हे पुस्तक तुमच्या आयुष्यात आनंदाची अलिबाबाची गुहा उघडून देईल अशी आशा आहे.

धन्यवाद

सुनील सामंत

**(तुलसीविवाह २०१५)**

## पहिल्या आवृत्तीच्या वेळचे प्रकाशकाचे दोन शब्द

**शुभ मंगल सावधान !**

कामसूत्राचं मराठी भाषांतर करून तुमच्या हाती ठेवताना आनंद तर होत आहेच पण भिती सुद्धा वाटत आहे. हल्ली झालंय काय की प्रकाशन करताना वाचण्यापेक्षा वाद कसा घालता येईल यावरच लोकांचं जास्त लक्ष असतं. शिवाजी महाराजांवर किंवा संभाजी महाराजांवर पुस्तक प्रकाशित करतानाही अशाच वाद घालणाऱ्या लोकांकडून खूप शिव्या खाव्या लागल्या होत्या. पण चालतंय. “जो डर गया समझो मर गया” असं संत गब्बरसींगांनी सांगितल्यापासून आम्ही लोक डरण्याच्या सोडून करण्याच्या मागे लागलोय.

पण कामसूत्राची गोष्ट वेगळी. थोडी भिती वाटतेच. एक तर हा चार चौघात बोलायचा विषय नाही. त्यातून गेल्या वर्षी ज्ञानेश्वरीवर एवढी मोठी कॅंपेन केल्यापासून लोकांना ई साहित्य प्रतिष्ठान म्हणजे कोणी सत्संगी लोक वगैरे वाटतात. त्यामुळे लेखक सुद्धा तशाच विषयांची पुस्तकं पाठवतात. आणि वाचकसुद्धा तशाच पुस्तकांची अपेक्षा ठेवतात. त्यामुळे एकदम कामसूत्र प्रकाशित करणं म्हणजे मशिदीसमोर बार उघडण्यासारखंच आहे. म्हणून थोडे दोन शब्द सुरुवातीलाच मांडणं गरजेचं वाटलं.

ज्ञानेश्वरी (श्री विजय पांढरे यांची २१व्या शतकातील मराठी भाषेत लिहिलेली ज्ञानेश्वरी) वाचकांना देताना आमची एक भुमिका होती. बहुतांशी असा समज आहे की ज्ञानेश्वरी, गीता वगैरे हे रिटायरमेंट नंतरचं वाचन. सगळं करून भागल्यावर करायचं काम. आम्हां मंडळींचा याच गोष्टीला आक्षेप होता (आणि आहे). गीता आणि ज्ञानेश्वरी हे धार्मिक ग्रंथ कमी आणि कार्मिक ग्रंथ अधिक आहेत. इंजिनियरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट यांसारखं ते एक आयुष्याचं नियोजन करण्याचं तंत्र आहे. आणि ही पुस्तकं थकल्या भागल्यानंतर वाचून जितका फ़ायदा होईल त्याहून कितीतरी पट अधिक फ़ायदा जोशे जवानीमध्ये वाचून होईल. त्यामुळे सर्व बाल व तरुणांनी ज्ञानेश्वरी वाचावी असा आमचा आग्रह आहे.

अगदी तसाच आणि तेवढाच आग्रह आता आम्ही कामसूत्रांबाबत करत आहोत. हे पुस्तक पौगंडावस्था ओलांडलेल्या तरुणांनी वाचावं आणि त्यातलं जेवढं घेता येईल तेवढं घ्यावं. कारण आयुष्य सफ़ल करण्यासाठी धर्म, अर्थ आणि काम हे तिन्ही व्यवस्थित निभावले पाहिजेत. तरच खरं आयुष्य जगलं असं म्हणता येईल. आणि हे तिन्ही निभावताना सामाजिक नियमांचं , जबाबदारीचं पालन केलं पाहिजे तर माणूस म्हणवून घेता येईल. धर्मपालन करायचं म्हणजे आजच्या सामाजिक नियमांत बसेल अशीच वागणूक असायला हवी. जुने धार्मिक नियम आताच्या काळात जसेच्यातसे पाळून कसे चालेल? अर्थार्जन करताना समाजात लूटपाट माजवणं होता कामा नये. तसंच कामाचंही. कामभावनेच्या आहारी जाऊन असभ्य वा अनैतिक वर्तन करता कामा नये. कामसूत्र हे ब्रह्मदेवांनी सांगीतलेल्या उपदेशानुसारच आहे. त्यातली फ़क्त आसनं वाचणं (आणि त्यांची चित्रं किंवा सिनेमा बघणं) म्हणजे अर्धवट ज्ञान आहे. कामशास्त्रांत काय (आणि कसं) करावं याच बरोबर काय करू नये तेही सांगितलं आहे याचं भान ठेवायला हवं.

योगाभ्यास करताना मला योगगुरू श्री निकम गुरुजींचं मार्गदर्शन लाभलं. त्यांचा नुसती योगासनं करण्याला विरोध होता. त्यांच्यामते आहार, विहार, आचार आणि विचार या सार्‍यांमध्ये सदोदित चौविस तास योग आचरला पाहिजे. तरच तो योग. नाहीतर योगासनं म्हणजे केवळ एक व्यायामाचा प्रकार होऊन राहील. कामशास्त्र हे त्या अर्थाने योगासारखंच आहे.

पण धर्म आणि अर्थशास्त्राचा जसा जाहीर अभ्यास आणि चर्चा होते तसं कामशास्त्राचं होत नाही. त्यामुळे होतं काय की कुतुहल बळावतं. जो जे सांगेल त्यावर विश्वास बसतो. खुळचट समज पसरतात. अशास्त्रीय माहिती माजते.

आता इथेच हेही सांगून टाकायला हवं की कामसूत्र म्हणजे १००% शास्त्रीय पुस्तक नव्हे. हजारो वर्षांपूर्वी लिहीलेलं हे पुस्तक आताच्या समाजशास्त्रीय आणि शरीरशास्त्रीय ज्ञानाच्या कसोटीवर पूर्णतः कसं टिकणार? त्यामुळे हे पुस्तक वाचताना स्वतःची विवेकबुद्धी जागृत ठेवावी. आणि या विषयावरची नवीन शास्त्रीय पुस्तकं वाचावीत असा आग्रह आम्ही धरू. जमल्यास आम्हीच ती पुढेमागे प्रसिद्धही करू. पण तोवर हे पुस्तक काही प्रमाणात तरी वाचकांना उपयोगी पडेल अशी आशा आहे.

कामसूत्र वाचताना त्याचा काळ आणि त्याकाळातील समाज यांचा विसर पडू देऊ नये. उच्चवर्णीय आणि पुरूषप्रधान संस्कृतीतून हे पुस्तक जन्माला आलेलं आहे. त्यामुळे त्यातील जाती विषयक आणि स्त्रीविषयक अनेक विचार हे आता कालबाह्य झालेले आहेत. उदाहरणार्थ कामसूत्रात असं म्हट्लं आहे की “एखाद्या पुरुषाने आपल्या स्त्रीला भ्रष्ट केलं तर त्याच्या पत्नीशी संग करणं हे अनैतिक नाही”. पण हे अयोग्य आहे. प्रस्तुत अनुवादक व प्रकाशक या विचारांना अजिबात मानत नाहीत. त्याचबरोबर दारू वा अन्य अंमली पदार्थांच्या सेवनाबद्दलचे उल्लेख केवळ गंमत म्हणून

वाचावेत. त्यांच्यावर अजिबात अंमल करू नये. दारू आरोग्यास घातक असते. हे पुस्तक वाचताना आपले संस्कार, सारासार बुद्धी, सामाजिक जबाबदारी शाबूत ठेवावेत. या पुस्तकातील अनेक गोष्टी, मते व उपदेश चुकीचे आहेत असेच अनुवादक आणि प्रकाशक यांचे मत आहे. मात्र त्या काळातील विचार कसे होते हे या कारणाने लक्षात यायला मदत होईल. म्हणून हे पुस्तक रेफ़रंस म्हणून वाचावे.

दुसरं म्हणजे कामसूत्राचं मूळ पुस्तक कोणतं यांवर वाद आहेत. मुळात वात्स्यायन नावाचा एकच मुनी होता का असाही वादाचा मुद्दा आहे. पुर्वीच्या काळी छपाई नसल्याने कोणत्याही पुस्तकाचे विविध भागांत वेगवेगळे रूप असे. १८५३ च्या दरम्याने रिचर्ड बर्टन या ब्रिटिश सैनिकाने पुणे आणि वाराणसी येथे मराठी आणि संस्कृतचा अभ्यास करून वात्स्यायनाच्या मूळ पुस्तकांची अनेक रूपं जमा केली आणि त्यांचं भाषांतर केलं. आजकाल त्याच ग्रंथाला प्रमाण मानलं जातं. प्रस्तुत पुस्तकात मूळ संस्कृत पुस्तकाबरोबरच रिचर्ड बर्टनच्या अनुवादाचा वापर केला आहे. अर्थात वादाला जागा आहेच. ते चालायचंच.

तिसराही एक इशारा आताच देऊन ठेवलेला बरा. कामसूत्र म्हणजे काहीतरी चमचमीत नॉनव्हेज वाचायला मिळणार म्हणून जिभल्या चाटत हे पुस्तक उघडणाऱ्यांची निराशा होण्याची शक्यता आहे. हा विषय अर्थशास्त्राइतकाच गंभीर आहे आणि तो या पुस्तकात तसाच हाताळलेला आहे. आणि ओढून ताणून तो मनोरंजक करण्याचा प्रयत्न कुठेही केलेला नाही.

एकतर हा सनातन विषय आणि त्याची व्याप्ती वैश्विक. त्यामुळे जो तो स्वतःला पंडित समजतो. पण ते खाजगीत. बाहेर मात्र प्रत्येकजण या विषयात स्वतः अनाडीच असल्याचे भासवतो.

एक खूप सुंदर गाणं आहे.

बडे अच्छे लगते हैं

ये धरती, ये नदीयां, ये रैना.....

त्यातली ती हिरॉईन प्रत्येक वेळी विचारते ... और..?

आणि हिरो सांगतो : और तुम. ते ऐकून हिरॉईन खुश होते.

काहींना हा बावळटपणा वाटतो. काय हे! एकदा सांगितलं तर कळत नाही का? पण...

जोडीदाराला मात्र हे प्रत्येक वेळी नवीन वाटतं...

म्हणूनच तर कामशास्त्र, मानसशास्त्र ही सर्वात गूढ शास्त्र आहेत... ती नीट समजून घेतली तरच आयुष्याचं सोनं होतंय. स्वतःच्या आणि जोडीदाराच्या. आणि पर्यायाने समाजाच्याही.

सुनील सामंत

वसंतपंचमी २०१४

www.esahity.com

# ख
# जु
# रा
# हो



ww

खजुराहो मंदिरं : मूळ नांव

वय : एक हजार ते बाराशे वर्षं

उंची : दहामजली इमारती एवढी

शिल्पांची संख्या : हजारो

...near (Khajuraho) temples, which contain idols that have been mutilated by the Moslems, live a number of yogis whose matted locks have grown as long as their bodies. And on account of extreme asceticism they are all yellow in colour. Many Moslems attend these men in order to take lessons (yoga) from them.

— *Ibn Battuta*, 14th Century, Moroccan Traveller

खजुराहो मंदिरांची गणती जगातील आश्चर्यांमध्ये व्हायला काही हरकत नसावी. मानवी मनाच्या खोल भुयारात दडलेल्या भावभावनांची इतकी सौंदर्यपूर्ण मूर्त दखल जगात क्वचितच कुठे घेतली गेली असेल. विशेषतः त्यातील अप्सरा आणि यक्षांची शिल्पं. त्या काळातील संस्कृत साहित्यात सर्रास वापरल्या जाणाऱ्या मैथुन प्रतिमांचा वापर या शिल्पांमध्ये अगदी सहजपणे केलेला आहे. त्यात कुठेही बिभत्सपणा नाही, ढोबळपणा नाही. अतिशय नजाकत, नेमकेपण, सौंदर्य हे या मुर्त्यांचे वैशिष्ट्य आहे. चेहऱ्यावरच्या कोमल भाव भावना, वस्त्रंच्या बारिकसारिक चुण्या, अलंकारांची गुंफ़ण, केशरचना सर्व छोट्या छोट्या डिटेल्सनी ही शिल्पं जिवंत होतात. टाचेत रुतलेला काटा काढणारी अप्सरा असो वा स्वतःचेच वक्षस्थळ कुरवाळणारी रंभा असो. ऋषींचे आडवे येणारे हात भिंतीला दाबून त्यांचे चुंबन घेणारी मेनका असो वा लिंगाशी क्रिडा करणारी ऊर्वशी. त्यांची कमनीयता, त्यांची उत्कट आणि

विलोभनीय मुद्रा, त्यांच्या हातांची नखं, त्यांच्या पायांच्या पोटऱ्या, अगदी वस्त्रांची मेखला सोडवतानाची हातांच्या बोटांची मुद्रा इतके आणि असे बारकावे ठायी ठायी जाणवतात की थक्क व्हायला होते. या मूर्त्या कोरणारे कलाकार किती प्रतिभावान असतील!

आणि हे कुठे, तर सामान्य माणसाची नजर पोचणार नाही अशा उंचीवर. इतक्या उंच कोण पहायला येणार म्हणून कसेतरी उरकून घ्यावे ही वृत्ती या कलाकारांकडे नाही. अगदी शंभर फ़ूट उंचावर असलेल्या शिल्पातील फुलांच्या पाकळ्या तितक्याच मन लावून कोरलेल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक मुर्ती उठावदार, सुबक, नक्षीदार झाली आहे.  मुखपृष्ठावरचे चित्र पुन्हा एकदा निरखून पहा. त्यात मदन रती एकमेकांच्या डोळ्यांत हरवलेले, चुंबनाला अधीर, आलिंगन बद्ध. तर दाराआडची दासी लाजेने चूर चूर झालेली आहे. तिला ते पहाताना सुख मिळते आहे पण लाजही वाटते. म्हणून तिने डोळ्यांवर हात तर धरला पण बोटांमध्ये फ़ट ठेवून ती पहात आहे. रतीसुखात मग्न असणाऱ्या स्त्रीपुरुषांचे हात, पाय, आणि आजूबाजूच्या वस्तू, प्राणी, पक्षी, मुलं , दास दासी, खिडकी, फ़ुलं, हे सर्व अगदी प्रमाणबद्ध रितीने आकाराला आणणाऱ्या या कलाकारांना साष्टांग नमस्कारच.
एका ठिकाणी एकाचवेळी पलंगावर तीन स्त्रियांशी रतीक्रिडा करणाऱ्या पुरुषाचे हात, पाय मुख तर पहाच, पण तो पलंग आणि त्यावरची चादरही किती सुरेख नेमकी  आकाराल आणली आहे. (p 46) . प्रत्येक शिल्पातील वस्त्रांच्या चुण्या, अलंकारांचे मणी, दागीन्यांची कुसर सुद्धा पाहून घ्यावी अशी. प्रत्येक मुर्तीची प्रमाणबद्धता, गोलाई, सफ़ाई आणि परस्परांशी मेळ. या सर्व शिल्पांतून आकाराला येणारी भव्यता आणि प्रासादिक वास्तुरचना. सारेच अचंबित करणारे. ऑस्ट्रेलियातील प्रख्यात छायाचित्रकार श्री हर्षज पाटकर यांनी अतिशय नेमकेपणी आणि चोखंदळ वृत्तीने या शिल्पांना चित्रबद्ध केले आहे. या पुस्तकाहून कितीतरी अधिक त्यांच्या वेबसाईटवर(www.touchthroughlens.com ) आपल्याला पहायला मिळेल.


कामसूत्राच्या सोबतच खजुराहो जोडण्याचे कारणही आता सांगतो. भारतात मधल्या काळात हे सर्व विषय त्याज्य झाले. त्याला काही अंशी नंतरच्या काळात आलेल्या इस्लामी सत्ता, नंतरचा एलिझाबेथ काळातील मॉरल कल्पनांचा प्रभाव आणि स्वातंत्र्यचळवळीत आलेले त्याग आणि ऐहिक सुखांबद्दलची पराकाष्ठेची नकारात्मकता यांच्यामुळे आपल्या संस्कृत साहित्यातली सौंदर्यस्थळे आणि आपल्या कलांमधील मोकळेपण हे झाकोळले गेले. हे सर्व आपल्याकडे होते. यात काही पाश्चात्य वगैरे नाही. भारतीय संस्कृती जगाच्या दहा पावले नाही तर दहा मैल पुढे होती. सर्वच बाबतीत. त्यातला ढोंगीपणा आणि संभावितपणा थोडा बाजूला सारा. मग जीवनातील आनंदाचे क्षण तुम्हाला ठायी ठायी जाणवतील.

त्यासाठी मुद्दाम खजुराहोला जाण्याची गरज नाही. आणि कामसूत्र सुद्धा वाचण्याची गरज नाही.



# का म सू त्र

www.esahity.com


© Harshaj Patkar

## विभाग पहिला

### प्रस्तावना

वात्स्यायनमुनी

ॐ धर्माय नमः

ॐ अर्थाय नमः

ॐ कामाय नम:

सृष्टीचा रचयिता ब्रह्मदेव याने विश्वाची निर्मिती करताना स्त्री आणि पुरुषाची निर्मिती केली. त्यावेळी त्याने एक लक्ष  श्लोकांच्या स्वरुपात जीवनाचे नियम सांगितले. हे नियम तीन स्वरूपाचे होते : धर्म, अर्थ आणि काम. धर्माबाबतचे नियम स्वयंभू मनूने लिहून काढले आणि मनुस्मृतीचा जन्म

झाला. अर्थाबद्दलचे नियम खुद्द बृहस्पतीने लिहून काढले आणि त्याचे अर्थशास्त्र झाले. काम नियमांचे ग्रहण शंकराचे वाहन नंदी याने केले आणि लिहीले. त्याचे एक हजार श्लोक बनले.

कामसूत्राचे हे हजार श्लोक उद्दलकाचा पुत्र श्वेतकेतू याने ग्रहण केले आणि पाचशे श्लोकांच्या नव्या संक्षिप्त रुपात सादर केले. बभ्रव्य ऋषींनी याच श्लोकांचे पुन्हा एकदा संक्षेपी रूप केले आणि दिडशे श्लोकांतून त्याचा परिचय जगाला करून दिला. बभ्रव्य हरयाणातील पुंचला येथील होते. नंतर या दिडशे श्लोकांचे विवेचन होत होत सात खंड झाले…

1. साधारण
2. संप्रयोगिका (आलिंगन, चुंबन इत्यादी)
3. कन्या संप्रयुक्ता ( स्त्री पुरुषांचे मिलन)
4. भार्याद्वारिका ( स्वस्त्री बद्दल)
5. परदिका ( परस्त्रीबद्दल)
6. वैशिका ( वेश्यांबद्दल)
7. औपमिषदिका ( वशीकरण , शक्तीवर्धक द्रव्यं इत्यादी)

या सातही भागांचे लेखक वेगवेगळे आहेत.

यातला सहावा भाग हा नंतरपाटलीपुत्र नगरीच्या वेश्यांच्या आग्रहाखातर दत्तक मुनींनी प्रक्षेपित केलेला म्हणजे घुसडलेला आहे. मूळ संहितेत तो नव्हता.

पहिला भाग : चरायन ऋषी

दुसरा भाग : सुवर्णाभ मुनी

तिसरा भाग : घोटकमुख मुनी

चवथा भाग : गोनर्दीय मुनी

पाचवा भाग : गणिकापुत्र मुनी

सहावा भाग : दत्तक मुनी

सातवा भाग : सुकुमार मुनी

अशा प्रकारे कामशास्त्राचे वेगवेगळे तुकडे विखुरले गेले. वेगवेगळ्या लेखकांनी कामशास्त्राच्या वेगवेगळ्या अंगांवर भर दिला. उदाहरणार्थ: दत्तकाने ज्या भागाला (वैशिका) विशेष महत्त्व दिले त्याचाच प्रभाव त्या आवृत्तीत दिसून आला. बभ्रव्याचे जे लिखाण होते ते त्याच्या लांबीमुळे पाठांतराला कठीण असल्याने पुढील पिढ्यांमध्ये हळू हळू दुर्मिळ होऊ लागले ( इथे हे लक्षात घेतले पाहिजे की त्या काळी छपाई आणि पुस्तके नसल्यामुळे सर्व प्रसार हा मौखिक म्हणजे तोंडी असे. अशा मौखिक प्रसारात पुस्तकाची लांबी हा एक अडसर असे) या पार्श्वभूमीवर वात्स्यायनमुनींनी या सात

वेगवेगळ्या विद्वानांचे साहित्य एकत्रित करून त्यांचे योग्य ते उल्लेख करून कामसूत्र लिहीले.  या कामी त्यांनी भरपूर कष्ट घेतले. त्यांनी लिहिलेले भाग या पुढील पानांत आपण वाचणार आहात.



## भाग पहिला : विषयप्रवेश

प्रस्तावना :

धर्म , अर्थ आणि काम यांची प्राप्ती

चौसष्ट कलांचा अभ्यास

गृहरचना,

गृहसाहित्याची रचना,

मनुष्याचा दिनक्रम,

त्याचे सहकारी, मनोरंजन इत्यादी.

स्त्रीयांचे वर्गीकरण,

कुलवंतांचे आचरण,

मित्रपरिवार

दूत.



## विभाग दुसरा : स्त्री पुरुष समागम (संप्रयोगिका)

शरीररचनेनुसार मिलन, इच्छाशक्तीचा आवेग, योग्य व अयोग्य काळवेळ, प्रेमाचे प्रकार

आलिंगनाविषयी

चुंबनचिकित्सा

दाबणे आणि नखांनी ओरखडे काढण्याबद्दल

चावणे आणि देशोदेशीच्या स्त्रियांचे रतीसुखाचे मार्ग

शयनाचे आणि संगमाचे प्रकार

आघात आणि त्यातून उत्पन्न होणारे ध्वनी

पुरुषी स्त्रियांबद्दल

मुखामध्ये लिंग धरण्याबद्दल

संगमाचा आरंभ आणि अंत ,

संगमाचे विविध प्रकार

रुसवे फुगवे

## विभाग तिसरा : विवाहविषयक ( कन्या संप्रयुक्ता)



विवाहबंधन आणि विवाहविधी

स्त्रीच्या मनात विश्वास निर्माण कसा करावा

प्रियाराधन

मनीचा भाव हावभावातून व्यक्त करण्याबद्दल (शारीर भाषा किंवा बॉडी लॅंग्वेज)

स्त्रीप्राप्तीसाठी पुरुषाने करायचे प्रयत्न .

पुरुषाला वश करण्यासाठी स्त्रीने करायच्या गोष्टी

विवाहांचे प्रकार



## विभाग चवथा : पत्नीविषयक (भार्याद्वारिका)

धर्माचरणी स्त्रीचे वर्तन आणि पतीच्या अपरोक्ष तिचे वागणे

ज्येष्ठ पत्नीने आपल्या सवतींशी कसे वागावे.

कनिष्ठ पत्नीने आपल्या ज्येष्ठ सवतींशी कसे वागावे.

कुमारिका विधवेच्या पुनर्विवाहाबद्दल.

नावडत्या पत्नीविषयी,

राजाच्या जनानखान्यातील स्त्रियांबद्दल

अनेक पत्नी असणाऱ्या पतीबद्दल.



## विभाग पाचवा : परस्त्री बद्दल (परदिका)

पुरुष आणि स्त्रियांच्या गुणविशेषांबद्दल.

स्त्रिया पुरुषांचे प्रस्ताव कधी व का धुडकावतात.

स्त्रियांना वश करणाऱ्या पुरुषांचे गुणविशेष.

सहज वश होणाऱ्या स्त्रिया कोणत्या.

स्त्रीशी ओळख आणि वशीकरणाचे प्रयोग.

स्त्रीचे मानसशास्त्र

दूत

उच्च अधिकारी व्यक्तीने परस्त्रीशी संबंध ठेवण्याबद्दल

राजाचा जनानखाना

स्वतःच्या पत्नीचे राजा व राजकीय लोकांपासून रक्षण

## विभाग सहावा : गणिका व वेश्यांबद्दल (वैशिका)

अंगवस्त्र व गणिकावृत्ती

स्त्रीने पुरुषाचे अंगवस्त्र म्हणून रहाण्याची कारणे,

आपल्या मनाजोगता पुरुष धनी कसा मिळवावा, आणि त्याची ओळख कशी करावी.

पत्नीप्रमाणे एकनिष्ठ रहाणाऱ्या वेश्या

पैसे मिळवण्याचे मार्ग,

प्रियकराला कंटाळा आल्याचे संकेत,

त्याच्यापासून सुटका करून घेण्याचे मार्ग

जुन्या प्रियकराशी पुनः संबंध जुळवण्याबद्दल

विविध प्रकारचे फ़ायदे

वेश्या व्यवसायाचे फ़ायदे आणि तोटे यांबद्दल,

मध्यस्थ होण्याचे फ़ायदे तोटे,

शंकाकुशंका,

वेश्यांचे प्रकार

## विभाग सातवा : आकर्षणशक्ती आणि वशीकरण (औपमिषदिका)

नटणे थटणे, भुलवणे

शक्तीवर्धक औषधे

कामेच्छा प्रबळ कशी करावी,

लिंगाचा आकार वाढवणे इत्यादी

प्रयोग आणि साधना.




© Harshaj Patkar

## विभाग पहिला : पाठ दुसरा

### धर्म , अर्थ आणि काम यांची सिद्धी

मनुष्य जन्म दुर्मिळ आहे. प्रत्येक मनुष्याने मिळालेल्या शंभरवर्षांच्या आयुष्यात, धर्म , अर्थ आणि काम यांच्या सिद्धीसाठी, वयानुसार प्रयत्न केले पाहिजेत. तेही या तिन्हींमध्ये समतोल राखून, त्यांत आपसात अंतर्विरोध न होता. बालपणात ज्ञानसाधना करावी. तरूण आणि मध्यमवयात अर्थ आणि कामसाधना करावी आणि उतारवयात धर्माचे आचरण करून मोक्षप्राप्ती करावी. शतायुषी होण्याची शाश्वती नसलेल्यांनी या साधना त्यानुसार एकत्रित कराव्यात. मात्र शिक्षण पूर्ण होईपर्यंत ब्रह्मचर्यपालन अनिवार्य आहे.

धर्म म्हणजे हिंदू शास्त्रे आणि पोथ्यांचे पठण व त्यानुसार वागणे. ज्यातून कोणतेही ऐहिक लाभ होत नाहीत अशा गोष्टी म्हणजे धर्म. उदाहरण : दान धर्मादिक गोष्टी, ज्या मनुष्य सहजासहजी करत नाही. तसेच विधी निषेध पाळणे, उदा. मांसभक्षण न करणे. अशा गोष्टी ज्या या मायावी जगात मोह उत्पन्न करून माणसाला गुरफ़टून ठेवू शकतात. धर्माच्या नियमांमुळे माणूस अशा गोष्टींपासून दूर रहातो.

धर्माचा अभ्यास श्रुती, स्मृतीतून करावा. तसेच त्यांचा अभ्यास असलेल्यांकडून मार्गदर्शन घ्यावे.

अर्थ म्हणजे जमीन, सोने, गोधन, वस्तू, **कला** आणि **मित्रधन** यांचे संपादन. तसेच आपल्याकडे असलेल्या धनाचे रक्षण आणि संवर्धन. अर्थशास्त्राचे धडे राजाचे प्रधानमंडळ आणि वैश्यवाणी यांच्याकडून घ्यावेत.

काम म्हणजे पंचेद्रियांचा म्हणजे चक्षु, कर्ण, जिव्हा, काया, नासिका यांचा वापर करून मन आणि आत्मा यांच्या योगे ऐहिक वस्तूंचा आस्वाद व उपभोग घेणे. बाह्य जगाशी इंद्रियांच्या समायोगाने मन आणि आत्म्याला मिळणारे सुख म्हणजे काम. कामाचे शिक्षण कामसूत्रातून घ्यावे.

या तिहींचा क्रम श्रेष्ठत्वाने येतो. म्हणजे धर्म हा अर्थाहून महान. अर्थ हा कामाहून श्रेष्ठ.

मात्र राजाने अर्थ हे प्रथमकर्तव्य मानावे. कारण प्रजेच्या संगोपनासाठी ते आवश्यक आहे.

तसेच गणिकेने काम हाच श्रेष्ठ मानावा. हे अपवाद आहेत. इतरांनी मात्र धर्म हाच सर्वश्रेष्ठ मानावा.

यावर काही वाद आहेत. यांचे विवेचन खाली दिले आहे.

वाद पहिला : काही सुजाण लोकांचे असे मत आहे की धर्म हा पारलौकीक विषयाशी निगडीत असल्याने त्याचा पोथीतून अभ्यास करणे आवश्यक आहे. अर्थार्जनासाठी सुद्धा साधने आणि ज्ञानाची गरज असल्याने त्याचा अभ्यास करावा. परंतू काम हा ऐहिक असल्याने त्याची जाण स्वभावतःच मनुष्यमात्रांकडे असते. त्यामुळे त्यासाठी विशेष अभ्यासाची गरज नाही. मुके प्राणी सुद्धा समागम करून त्यांची संतती निर्माण करतातच की. मग मनुष्यानेच कामशास्त्राचा अभ्यास का म्हणून करावा?

प्रतिवाद: कामशास्त्रासाठी विशेष अभ्यासाची गरज नाही हे खरे नाही. शरीरसमागम हा दोन वेगवेगळ्या व्यक्तींमधील संबंध असल्यामुळे त्यासाठी योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. यमनियमांच्या अभावी विषयवासनांचे प्राबल्य अनिर्बंध वाढेल. तसेच स्त्री पुरुष समागमासाठी विशिष्ट वय व काळाचे बंधन असणे आवश्यक आहे. वासनाधीन अनिर्बंध समाजात अविचाराचा आणि अनैतिकतेचा बुजबुजाट माजण्याची भिती आहे. कामशास्त्र कामनियमांबद्दल मार्गदर्शन करताना काय व कसे करावे हे सांगतानाच काय करू नये तेही सांगते. समाज सुरळीत चालण्यासाठी हे आवश्यक आहे. आणि कामशास्त्राचा अभ्यास तारुण्याच्या उंबरठ्यावरच व्हायला हवा.

वाद दुसरा : लोकायतवाद्यांचे मत असे की धर्माचरण करण्यात काहीच फ़ायदा नाही. परलोकाच्या आमिषाने आताचे जीवन बरबाद करण्यात काहीच अर्थ नाही. आपल्या हातातले जे आहे ते सोडून देऊन न दिसणाऱ्या जगामागे केवळ मूर्खच जातात. हातातील कबूतर सोडून मोर पकडायला धावणे, किंवा हातचे तांब्याचे नाणे टाकून देऊन न दिसणारे सोन्याचे नाणे शोधण्यात काय अर्थ आहे?

प्रतिवाद : हे बरोबर नाही.

पहिले कारण : धर्माच्या नियमांत अशा प्रकारच्या शंकांना जागा नाही.

दुसरे : शत्रूच्या विनाशासाठी किंवा पर्जन्यासाठी दिलेल्या दान आणि बलिदानाचे फ़ायदे झाल्याचे दिसले आहे.

तिसरे : सूर्य, चंद्र, तारे, ग्रह आणि विश्वातील इतर सर्व शक्ती जगाच्या भल्यासाठी सदा कार्यरत असतात.

चवथे : चातुर्वर्ण्य (ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शूद्र) आणि चार आश्रम (ब्रह्मचर्यआश्रम, गृहस्थाश्रम, संन्यासआश्रम, वानप्रस्थाश्रम) यांच्या आचरणाचा प्रभाव संपूर्ण विश्वरचनेवर पडतो.

पाचवे : जमिनीमध्ये बीज पेरणे हे देखिल भविष्यावरच्या विश्वासाचे प्रतिक आहे. जर सर्वजण फ़ळेच खाऊ पहातील पण कोणी वृक्षांची लागवड केलीच नाही तर कसे चालेल. म्हणून वात्स्यायन धर्माचरणाला श्रेष्ठ मानतो. प्रत्येक व्यक्तीने समाजासाठी काहीतरी काम केले पाहिजे म्हणजे धर्म.

वाद तिसरा : दैववादी लोक मानतात की अर्थशास्त्राला काही किंमत नाही. दैवात जे असणार तेच मिळणार. नशीबात जर संपत्ती असेल तर अर्थशास्त्राची जाण नसतानाही ती मिळेल आणि नसेल तर अर्थाशास्त्रानुसार वागूनही मिळणार नाही. दैववशात बळीराजाला इंद्राचे आसन मिळाले व त्याच दैवाने ते काढून घेऊन त्यास पाताळात धाडले.

प्रतिवाद : हे बरोबर नाही

दैवाने काही वस्तू प्राप्त होण्यासाठी काही ना काही कार्यकारणभावाची गरज असते. त्यामागे काही घटनानुक्रम असतो. व तो घडून येण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता असते. व हे प्रयत्न योग्य दिशेने व्हावेत यासाठी अर्थशास्त्राच्या अभ्यासाची गरज असते. श्रम न करणाऱ्यास कोणतीही सिद्धी होत नाही.





वाद चवथा : अर्थाचे पुजारी, मानतात की काम वाईटच. काम म्हणजे ऐहिक सुख. कामाच्या आहारी गेलेली व्यक्ती धर्म आणि अर्थाची सिद्धी करू शकत नाही. अशा व्यक्तींची समाजात इभ्रत कमी होते. तो स्वतःच्या नजरेतूनही उतरतो. त्यांचे कुटुंब, नातेवाईक यांच्याशी त्यांचे संबंध दुरावतात.

भोज राज्याचा राजा दंडक, याने कामांध होऊन एका ब्राह्मणकन्येचे हरण केले आणि अखेर राज्य गमावून बसला.

इंद्राने अहिल्येच्या शीलाचे हरण केले आणि त्याच्यावरही संकटांची मालिका कोसळली.

कीचकाने द्रौपदीवर वाईट नजर ठेवल्यामुळे आणि रावणाने सीतेचे हरण केल्यामुळे त्यांना देहदंडाच्या शिक्षेला सामोरे जावे लागले.


अशा प्रकारे ऐहिक सुखाच्या लालसेमुळे संकटांच्या गर्तेत सापडावे लागते.

प्रतिवाद :

या वादाला काही अर्थच नाही. शरीरसुख हे अन्नाइतकेच शरीराच्या आनंदासाठी आणि अस्तित्त्वासाठी गरजेचे आहे. दुसरे म्हणजे तेही धर्म आणि अर्थाचे साधन आणि निष्पत्ती आहे. मात्र दोन्हींचे (अन्नाचे आणि शरीरसुखाचे) सेवन सारासारविवेकाने केले पाहिजे. त्यांचा अतिरेक करू नये. मात्र ते घाबरून जाऊन

पुर्णपणे बंदही करू नये. भिकारी मागेल म्हणून कोणी अन्न शिजवायचे थांबत नाही किंवा हरीण खाऊन टाकेल म्हणून कोणी शेत लावायचे थांबत नाही.

अशा प्रकारे शहाणा व चतुर माणूस धर्म अर्थ आणि काम यांचा अभ्यासपूर्ण वापर करून इहलोक आणि परलोकाचे सुख मिळवतो. ज्या आचरणाने धर्म अर्थ आणि काम हे तिन्ही साध्य होतात असे कार्य करावे. न जमल्यास यातील किमान दोन किंवा नाहीच तर किमान एक साध्य होईल असे कार्य करावे. मात्र एकाच्या साधनेमुळे दुसऱ्याचा नाश होणार असेल तर असे कार्य मात्र कधीही करू नये. (म्हणजे अर्थ मिळवताना धर्म किंवा कामाचा नाश होणार नाही याची काळजी घ्यावी)



विभाग पहिला : पाठ तिसरा

## विद्या आणि कलांचा अभ्यास

प्रत्येक माणसाने धर्म आणि अर्थासोबत कामशास्त्राचा आणि त्याच्याशी निगडीत कला आणि शास्त्रांचा अभ्यास केला पाहिजे. तरुण मुलींनीही कला आणि शास्त्रांसोबत कामशास्त्राचा अभ्यास विवाहापुर्वी केला पाहिजे आणि विवाहानंतरही पतीच्या अनुमतीने करत राहिले पाहिजे. काही विद्वानांचा स्त्रियांनी कामशास्त्राचा अभ्यास करण्याला विरोध आहे कारण स्त्रीने कोणत्याही शास्त्राचा अभ्यास करू नये असे ते मानतात. पण वात्स्यायनाला हे मंजूर नाही. कारण स्त्रियांना कामशास्त्रातील 'तंत्रांचे ' उपजतच ज्ञान असते. पण  त्या तांत्रिक कृतींमागचे शास्त्र समजून घेऊन जर कृती केली तर आयुष्य सुखमय होते. अनेकदा याज्ञीकांना यज्ञ हवनात उच्चारायचे शब्द माहित असतात पण त्यांचा अर्थ आणि कार्यकारण माहित नसते. अनेकदा लोकांना कोणत्या दिवशी कार्य करावे हे माहित असते परंतू ज्योतिःशास्त्राचा अभ्यास नसतो. इतरांचे बघून बघून अश्व आणि हत्तींना शिकवणारे लोक असतात पण त्यांना हत्ती आणि अश्वांच्याबद्दल मूळ शास्त्र माहित नसते. काही देशांमध्ये राजा राज्य

करतो व तो जे सांगेल तेच नियम बनतात व लोकांना त्या नियमांच्या मागचे कारण माहित नसते. मात्र अनेकदा कुलीन स्त्रीयांना आणि वेश्यांना कामशास्त्राचे उत्तम ज्ञान असते.

प्रत्येक स्त्रीने आपल्या विश्वासू मैत्रिणीच्याद्वारे कामशास्त्र किंवा त्यातील काही भागाचा अभ्यास करावा. गुप्तपणे, एकांतात कामशास्त्रातील चौसष्ट कलांचा अभ्यास करावा. तिचे शिक्षक खालीलपैकी एक असावा : तिच्या दाईची समवयस्क विवाहित मुलगी, जिवाभावाची मैत्रीण, मावशी, वयस्क दासी, मूळची चांगल्या घरातील भिक्षुक स्त्री, विश्वासातील सख्खी बहिण.



**चौसष्ट कला**: सुखी जीवन जगण्यासाठी प्रत्येक स्त्री व पुरुषाला खालील चौसष्ट कलांचे किंवा त्यातील निदान जमतील तेवढ्या जास्तीत जास्त कलांचे ज्ञान असले पाहिजे.

गायन

वाद्यवादन

नृत्य

गायन, वादन आणि नृत्याचा मेळ

लिहिणं आणि चित्रकला

गोंदणकला (अंग रंगवणे, टाटू)

मुर्तीला अक्षता आणि फुलांनी सजवणे, आरास

फुले आणि इतर रांगोळ्या

दात, दागिने, केस, नखे, शरीर, रंगवणे, मेंदीकाम, इत्यादी

रंगीत काचांची रांगोळी

शयनसज्जा सजवणे, गालिचा, गाद्या, लोड, तक्के यांची रचना

जलतरंगवादन

रंगीत पाण्याचे झरे, कारंजी, तबकं यांची रचना

चित्रकला, सजावट, चित्ररचना, चित्रांसाठी चौकट बनवणे

माळा, हार, गजरे, पुष्परचना

फ़ेटे, पागोटे, फ़ुलांचे तुरे

कथाकथन, गोष्टी सांगणे, प्रसंग रंगवणे, अभिनय,

कर्णआभूषणे, अत्तर बनवणे, सुगंधी द्रव्यं तयार करणे

हिरे माणकांचा योग्य वापर करणे, सजवणे, त्यांना वस्त्रांत गुंफ़णे,

जादू आणि नजरबंदी

हात चलाखी आणि हस्तकौशल्य

स्वयंपाक आणि वेगवेगळे खाद्यपदार्थ व व्यंजन बनवणे

सरबत, पेयं, सुरभी, सुरा, मधुरस बनवणे

शिवणकला, वस्त्ररचना

विणकला, वस्त्र आणि धाग्यांचे विणकाम करून पोपट, फ़ुले, गुच्छ, इत्यादी रचना बनवणे

कोडी सोडवणे, कूट, द्व्यर्थी बोलणे, कोडी बनवणे, वाक्चातुर्य

### कामसूत्र

कवितांचे चरण पूर्ण करणे,  दिलेल्या शब्दांवरून पहिला चरण पूर्ण होण्यापुर्वीच लगोलग दुसरा चरण सादर करणे, अंताक्षरी

नकला करणं, हुबेहूब आवाज काढणं

श्लोक वाचन, सादरीकरण,

उच्चारायला अवघड वाक्यं उच्चरणे

(उदा. कच्चा पापड- पक्का पापड, चटईला टाचणी टोचली)

तलवारबाजी, लाठी, धनुर्विद्या

तर्कशास्त्र,

सुतारकला, लाकडाच्या कलात्मक वस्तू बनवणे

वास्तुकला, गृहसजावट

सुवर्ण, चांदी, हिरे मोती यांची पारख

रसायनकला आणि खनिजशास्त्र

अश्म, दगड, मणी रंगवणे

खाणकामाची माहिती

बागकाम, वृक्षलता संवर्धन

कोंबडे, कबूतर आदिंची झुंज

मैना, पोपटांना बोलायला शिकवण्याची कला





उटणे लावण्याची, केशरचना, वेणी घालणे, सुगंधित करण्याची कला

कूटभाषा ओळखण्याची व लिहिण्याची कला.

शब्दांची रचना बदलून बोलणे (जशी चकारी, टकारी शकारी भाषा)

विविध भाषांचे आणि बोलीभाषांचे ज्ञान

फुलांची करंडी बनवणे, पुष्परचना

गूढचित्रे, यंत्रचित्रे, मंत्रचित्रे, ताईत

कवितेचे दोन किंवा तीन शब्द घेऊन कविता पूर्ण करणे, उलटसुलट लिहिलेल्या ओळी, शब्द यांतून अर्थपूर्ण काव्यरचना करणे वगैरे

कविता करणे

शब्दार्थांची, अनुवादाची कला. शब्दकोषाचे ज्ञान.

साज शृंगार कला

वस्तूंचे स्वरूप बदलण्याची कला, जसे कापसाच्या वस्त्राचे रेशमासारखे मुलायम वस्त्र करणे

द्युतकला

मंत्रसामर्थ्याने दुसऱ्याची संपत्ती स्वतःच्या नांवे करणे

तारुण्यपूर्ण जोशपूर्ण खेळ, साहसी क्रिडा, गिर्यारोहण, अश्वारोहण

समाज नियम, कायदे यांचे ज्ञान. लोकांशी कसे बोलावे, वागावे याचे ज्ञान.

युद्धकला, शस्त्रकला, सैन्यकला

व्यायामकला, सौष्ठवकला


चेहरा वाचणे

गीतरचना

गणिती रचना

कागदापासून किंवा अन्य पदार्थांपासून फुले बनवणे

मूर्तीकला


© Harshaj Patkar

काही ठिकाणी खालील चौसष्ट कला मानल्या जातात.

*१. पानक रस तथा रागासव योजना - मदिरा व पेय तयार करणे.*

*२. धातुवद- कच्ची धातू पक्की व मिश्रधातू वेगळी करणे.*

*३. दुर्वाच योग- कठीण शब्दांचा अर्थ लावणे.*

*४. आकर ज्ञान - खाणींविषयी अंतर्गत सखोल ज्ञान असणे.*

*५. वृक्षायुर्वेद योग- उपवन, कुंज, वाटिका, उद्यान बनविणे.*

*६. पट्टिका वेत्रवाणकल्प- नवार, सुंभ, वेत इत्यादींनी खाट विणणे.*

*७. वैनायिकी विद्याज्ञान- शिष्टाचार व विनय यांचे ज्ञान असणे.*

*८. व्यायामिकी विद्याज्ञान- व्यायामाचे शास्त्रोक्त ज्ञान असणे.*

*९. वैजापिकी विद्याज्ञान- दुसऱ्यावर विजय मिळविणे.*

*१०. शुकसारिका प्रलापन- पक्ष्यांची बोली जाणणे.*

*११. अभिधान कोष छंदोज्ञान- शब्द व छंद यांचे ज्ञान असणे.*

*१२. वास्तुविद्या- महाल, भवन, राजवाडे, सदन बांधणे.*

*१३. बालक्रीडाकर्म- लहान मुलांचे मनोरंजन करणे.*

१४. चित्रशब्दापूपभक्षविपाक क्रिया- पाकक्रिया, स्वयंपाक करणे.

१५. पुस्तकवाचन- काव्यगद्यादी पुस्तके व ग्रंथ वाचणे.

१६. आकर्षण क्रीडा- दुसऱ्याला आकर्षित करणे.

१७. कौचुमार योग- कुरुप व्यक्तीला लावण्यसंपन्न बनविणे.

१८. हस्तलाघव- हस्तकौशल्य तथा हातांनी कलेची कामे करणे.

१९. प्रहेलिका - कोटी, उखाणे वा काव्यातून प्रश्न विचारणे.

२०. प्रतिमाला - अंत्याक्षराची योग्यता ठेवणे.

२१. काव्यसमस्यापूर्ती - अर्धे काव्य पूर्ण करणे.

२२. भाषाज्ञान - देशी-विदेशी बोलींचे ज्ञान असणे.

२३. चित्रयोग - चित्रे काढून रंगविणे.

२४. कायाकल्प - वृद्ध व्यक्तीला तरुण करणे.

२५. माल्यग्रंथ विकल्प - वस्त्रप्रावरणांची योग्य निवड करणे.

२६. गंधयुक्ती - सुवासिक गंध वा लेप यांची निर्मिती करणे.

२७. यंत्रमातृका - विविध यंत्रांची निर्मिती करणे.

२८. अत्तर विकल्प - फुलांपासून अर्क वा अत्तर बनविणे.

२९. संपाठ्य - दुसऱ्याचे बोलणे ऐकून जसेच्या तसे म्हणणे.

३०. धारण मातृका - स्मरणशक्ती वृद्धिंगत करणे.

३१. छलीक योग- चलाखी करून हातोहात फसविणे.

३२. वस्त्रगोपन- फाटकी वस्त्रे शिवणे.

३३. मणिभूमिका - भूमीवर मण्यांची रचना करणे.

३४. द्यूतक्रीडा - जुगार खेळणे.

३५. पुष्पशकटिका निमित्त ज्ञान - प्राकृतिक लक्षणाद्वारे भविष्य सांगणे.

३६. माल्यग्रथन - वेण्या, पुष्पमाला, हार, गजरे बनविणे.

३७. मणिरागज्ञान - रंगावरून रत्नांची पारख करणे वा ओळखणे.

३८. मेषकुक्कुटलावक - युद्धविधी- बोकड, कोंबडा इ.च्या झुंजी लावणे.

३९. विशेषकच्छेद ज्ञान - कपाळावर लावायच्या तिलकांचे साचे करणे.

४०. क्रिया विकल्प - वस्तूच्या क्रियेचा प्रभाव उलटविणे.

४१. मानसी काव्यक्रिया - शीघ्र कवित्व करणे.

४२. आभूषण भोजन - सोन्या-चांदी वा रत्नामोत्यांनी काया सजवणे.

४३. केशशेखर पीड ज्ञान - मुकुट बनविणे व केसात फुले माळणे.

४४. नृत्यज्ञान - नाचाविषयीचे शास्त्रोक्त सखोल ज्ञान असणे.

४५. गीतज्ञान - गायनाचे शास्त्रीय सखोल ज्ञान असणे.

४६. तंडुल कुसुमावली विकार - तांदूळ व फुलांची रांगोळी काढणे.

४७. केशमार्जन कौशल्य - मस्तकाला तेलाने मालीश करणे.

४८. उत्सादन क्रिया - अंगाला तेलाने मर्दन करणे.

४९. कर्णपत्र भंग - पानाफुलांपासून कर्णफुले बनविणे.

५०. नेपथ्य योग - ऋतुकालानुसार वस्त्रालंकाराची निवड करणे.

५१. उदकघात - जलविहार करणे. रंगीत पाण्याच्या पिचकारी करणे.

५२. उदकवाद्य - जलतरंग वाजविणे.

५३. शयनरचना - मंचक, शय्या व मंदिर सजविणे.

५४. चित्रकला - नक्षी वेलवुट्टी व चित्रे काढणे.

५५. पुष्पास्तरण - फुलांची कलात्मक शय्या करणे.

५६. नाटय़अख्यायिका दर्शन - नाटकांत अभिनय करणे.

५७. दशनवसनांगरात - दात, वस्त्रे, काया रंगविणे वा सजविणे.

५८. तुर्ककर्म - चरखा व टकळीने सूत काढणे.



५९. इंद्रजाल - गारुडविद्या व जादूटोणा यांचे ज्ञान असणे.

६०. तक्षणकर्म - लाकडावर कोरीव काम करणे.

६१. अक्षर मुष्टिका कथन - करपल्लवीद्वारे संभाषण करणे.

६२. सूत्र तथा सूचीकर्म - वस्त्राला रफू करणे.

६३. म्लेंछीतकला विकल्प - परकीय भाषा ठाऊक असणे.

६४. रत्नरौप्य परीक्षा - अमूल्य धातू व रत्ने यांची पारख करणे

एक सर्वसाधारण बाजारू स्त्री जर वर दिलेल्या कलांमध्ये पारंगत असेल तर तिला गणिकेचा दर्जा प्राप्त होतो आणि तिला राजदरबारी मान मिळतो. सुशिक्षित आणि सभ्य लोकांच्या पंक्तीत तिचे नांव घेतले जाते.

जर राजघराण्यातील किंवा राजदरबारातील व्यक्तींच्या कन्यांनी हे शिक्षण घेतले तर त्या आपल्या पतींना वश करून ठेवू शकतात आणि हजार सवतींवर मात करून पट्टराण्या बनू शकतात.

जर एखाद्या स्त्रीला पतीपासून वेगळे व्हायची वेळ आली तर ती या कलांचा वापर करून जगू शकते. या कलांची अगदी तोंडओळखदेखिल स्त्रीच्या आकर्षकतेत भर घालते. कारण अनेकदा यांचा वापर करणे परिस्थितीमुळे शक्य नसते.

यातील शौर्यकलांची, साहसी विद्यांची जाण असणाऱ्या पुरुषांबद्दल स्त्रियांना विशेष आकर्षण वाटते व अत्यंत कमी ओळखीत सुद्धा स्त्रिया अशा पुरुषांना सहज वश होतात.



## विभाग पहिला : पाठ चौथा

## सभ्य लोकांचे जीवन

अशा प्रकारे चौदा विद्या आणि चौसष्ट कला आपल्या ब्रह्मचर्याश्रमात पुरुषाने शिकून घ्याव्यात. उच्चविद्याविभूषित आणि सकलकलापारंगत पुरुषाने, गृहस्थाश्रम स्विकारावा व भरपूर संपत्ती मिळवावी. घर चालवण्यासाठी संपत्तीची गरज असते. घर चालवण्यासाठी संपत्ती मिळवावी. संपत्ती मिळवण्यासाठी घर चालवू नये.

गृहस्थाने संपत्ती मिळवण्याचे पाच मार्ग आहेत.

भेटीतून मिळालेली

जित : वीरश्रीच्या बळावर युद्धात जिंकलेली

विकत घेतलेली. स्वतःकडे असलेल्या वस्तू  किंवा स्वतः बनवलेल्या वस्तू देऊन मिळवलेली.

वारसहक्काची : पिढीजाद मिळालेली

स्वकष्टार्जित : स्वतः कमावलेली, स्वतः निर्माण केलेली

अशा प्रकारे मिळवलेल्या संपत्तीतून गृहस्थाने शहराच्या किंवा मोठ्या गांवाच्या मध्यभागी, सभ्य वस्तीत,  सज्जनांच्या रहदारीच्या भागात, एक सुंदर टुमदार घर बांधावे. या

घराजवळ ताजे पाणी झुळझुळ वाहते असावे. घरात निरनिराळ्या कामांसाठी वेगवेगळ्या खोल्या असाव्यात. चहूबाजूंना सुंदर सुवासिक बाग असावी.  घराभोवताली प्रसन्न वातावरण असावे. घराचे प्रवेशद्वार आकर्षक असावे. अतिथींना खुणावणारे असावे. स्वागतशील असावे.

घराला दोन विशेष दालने असावीत. एक बाहेर आणि एक आत. आतल्या खोलीत स्त्रियांचे वास्तव्य असावे. बाहेरचे दालन ऊबदार असावे. उच्च दर्जाच्या अत्तरांनी सुगंधित असावी. आत प्रवेशताक्षणी कुणाचेही मन प्रसन्न व्हावे. दालनाच्या मधोमध एक मोठा शयनमंचक असावा. त्यावर सावरीच्या कापसाच्या मऊ गाद्या, दोन मऊ उशा, लोड व तक्के असावेत. त्यांवर स्वच्छ मऊ सफ़ेद चादरी असाव्यात. ही शय्या मध्यभागी खोलगट असावी.  पुष्पगुच्छ व पुष्पहारांनी सजवलेली असावी. या पलंगाला वर नक्षीदार छत असावे

या शयनमंचाशेजारी एक छोटेसे सुंदर नक्षिदार मंचक असावे. त्यावर विविध अत्तरांच्या व अंजनांच्या कुप्या सजवून ठेवाव्यात. त्याभोवती जाई, जुई, शेवंती, गुलाब, चाफ़ा अशा फ़ुलांची मनमोहक पुष्परचना सजवावी. त्याच्या अवतीभवती कस्तुरी, केवडा, कापूर अशांनी भरलेली सुगंधीत शोभिवंत ताम्रपात्रे असावीत. मुखशुद्धीसाठी सुगंधी सुपारी, आणि कात असावे व सोबत रसदार विड्याचे सारे ताजे तजेलदार साहित्य सजवून ठेवलेले असावे.

मेजापाशी जमिनीवर एक स्वच्छ थुंकदाणी, एखादाच नाजुकसा मौल्यवान अलंकार व दागिन्यांची सुशोभित नक्षीदार पेटी असावी. एका हस्तीदंती खुंटीवर लटकणारी एक सुंदरशी बांसरी असावी. भिंतीत एक फ़डताळ असावे. त्यातला एक कप्पा सुगंधी अत्तरांच्या कुप्या भरलेला, एक कप्पा छान छान कथांची पुस्तकं भरलेला आणि एक कप्पा पिवळ्या शेवंतीच्या मंद सुवासाचा असावा. अगदी जवळच असावं एक छोटंसं तबक, एक खेळण्यातली मातीची गाडी, आणि एका छोट्याश्या

मंचावर मांडून ठेवलेला, आमंत्रण देणारा, सोंगट्यांचा डाव. खिडकीलगत रंगीत पक्ष्यांचा एक छानसा पिंजरा असावा, एक समृद्ध कलादालन, रंगपेटी व कुंचले, सूत कातण्याचा चरखा किंवा कोरीव कामाची साधनं किंवा असंच काही कला कुसरीचं सामान. मनुष्याच्या अंतर्मनातील निर्मितीच्या प्रतिभेच्या ऊर्मी जाग्या करणारे साहित्य पाहून सच्च्या कलाकारांचे हात शिवशिवले पाहिजेत.

समोर एक टुमदार बाग असावी. छोटीशीच. बागेत वृक्षवेलींच्या सावलीत दोन झोपाळे असावेत. एक पुढेमागे झुलणारा, एक स्वतःभोवती गोलगोल गिरक्या घेणारा. आणि सभोवती एक सुगंधी फुलवेलींचा मंडप. मांडवाखाली दोनच व्यक्तींना चिकटुन पाय मुडपून बसता येईल असा एकच छोट्टासा लाकडी किंवा दगडी ओटा किंवा कट्टा. अहाहा !

गृहस्थाने सकाळी उठल्यावर आपली नैमित्तिक कामे आटपावी. दात स्वच्छ धुवावेत. कळेल न कळेल इतकेच माफ़कसे मंद सुवासिक अत्तर शरीरावर आणि वस्त्रांवर लावावे. खूप घमघमाट करू नये. किंचित अंजन डोळ्यांत घालावे. ओठांना किंचित रक्तवर्णी वनस्पती लावून रंगवावे. योग्य तेवढीच आभूषणे ल्यावीत आणि बाहेर पडण्यापुर्वी आरशात पहावे.

सुगंधी द्रव्यांनी युक्त असा विडा सेवन करावा. याने मुख सुगंधीत होते. त्याने आपली नेहमीची कामे करावीत. त्याने रोज स्नान करावे, एक दिवस आड तेलाने मालिश करावे, दर तीन दिवसांनी उटणे लावावे, दर चार दिवसांनी डोके व चेहरा भादरावा, आणि दर आठवड्याला शरीरावरचे इतर केस काढावेत. काखेतील घाम नित्य पुसावा. चरायनाने आखून दिलेल्या वेळांना, सकाळी, दुपारी आणि रात्री भोजन घ्यावे. सकाळी पहिल्या पोटपूजेनंतर पोपट मैनांना बोलायला शिकवावे. नंतर कोंबडे कबूतरांची झुंज लावावी. थोडावेळ पीठमर्द, विता आणि विदूषकांबरोबर मनोरंजन करावे (यांची माहिती पुढे दिली आहे). दुपारची वामकुक्षीची हलकीशी झोप घ्यावी. संध्याकाळी उठल्यावर पुन्हा

छान कपडे करून व हलकेसे अत्तर शिंपडून बाहेर पडावे. मित्रमंडळीशी गप्पा कराव्यात. संगीताची मैफ़ल भरवावी. आणि संध्याकाळ सरता सरता, आपल्या मित्रमंडळीसोबत आपल्या घरी येऊन, घर सजवून, सुगंधी वातावरण करून,  आपल्या प्रेयसीची वाट पहावी. किंवा तिला आणण्यासाठी आपल्या दासीला पाठवावे. ती आल्यावर त्याने व मित्रांनी सुंदर शब्दांत संभाषण करावे, तिचे मन प्रसन्न करावे, व अशा प्रकारे दिवसाचा अंत करावा.

याशिवाय प्रसंगोपात्त करायच्या विशेष गोष्टी खालीलप्रमाणे

निरनिराळ्या देवतांचे उत्सव साजरे करावेत

स्त्रीपुरुषांचे संमेलन घडवून आणावे

सुरापानाचे कार्यक्रम करावेत

सहलींना जावे

कला साहित्य संगीत नाट्य संमेलने घडवून आणावीत वा त्यांत सहभागी व्हावे

आनंदी निमित्तांचे उत्सव करावेत व त्यांचा आनंद घ्यावा

खास सणांच्या दिवशी सर्व नागरिकांनी सरस्वतीच्या मंदिरी जमावे. गांवोगांवाहून आलेल्या गायक नर्तकांची चढाओढ भरवावी. त्यांना चांगली बक्षिसे द्यावी. योग्य वाटल्यास त्यांना गांवात ठेवून घ्यावे. नागरिकांनी हे निर्णय एकमताने घ्यावेत.  गांवकऱ्यांनी सुख व दुःखात कायम एकत्र रहावे. उत्सवासाठी आलेल्या विदेशी अतिथींना मानसन्मानाने वागवावे.

सर्व प्रकारचे उत्सव असेच साजरे करावेत.

## सामाजिक सोहळे व संमेलने

जेव्हा समवयस्क, समान सामाजिक स्थान असलेले लोक, समान आवडीनिवडीचे लोक, एकत्र येऊन गणिकेच्या नृत्यालयात किंवा आपल्यातल्याच एकाच्या घरी किंवा एखाद्या सार्वजनिक ठिकाणी, मौज करण्यासाठी एकत्र येतात तेव्हा तो सामाजिक सोहळा असतो.

एकत्र येऊन सर्वजण गप्पा मारतात, थट्टामस्करी करतात. काव्याच्या मैफ़ली किंवा कलाविषयक चर्चा करतात. अशा ठिकाणी सौंदर्यवतींची चर्चा होते. विशेषतः ज्या सर्व कलांमध्ये पारंगत असतात अशा चतुर स्त्रियांबद्दल गप्पा मारल्या जातात. पुरुषांना आकर्षित करण्याची कला असणाऱ्या स्त्रिया हा चर्चेचा खास विषय असतो .

## सुरापान

स्त्री पुरुषांनी एकमेकांच्या घरी जमून सुरापान करावे. या ठिकाणी पुरुषांनी गणिकांना सुरापानाचा आग्रह करावा व स्वतःही पेयपान करावे. मधू, ऐरेय, सार, आसव अशा विविध कडू व आंबट पेयांचे पान करावे. त्याचबरोबर विविध झाडांच्या साली, रानफ़ळे आणि पाने यांच्यापासून बनवलेली दारू प्यावी.



## बागेतील सहली

दुपार होण्यापुर्वी पुरुषांनी छान छान वस्त्रे लेवून, गणिकांना घेऊन , घोड्यांवर बसून बागांत जावे. आपली कामे करावी. गप्पा माराव्यात, कबूतर कोंबडे यांच्या झुंजी वगैरे लावाव्यात, किंवा तत्सम क्रिडा कराव्यात आणि संध्याकाळी आनंदात परतावे. येताना फुलांचे गुच्छ आणावेत.

उन्हाळ्यात गांवाबाहेरील पाणवठ्यांवर जाऊन जलक्रीडा कराव्यात. जंगली प्राण्यांची ये जा असणारे पाणवठे अशा क्रिडांसाठी उत्तम.

## इतर क्रिडासाधने



रात्रभर द्युत खेळणे

चांद्रप्रकाशात फ़िरायला जाणे

वसंतपंचमी साजरी करणे

आम्रवृक्षावरून कच्च्या कैऱ्या व आम्रफ़ळे तोडणे

कमळाचे धागे खाणे

कोवळी कणसे खाणे

नवी पालवी फ़ुटण्याच्या ऋतूत , म्हणजे वसंत ऋतूत गर्द रानावनांत सहलीला जाणे

उदकश्वेदिका म्हणजे जलक्रिडा

एकमेकांना फ़ुलांनी सजवणे

इतर अनेक देशी किंवा प्रादेशिक खेळ

अशा प्रकारच्या सामाजिक खेळांचा आनंद घेणे हे गृहस्थास आवश्यक आहे. आणि गणिकांनीही आपल्या सख्यांसह अशा खेळांचा आनंद घेतला पाहिजे.

आता वीत, विदूषक आणि पिठमर्द म्हणजे कोण ते पाहू.

पिठमर्द म्हणजे सच्चा प्रियकर. प्रेयसी म्हणजेच सर्वस्व असे मानतो तो पिठमर्द. पिठमर्द म्हणजे आपल्या प्रेयसीशिवाय या जगात दुसरे काहीच नसलेला माणूस. त्याचे सर्वस्व म्हणजे त्याची सहचरी, विविध तेलं, आणि एक लाल वस्त्र. पीठमर्द चांगल्या देशातील चांगल्या घराण्यातील असतात आणि त्यांना अनेक कला अवगत असतात. या कलांचे शिक्षण देत हे लोक आपली गुजराण करतात आणि कुलीन लोक आणि गणिका यांच्याशी खास मैत्री करतात. यांच्या आगमनाने वातावरण प्रफ़ुल्लीत होते, प्रसन्न होते. मन लुभावणारे याचे बोलणे व वागणे असते.

वीत म्हणजे ज्याच्याकडे भरपूर संपत्ती आहे, जो याच देशातील आहे, आणि ज्याच्याकडे गृहस्थाश्रमाचे सर्व गुण आहेत असा. ज्याची पत्नी त्याच्या सोबत असते आणि ज्याला

गणसभांतून आणि गणिकांच्या कोठ्यावर भरपूर मान असतो. याच्या आगमनाने वातावरणाला भारदस्तपणा आणि उंची लाभते. याची उपस्थिती सभेला दर्जा देते.

विदूषक किंवा वैहसक म्हणजे जो हसवतो, ज्याला अनेक कला अवगत आहेत, जो सर्वांच्या विश्वासातला आहे असा मित्र. याचे वाक्चातुर्य खुप वरच्या दर्जाचे असते. हा वातावरण खुलवतो. ताण नाहीसा करतो. हजरजबाबी असला तरी मनाला टोचेल असे खोचक तो बोलत नाही. उलट स्वतःचे हसे करून सुद्धा हा इतरांना निखळ आनंद देतो.

या व्यक्तींना वाद किंवा भांडणांच्या वेळी निवाड्याकरिता बोलावले जाते. अशा कार्यासाठी मुंडन केलेल्या भिक्षुक स्त्रिया, आणि गणिकांनाही मध्यस्थीकरता बोलावले जाते.

अशाप्रकारे गांव किंवा शहरात रहाणाऱ्या गृहस्थाचे कर्तव्य असते की त्याने आपल्या ज्ञाती बांधवांना मदत करावी, त्यांना आपल्या घरी बोलवावे, त्यांच्या घरी जावे, आणि समाजात मिळून मिसळून रहावे.

एका श्लोकात असे सांगितले आहे की :

जो गृहस्थ संस्कृत किंवा इतर दर्जेदार भाषांतून विविध विषयांवर बोलू शकतो त्याला समाजात मान मिळतो. शहाण्याने जनसामान्यांना न आवडणाऱ्या लोकांत मिसळू नये, अनिर्बंध वागू नये, आणि कोणाला दुखवू नये. जो सुशिक्षित गृहस्थ समाजात मिळून मिसळून रहातो व समाजाच्या सुखांतच आपले सुख मानतो त्याला समाजातही मान मिळतो.



## विभाग पहिला : पाठ पाचवा

### गृहस्थाश्रमी पुरुषांच्या स्त्रिया, मित्र आणि दूतांविषयी

चारही वर्णातील पुरुष जेव्हा धर्माने आखून दिलेल्या चौकटीत म्हणजे विवाहबंधनाद्वारे कुमारिकांसह कामसाधना करतात तेव्हा त्यांना कायदेशीर संतती आणि किर्ती प्राप्त होते. मात्र आपल्याहून उच्च वर्णाच्या स्त्रीशी किंवा कौमार्य गमावलेल्या समानवर्णी स्त्रीशी समागम करणे अवैध आहे. तसेच आपल्याहून कमी वर्णाची स्त्री, जातीने वाळीत टाकलेली स्त्री, गणिका, आणि पुनर्विवाह केलेली विधवा यांच्याशी समागम अवैध नसला तरी स्तुतीयोग्यही नाही. अशा स्त्रियांशी समागम हा केवळ तात्पुरत्या विषयसुखासाठीच असतो.

नायिकांचे तीन प्रकार असतात.  दासी, पुनर्विवाहित विधवा, गणिका.

गणिकापुत्राच्या मते एक चौथा प्रकार आहे. तो म्हणजे विवाहित परस्त्रीशी काही विशेष प्रसंगी रत करणे अनैतिक नाही.  पण ते विशेष प्रसंग, किंवा कारणे खालीलपैकी एक असेल तरच.

एक : जेव्हा ती विवाहित परस्त्री स्वेच्छेने आपल्याकडे येते, आणि तिचा उपभोग आपल्यापुर्वी इतरांनीही घेतलेला आहे. अशा स्त्रीला आपण वेश्येवतच समजावे आणि जरी ती आपल्याहून उच्च वर्णाची असली तरी तिच्याशी समागमाने धर्माला बाधा येत नाही.

दोन : दोनदा विवाह केलेली स्त्री जिचे संबंध आपल्याआधी इतरांशी झालेले आहेत अशा स्त्रीशी समागमाला धर्माचा विरोध नाही

तीन : राजकीय कारणासाठी. एक अशी स्त्री, जिचा पती पूर्णपणे तिच्या मुठीत आहे. तो आपल्या शत्रूचा मित्र आहे आणि तिची कामेच्छा आपण पूर्ण केली तर तिच्या सांगण्यावरून तो आपल्या शत्रूला सोडून देऊन आपल्याला मिळू शकतो

चार : अशी स्त्री जी तिच्या उच्चपदस्थ पतीचे मन वळवून त्याचा आपला सलोखा निर्माण करू शकते आणि सध्याचे बिघडलेले संबंध सुधारू शकते

पाच: अशी स्त्री, जिच्याशी मी समागम केल्याने माझ्या एखाद्या मित्राचा फ़ायदा करून देऊ शकते, किंवा आपल्या एखाद्या शत्रूला संपवू शकते किंवा आपले एखादे कठीण काम तडीस नेऊ शकते

पाच : अशी स्त्री जिच्या पतीला मारून आपण प्रचंड संपत्ती प्राप्त करू शकतो

सहा : अशी स्त्री जिच्याशी समागमाने आपल्याला तोटा काहीच नाही मात्र विनासायास भरपूर संपत्ती मिळवून आपण आपले दारिद्र्य संपवू शकतो.

सात: एक अशी स्त्री जी आपल्यावर अतिशय प्रेम करते, आपले सर्व दुर्गुण आणि दुष्कृत्ये जाणते, आणि जर आपण रतीसुखाला नकार दिला तर ते जगजाहीर करून आपल्याला मातीमोल करेल, किंवा असा आरोप करील ज्यातून आपली सुटका होणे अशक्य आहे, किंवा तिच्या कह्यात असलेल्या ताकदवान नवऱ्याला सांगून आपल्या शत्रूशी त्याचे संगनमत करवील.

आठ : जिच्या पतीने आपल्या स्त्रियांना भ्रष्ट केले आहे आणि त्याचा सूड म्हणून आपण त्याच्या स्त्रीला भ्रष्ट करू.

नऊ : अशी स्त्री जिला माझ्या राजाच्या शत्रूचा ठावठिकाणा माहित आहे, आणि राजाने मला त्याला नष्ट करण्याचा आदेश दिला आहे.

दहा : माझी प्रेयसी या स्त्रीच्या सांगण्यात आहे . आणि माझ्या प्रेयसीपर्यंत पोहोचण्यासाठी या स्त्रीला समाधानी करणे आवश्यक आहे.

अकरा : ही स्त्री मला अशी एक स्त्री मिळवून देऊ शकते जी सौंदर्य आणि ऐश्वर्य यांनी युक्त आहे, जिच्यापर्यंत पोहोचणे केवळ याच स्त्रीमार्फ़त मला शक्य आहे.

बारा : माझा शत्रू हा या स्त्रीच्या पतीचा मित्र आहे. ही स्त्री जर माझ्या शत्रूला वश झाली तर तिच्या पतीमध्ये आणि माझ्या शत्रूमध्ये वितुष्ट येईल.

अशा प्रकारे काही विशिष्ट हेतूने एखाद्या परस्त्रीशी संबंध ठेवले तर चालेल, मात्र केवळ संभोगसुखासाठी परस्त्रीशी संबंध ठेवणे गैर आहे.

चरायनाच्या मते नायिकांचा एक पाचवा वर्गही आहे : अशा नायिका ज्या राजाच्या मंत्र्यांच्या मर्जीतल्या असतात किंवा त्यांचे वरचेवर जाणे येणे असते किंवा अशी विधवा जी पुरुषाचे मनोरथ पूर्ण करते.

सुवर्णाभाच्या मते एखाद्या साधूच्या सेवेत आयुष्य वेचणारी विधवा ही सहाव्या प्रकारची नायिका होय.

घटकमुखाच्या मते, गणीकांच्या कन्या व दासी या जरी कुमारिका असल्या तरी सातव्या प्रकारच्या नायिकाच होय.

गणादींय सांगतो की कुलीन घराण्यात जन्मलेली कोणतीही कन्या जेव्हा वयात येते तेव्हा ती अष्टमनायिका बनते.

मात्र वात्स्यायनाच्या मते या चार नायिका पहिल्या चार नायिकांहून वेगळ्या नाहीत . म्हणून चारच नायिका होय : कुमारिका, पुनर्विवाहित विधवा, वेश्या आणि विशेष कारणपरत्वे संबंध ठेवलेल्या स्त्रिया.

खालील स्त्रियांशी कधी संबंध ठेवू नये

महारोगी

मनोरुग्ण

जाती बाह्य निष्कासित

हलक्या कानाची (गुपित फ़ोडणारी)

चारचौघांत रतीसुखाची मागणी करणारी

अती गोरी

अती सावळी

दुर्गंधी असलेली

जवळच्या नात्यातली



मैत्रीण

साध्वी

नातेवाईक, मित्र, ज्ञानी ब्राह्मण आणि राजा यांची पत्नी

बभ्रव्याच्या मते जिला पाच पुरुषांनी भोगले आहे अशी स्त्री वर दिलेल्या यादीतली असेल तरी समागमास हरकत नाही. परंतु गणिकापुत्राच्या मते यातही नातेवाईक, मित्र, ज्ञानी ब्राह्मण आणि राजा यांच्या पत्नींचा अपवाद करावा.

मित्र म्हणजे कोण याची जी व्याख्या आहे :

ज्याच्याशी बालपणी मातीत खेळलो
ज्याचे माझ्यावर उपकार आहेत
ज्याच्या आवडी निवडी समान आहेत
सहाध्यायी
ज्याचे सर्व गुण दुर्गुण व गुपिते आपल्याला माहित आहेत आणि आपले सर्वकाही त्याला माहित आहेत
आपल्या दाईचा मुलगा
आपल्याबरोबर वाढलेला, आपल्याच वंशातला
या मित्रांत खालील गुण असावेत
सत्यवचनी
काळाबरोबर बदलणारे नसावेत
आपल्या आकांक्षांशी सुसंगत

आपल्या पाठीशी ठाम उभे रहाणारे
कटकारस्थानी नसावेत
दुसऱ्यांना वश होणारे नसावेत
आपली गुपिते बाहेर फ़ोडणारे नसावेत

चरायनाच्या मते गृहस्थांनी मैत्री करायला धोबी, न्हावी, मेंढपाळ, गोपाळ, माळी, औषध बनवणारे, पानवाले, खानावळवाले, भिक्षुक, पीठमर्द, वीत, विदूषक, आणि या सर्वांच्या पत्नी योग्य असतात.

स्त्रीला वश करण्याच्या कामी दूत हे महत्वाचे साधन आहे. अनेकदा हे दूत किंवा मध्यस्थच सर्वात महत्त्वाचे ठरतात.

दूतापाशी खालील गुण असावेत
कौशल्य
धैर्य
शारीरभाषेवरून (न बोलणाऱ्या) माणसाचे मन ओळखणे
निर्भिड, स्पष्ट
समोरच्या व्यक्तीच्या बोलण्याचा अर्थ समजण्याची कुवत
चांगल्या चालीरिती
कृती करताना काळ आणि वेळेचे भान
कामातले बारकावे
समज
प्रसंगावधान जुगाड करण्याची कला

हुषार, चतुर, शहाणा, ज्याला चांगले मित्र आहेत, ज्याला दुसऱ्याचे मन ओळखता येते, ज्याला काळ वेळ प्रसंगाचे भान असते, तो दुर्मिळातील दुर्मिळ स्त्रीला सहजपणे वश करू शकतो.





## विभाग दुसरा

## पाठ पहिला

समागमाचे प्रकार, शरीराचे आकार, इच्छाशक्तीचा आवेग, जोर आणि वेळेनुसार

मैथुनाचे प्रकार

व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणतात ना? प्रत्येकाचा चेहरा वेगवेगळा असतो. कुणाचा गोल, कवळा, गुबगुबित, कुणाचा राकट, दांडगा, खडबडीत. असतो ना? तसेच पुरुषांच्या लिंगाचे आकार वेगवेगळे असतात. आपल्या वात्स्यायन मुनींनी पुरुषांचे तीन प्रकार केले : ससा-पुरुष, बैल-पुरुष, आणि अश्वपुरुष

ससा म्हणजे गुबगुबीत, हळुवार, मऊ, चपळ.

बैल म्हणजे जाडजूड, चरबीयुक्त, मुसंडी मारणारा.

अश्व म्हणजे घोड्यासारखा दांडगा, वेगवान, घोटीव, शक्तीमान.

वात्स्यायनाने स्त्रियांचेही तीन प्रकार केले. तिन्ही सुंदर. स्त्रियांच्या योनीची खोली वेगवेगळी असते आणि त्यानुसार स्त्रियांचे तीन प्रकार, हरिण-स्त्री, घोडी-स्त्री आणि हत्ती-स्त्री. हरिणी, अश्विनी, हस्तिनी.

हरिणी म्हणजे नाजुक, चपळ, हळुवार.



हस्तिनी किंवा हत्ती म्हणजे पुष्ट, गुबगुबीत, (पु शी रेगेंच्या भाषेत सांगायचं तर) पुष्कळा, गोलाई युक्त.

अश्विनी किंवा घोडी म्हणजे दमदार, ताकदवान, उंच, सुडौल.

असे तीन पुरुष लिंगांचे प्रकार. आणि तीन स्त्री योनींचे प्रकार. आणि मग त्यांच्यात जेव्हा मैथुन होते तेव्हा नऊ प्रकारचे मैथुन होईल. अशा प्रकारे मैथुनातही मुनीवरांनी भुमिती आणि गणित आणलेच. मग त्यात त्यांनी दोन प्रकार केले. सम आणि विषम. सम म्हणजे योग्य प्रकारचे मैथुन, ज्यातून दोघांनाही स्वर्गीय आनंद मिळेल असे. आणि विषम म्हणजे ज्यात यातल्या एकाला किंवा दोघांनाही आनंद मिळणार नाही असा प्रकार.

अशा प्रकारच्या या वर्गांच्या तीन योग्य किंवा समसमागमांचे प्रकार पडतात

ससा- पुरुष आणि हरिणी-स्त्री

बैल-पुरुष आणि अश्वी –स्त्री

अश्व-पुरुष आणि हत्ती-स्त्री

आणि सहा विषमसमागमाचे प्रकार पडतात

ससा- पुरुष आणि अश्वी –स्त्री



ससा- पुरुष आणि हत्ती-स्त्री

बैल-पुरुष आणि हरिणी-स्त्री

बैल-पुरुष आणि हत्ती-स्त्री

अश्व-पुरुष आणि हरिणी-स्त्री

अश्व-पुरुष आणि अश्वी –स्त्री

विषम संगमांचेही दोन प्रकार होतात. जेव्हा लिंग योनीहून थोडे मोठे असते किंवा खुपच मोठे असते. आणि जेव्हा योनी लिंगाहून मोठी असते किंवा खुपच मोठी असते.

१) अश्व-पुरुष आणि अश्वी-स्त्री आणि २) बैल-पुरुष आणि हरिणी-स्त्री हे उच्च संगम असतात

आणि

३): अश्व-पुरुष आणि हरिणी-स्त्री हा अतीउच्च संगम असतो

तर

१) बैल-पुरुष आणि हत्ती-स्त्री आणि २) ससा-पुरुष आणि अश्व-स्त्री हे कनिष्ठ संगम असतात

आणि

३): ससा-पुरुष आणि हत्ती-स्त्री अतिकनिष्ठ संगम असतो.

बरोबरीचा संगम हा सर्वात योग्य संगम मानावा तर अतीकनिष्ठ व अतीउच्च संगम टाळावेत. इतर संगम हे मध्यम प्रकारचे मानावेत.

हे झाले लिंग आणि योनी यांची आकारानुसार केलेले वर्गीकरण. पण केवळ आकार म्हणजेच सर्वकाही नव्हे. आताच्या काळात फ़िजिक्सच्या नियमानुसार फ़ोर्स हा मास आणि ऍक्सिलरेशन यांच्या गुणाकारावरून ठरतो. चपळतेच्या बळावर एखादी बारिक व्यक्ती एकाद्या जाडजूड व्यक्तीला भारी पडते.

म्हणून तर वात्स्यायन कामेच्छा किंवा आवेगाच्या जोरावरून सुद्धा स्त्री आणि पुरुषांच्या मैथुनाचे प्रकार ठरवतात. वात्स्यायनाच्या मते कामेच्छेच्या शक्ती आणि आवेगानुसार स्त्री आणि पुरुषांचे तीन प्रकार पडतात.

पुरुषांचे तीन प्रकार : आत्यंतिक आवेग आणि जोर असनारे पुरुष, मध्यम आवेग असलेले पुस्रुष, आणि सुस्त हळुवार हालचालींचे पुरुष.

स्त्रियांचेही तीन प्रकार होतात : तीव्र कामेच्छा असलेल्या अतोनात आवेग असणाऱ्या स्त्रिया, संयमित इच्छा व आवेगावर नियंत्रण असलेल्या स्त्रिया, आणि अनिच्छा किंवा मैथुनात फ़ारसा रस नसलेल्या स्त्रिया.

सुस्त पुरुष : समागमाच्या वेळी जो फ़ार तेज नसतो, ज्याचे वीर्य पातळ असते आणि ज्यांचे आलिंगन सैल, हळुवार, हलकेच असते असा पुरुष. ज्यांचे वर्तन सुशील, मर्यादित आणि कोमल असते.

याहून वरच्या पातळी वरचे पुरुष मध्यम आवेगाचे असतात. यांची कामेच्छा कायम विचाराच्या आधीन असते आणि ते स्वतःवरचे नियंत्रण घालवून बसत नाहीत.

आत्यंतिक आवेगाचे पुरुष: ज्यांच्या समागमाचे वागणे अत्यंत धुसमुसळे असते, त्यांचे वीर्य घट्ट असते आणि आलिंगन घट्ट व आवेगपूर्ण असते. ज्याला आवरणे कठीण असते व जो मैथुनाच्या वेळी स्वतःवरचे नियंत्रण गमावू शकतो असा पुरुष.

अशाच प्रकारे आवेगानुसार स्त्रियांचे तीन प्रकार पडतात. सुस्त, मध्यम व आवेगी.

सुस्त स्त्रियांना मैथुनात फ़ारसा रस नसतो व एक कर्तव्य म्हणून त्या पतीच्या अधीन होतात. पण त्यांची हालचालींत फ़ारसा आवेग नसतो.

मध्यम स्त्रिया स्वतःच्या कामेच्छॆला स्वतःच्या बुद्धीच्या नियंत्रणात ठेवतात आणि सतत योग्यायोग्यतेनुसार वर्तन करतात.

आवेगी स्त्रियांना स्वतःच्या कामेच्छेला लागम घालणे पसंत नसते, व त्या बहुधा मैथुनाच्या क्षणी स्वत:वरचे नियंत्रण पूर्णपणे झुगारून आगीच्या ज्वालेवर झोकून देणाऱ्या पतंगाप्रमाणे कामरसात बुडून जातात.

अशा प्रकारे समागमाचे पुन्हा नऊ प्रकार होतात.



सुस्त पुरुष + सुस्त स्त्री= योग्य

सुस्त पुरुष + मध्यम स्त्री = कामचलाऊ

सुस्त पुरुष + आवेगी स्त्री = अयोग्य

मध्यम पुरुष + सुस्त स्त्री = कामचलाऊ

मध्यम पुरुष + मध्यम स्त्री = योग्य

मध्यम पुरुष + आवेगी स्त्री = कामचलाऊ

आवेगी पुरुष +आवेगी स्त्री = योग्य

आवेगी पुरुष + सुस्त स्त्री = अयोग्य

आवेगी पुरुष + मध्यम स्त्री = कामचलाऊ

आणि आधीच्या लिंग व योनीच्या आकारमानानुसार टाळायच्या समागमाप्रमाणेच प्रमाणेच आवेगातही आत्यंतिक दोन टाळावेत. आणि शक्यतो बरोबरीचे प्रकार संगमी असावेत.

समागमाच्या काळानुसार स्त्री आणि पुरुषांचे तीन प्रकार पडतात. लघु काळाचे, मध्यम काळाचे आणि दीर्घ काळाचे.

पुरुषांचे काळानुसार प्रकार : लघु, मध्यम, व विलंबित

स्त्रियांचे तीन प्रकार : मर्यादित, मध्यम व दीर्घ

लघु पुरुष म्हणजे ज्याला समागम झटपट आटोपायला आवडतो.

मध्यम म्हणजे ज्या पुरुषाला वेळाकाळाचे बंधन असते आणि तो एका विशिष्ट कालावधीत पतन पावतो.

विलंबित पुरुष म्हणजे ज्याला वेळाकाळाचे काहीच भान नसते व जो अतिशल दिर्घ काळ मैथुनात रममाण राहू शकतो.

मर्यादित स्त्री म्हणजे जिला दीर्घ काळाचा समागम सोसत नाही व जी लगेचच मैथुन आटोपतं घेऊ इच्छिते अशी स्त्री.

मध्यमा म्हणजे जी पुरुषाला थोडा अधिक वेळ देऊ शकते व स्वतः थोडा अधिक काळ आनंद घेऊ शकते अशी स्त्री.

दीर्घा म्हणजे जिचे कधीच समाधान होत नाही आणि कितीही काळ मैथुन केले तरी जी अतृप्तच रहाते.

यातही हेच मत सर्वसामान्यपणे मांडले जाते की दोन्ही जोडीदार समसमानच असावेत. पण यात मात्र एकमत नाही. काही मतभेदही आहेत.

औदलिक म्हणतो स्त्रियांचे पुरुषांप्रमाणे पतन होत नाही. त्यामुळे पुरुष त्यांची कामेच्छा पूर्ण करून सुख मिळवतात. तर स्त्रिया कामेच्छेच्या अनुभूतीतच सुख मिळवतात. त्यामुळे समागमाची सर्वोच्च अवस्था पूर्ण होताच पुरुष समाधान पावतो तर स्त्री त्यानंतरही अतृप्तच असते.

या मतावर पुन्हा दुमत आहे. इतरांचे मत आहे की पुरुष कामक्रिडा जितकी विलंब करतो तितका तो स्त्रियांना आवडतो. घाईघाई करणारे पुरुष कोणत्याच स्त्रियांना आवडत नाहीत. याचाच अर्थ स्त्रीसुद्धा स्त्रवत असावी.

या मतावर देखिल अनेकांचा आक्षेप आहे. कारण पुरुष जितका प्रलंब लावेल तितका तो स्त्रीला अधिक सुख देत रहातो. त्यामुळे स्त्रीच्या वेळॆला बंधन नसते. पुरुष जितके देईल तितके घेण्याची तिची शक्ती असते. त्यामुळे ती कायम अतृप्तच असते. म्हणजेच सर्वच स्त्रिया या दीर्घा असतात.

पुरुषांशी संगमातून स्त्रीची कामेच्छा, आवेग यांची तृप्ती होते आणि या तृप्ततेच्या जाणीवेतच तिला सुखाची प्राप्ती होते.

बभ्रव्याच्या शिष्यांचे मत अजूनच वेगळे आहे. ते म्हणतात की स्त्रीला समागमाच्या सुरुवातीपासूनच स्त्रावाला सुरुवात होते आणि जर स्त्राव नसेल तर गर्भधारणा होईलच कशी?

यावरही अजून एक दुमत आहे. ते हे की जसे पुरुषांचे मैथुनकालानुसार तीन प्रकार होतात तसे स्त्रियांचे तीन प्रकार होऊच शकत नाहीत. मात्र सर्वच स्त्रिया या दीर्घा असतात असेही म्हणणे योग्य नाही. संगमाच्या आरंभाला स्त्री ही मध्यमकाल असते. आणि त्यामुळे तीव्र आवेगाच्या आणि प्रलंबी पुरुषाच्या आवेगाना ती साहू शकत नाही. पण जसजसा समागम पुढे सरकतो तसतशी तिचा आवेग वाढत जातो. तिला स्वतःच्या शरीराचे भान रहात नाही. आणि तेव्हा मात्र आता अंत येऊच नये असे तिला वाटू लागते. तिला बेभान अवस्था प्राप्त होते.

पण हेही पूर्णपणे खरे नाही. कारण अगदी सर्वसाधारण गतीचे नियम सांगतात की सर्व गतीमान वस्तू, जसे की कुंभाराचे चाक, सुरुवातीला कमी गतीत फ़िरते, आणि एकदा गती लाभली की ती थांबवणे कठीण असते. पण गतीला मिळणारी शक्ती संपली की चक्र थांबतेच. अशा प्रकारे पुरुषाने दिलेली गती पुरुषाची गती थांबल्यावर आपोआप थांबते.

श्लोक: पुरुषाचे वीर्यपतन समागमाच्या अंती होते तर स्त्रीचा स्त्राव सुरुवातीपासून अंतापर्यंत सुरूच असतो. आणि अंततः स्त्राव थांबताच दोघेही तृप्त होऊन समागम थांबवतात.

वात्स्यायनाच्या मते स्त्रियांच्या स्त्रावालाही पुरुषाच्या पतनाप्रमाणेच अंत असतो.

आता काहींना हा प्रश्न पडला असेल की : जर स्त्री आणि पुरुष दोघेही सारखेच असतात आणि समान आनंद मिळवतात तर दोघांच्या क्रिया वेगवेगळ्या का असाव्यात?

वात्स्यायन म्हणतो की दोघांच्या क्रिया व सुखाच्या जाणीवा वेगवेगळ्या असतात. कृतीं वेगवेगळ्या असतात. त्यामुळे पुरुष हे कर्ते असतात तर स्त्री ही कर्म करून घेणारी असते. निसर्गाने केलेली ही रचना आहे नाहीतर कर्ता हा कर्म करून घेणारा होईल. कृतींच्या या फ़रकामुळेच सुखाच्या अत्युच्च क्षणी पुरुष हा विचार करतो की “ही स्त्री माझ्यात सामावली आहे”, आणि स्त्री विचार करते “या पुरुषात मी सामावले आहे”.

मग एक दुसरा प्रतिवादही होऊ सकतो . : जर स्त्री आणि पुरुषांच्या कृतींमध्ये जर फ़रक असतो तर दोघांच्या सुख जाणिवांमध्येही फ़रक असायला हवा. कारण कृती करणाऱ्याला जो आनंद मिळेल तोच कृती घेणाऱ्याला कसा मिळेल?

पण या प्रतिवादाला काही आधार नाही. कारण कृती करणारा आणि कृती करून घेणारी यांच्या हालचालींमध्ये जरी फ़रक असला तरी त्यांना येणारी सुखाची अनुभूती एकच असते. कारण निसर्गतः त्याच कृतीतून त्यांना सुख मिळते.

पुन्हा एक नवीनच वादाचा मुद्दा. जर पुरुष आणि स्त्री संगमातून त्या कृती करून सुख मिळवतात तर दोघांनाही एकाच वेळी या सुखप्राप्तीची अनुभूती व्हायला हवी. पण तसे होत नाही . पण यात एक चूक आहे. मेंढ्यांच्या लढाईत जेव्हा एक मेंढा दुसऱ्या मेंढ्याकडे धावून जाऊन टक्कर देतो, तेव्हा जितकी वेदना टक्कर घेणाऱ्याला होते तितकीच टक्कर देणाऱ्यालाही होते. एक लाकडी फ़ळ दुसऱ्यावर आपटले तर दोन्हीही फ़ुटतात. आणि दोन कुस्तीगीर जेव्हा लढतात तेव्हा दोघांनाही लागते. तसेच जेव्हा एक स्त्री किंवा एक पुरुष एकमेकांवर काही कृती करतात तेव्हा दोघांनाही सुख लाभते.

जर पुरुष आणि स्त्री समसमान असतील तर त्यांना रतीसुख समसमान मिळते आणि म्हणून पुरुषाने अशाच स्त्रीशी विवाह करावा जी मैथुनाचा काळ संपल्यानंतरही त्यावर प्रेम करत राहील.

अशा प्रकारे हे सिद्ध झाल्यावर की रतीक्रिडेतून स्त्री आणि पुरुषाला समसमान सुख मिळते, त्यांच्या वेळेच्या प्रलंबनानुसार रतिक्रिडेचे नऊ प्रकार पडतात.

काळाच्या विलंबानुसार रतिक्रियेचे तीन प्रकार आणि त्यात पुन्हा स्त्री आणि पुरुषाचे तीन तीन प्रकार, त्यांच्या आवेगाचे तीन तीन प्रकार आणि त्यांच्या वेळेच्या प्रलंबनाचे तीन तीन प्रकार यातून रतिक्रिडांचे असंख्य प्रकार बनतात. लाखो प्रकार समजा ना. आणि म्हणून प्रत्येक वेळी पुरुषाने त्या त्या प्रसंगाला योग्य असे साधन वापरावे.

पहिल्या संभोगात सुरुवातीला पुरुष अतीउत्सुक आणि तीव्र कामेच्छेने आवेगपूर्ण वागतो. त्यावेळी स्त्री शंकित आणि काहीशी बावरलेली असते. या उलट जसजशी रात्र चढत जाते, तसतसा पुरूष मलूल होत जातो आणि स्त्रीची कामेच्छा प्रदिप्त होत जाते. त्यामुळे सुरुवातीच्या संगमांत स्त्रीचा आवेग कमी आणि वेळ प्रलंबित असते तर नंतर नंतर स्त्रीचा आवेग वाढत जातो आणि तिला रतिसुखाच्या परमोच्च बिंदूची घाई लागते.



## प्रेमाचे प्रकार

पंडितांनी प्रेमाचे चार प्रकार सांगितले आहेत

नित्य सवयीने सहवासाने घनिष्टतेने  उत्पन्न होणारे प्रेम

कल्पनाविलासाने ऐकीव माहितीतून मनोमन  निर्माण झालेले प्रेम

विश्वासातून, अनुभवाने  निर्माण होणारे प्रेम

बाह्य वस्तूंच्या आकर्षणातून निर्माण होणारे प्रेम.

नित्य सवयीने उत्पन्न होणारे प्रेम : याला सहवासाचे प्रेमही म्हणता येईल. एखादी गोष्ट नित्य करत राहिल्याने निर्माण होणारे प्रेम, जसे शिकारीची, द्युताची सवय , किंवा संभोगाची सवय, सुरापानाची सवय, इत्यादी. (व्यसन). तसेच एखादी स्त्री नित्य डोळ्यांसमोर राहिल्याने किंवा एखाद्या पुरुषाशी सतत सहवासात राहिल्याने प्रेम उत्पन्न होते व आकर्षण जागे रहाते.

कल्पनाविलासाने निर्माण झालेले प्रेम : कधीकधी निव्वळ चित्र पाहून पडायला होतं ना! किंवा नुसता तो खर्जाचा आवाज ऐकूनच भान हरपतं? किंवा कोणाकडून तरी वर्णन ऐकून एखाद्या पुरुषाबद्दल स्त्रीला किंवा एखाद्या स्त्रीबद्दल पुरुषाला प्रेम वाटू लागतं. हे असतं न पाहिलेल्या वस्तू, कृती किंवा व्यक्ती यांची केवळ कल्पनारंजन करून, नाविन्यामुळे वाटणारे आकर्षण, प्रेम. उदा. काही

स्त्री पुरुषांना मुखसंभोगाचे आकर्षण वाटणे, किंवा आलिंगन , चुंबन यांच्या केवळ विचाराने किंवा कल्पनेने मनात तरंग उमटतात. यातच परदानशीन व्यक्तीबद्दलचे आकर्षणही येते.

विश्वासातून निर्माण होणारे प्रेम : एखाद्या व्यक्तीचा चांगला अनुभव येतो. तिची मदत होते. आणि मग प्रेम वाटू लागते. पुरूष आणि स्त्री भेटल्यावर, किंवा वागणूकीतून विश्वास निर्माण झाल्यावर वाटणारे उबदार प्रेम या प्रकारात मोडते. हे व्यवहार किंवा मदतीमुळे निर्माण होणारे प्रेम.

बाह्य वस्तूंच्या आकर्षणातून निर्माण होणारे प्रेम. : याचाही अनुभव सर्वांनाच असतो. वस्त्रे, रंग, गंध, आभूषणे, मेहंदी, बिंदी, नथनी, पायल किंवा शरीराचे उठावदार आकार यामुळे आकर्षण उत्पन्न होणे साहजिक असते. एकाद्या सुंदर स्त्रीने वापरलेल्या वस्त्रांप्रमाणेच दुसरी स्त्री वस्त्रे प्रावरणे वापरते ज्यामुळे पुरुषाला या स्त्रीमध्ये त्या स्त्रीच्या अंगप्रत्यंगांचा भास होतो. यातून मिळणारे सुख हे इतर सुखांच्या मानाने उच्च असते आणि शुद्ध असते. पुरुषही कधी कधी स्त्रियांना आवडतील अशी वस्त्रे व केशरचना करतात.

आतापर्यंत समागमाविषयी या विभागात जे सांगितले त्यानंतर सूज्ञांना अधिक सांगण्याची गरज नाही. परंतू इतर लोकांसाठी संभोगकृतीबद्दल पुढे काही गोष्टी अधिक उलगडून सांगितल्या आहेत. त्यांचा आस्वाद घ्यावा.



## विभाग दोन : पाठ दुसरा

### आलिंगनाविषयी

कामक्रीडांचे वर्णन करणाऱ्या कामशास्त्राच्या या विभागाला चतुषष्ठी असेही म्हणतात. काहींच्या मते यात चौसष्ट भाग असल्यासहळे याला चतुषष्ठी म्हणतात. काहींच्या मते या भागाचा लेखक पंचला हा दशपाठी ब्राह्मण होता आणि ऋग्वेदांचा अभ्यासक. ऋग्वेदाचे चौसष्ठ पाठ असल्यामुळे पंचलाने ऋग्वेदाच्या समर्पणाला स्मरून या भागाला चतुषष्ठी हे नांव दिले असावे.  बभ्रव्याचे मत असे की यात आठ विषय आहेत. आलिंगन, चुंबन, बोचकारणे, चावणे, पहुडणे, ध्वनी करणे, स्त्रीने पुरुषीपणा करणे (सोंग घेणे) आणि औपरिष्टक किंवा मुख संभोग. या प्रत्येक विषयात आठ रिती सांगितल्या आहेत. आठ गुणीले आठ म्हणजे चौसष्ठ.  परंतू वात्स्यायन मात्र मानतो की यात आठाहून अधिक विषय जसे मारणे, रडणे, रतिक्रिडेत पुरुषाने करायची इतर कामे यांचाही समावेश आहे आणि त्यामुळे चतुषष्ठी हे नांव असेच विनाकारण पडले असावे.

उदा. जसे सप्तपर्ण वृक्षाला सात पाने नसतात किंवा पंचवर्ण म्हणजे तांदुळ कधी पाच रंगांचा नसतो. तसेच हे नांवही विनाकारण पडले असावे.

असो. आपण आता चतुषष्ठीला सुरुवात करत आहोत आणि  आलिंगन हा पहिलाविषय आहे.

आलिंगन

आलिंगन म्हणजे मिठी. शरीराच्या जास्तीत जास्त भागाचा समोरच्याच्या शरीराच्या बहुतांश भागाशी संपर्क आणणे. आलिंगन. मिठी. झप्पी.

आलिंगनातून स्त्री पुरुषांचे एकमेकांबद्दलचे प्रेम, आसक्ती, आकर्षण, अभिलाषा व ओढ व्यक्त होते.

बभ्रव्याने आठ आलिंगन प्रकार सांगितले आहेत.

त्यात मैथुनपुर्व आलिंगनाचे चार प्रकार दिसतात.

स्पर्शालिंगन

घर्षणालिंगन

कंटकालिंगन

भित्तीआलिंगन

खरे तर नांवावरूनच सारे स्पष्ट होते ...



स्पर्शालिंगन : एखादा पुरुष स्त्रीच्या अवती भवती जाऊन काही ना काही मिषाने आपल्या शरीराच्या एखाद्या भागाने तिच्या शरीराराच्या एकाद्या भागाला ओझरता स्पर्श करतो तेव्हा ते स्पर्शालिंगन होय.  हे सहसा अनोळखी किंवा नवीन ओळख झालेल्या जोडप्यात होते. हा स्पर्श मुद्दाम केला की अभावितपणे ओघाओघात झाला याचा संभ्रम राहून जातो.

कंटकालिंगन : स्पर्शालिंगनाच्या किंचित पुढचा भाग. पुरुष बसलेला किंवा उभा असताना, स्त्री त्याच्या जवळ जाऊन काहीतरी उचलण्याच्या बहाण्याने खाली वाकून आपल्या स्तनाग्रांनी त्याला टोचते आणि अशावेळी त्याने तिच्या स्तनांना स्पर्श करून हलकेच धरावे.  याला कंटक आलिंगन म्हणतात.  थोडीशी ओळख झालेली असताना ती पुढे सरकवण्यासाठी असे करणे आवश्यक असते.

वर सांगितलेले हे दोन्ही प्रकार नवथर परिचय असताना करायचे असतात. याउलट खाली दिलेले प्रकार हे जवळ आलेल्या, मने जुळलेल्या आणि जुळल्याचे जाणवलेल्या जोडप्यांत होतात.

घर्षणालिंगन : जेव्हा दोन प्रेमिक अंधाऱ्या वाटेवर किंवा बागेत फ़िरत असतात तेव्हा एकमेकांच्या अवयवांना अनाहूतपणे स्पर्श झाल्यासारखे अंग घासतात. त्याला घर्षणालिंगन असे म्हणतात. यात ओढ असते. वात पेटवताना होणारी थर्थर असते. पण एकमेकांच्या ओढीची आणि पुढल्या क्षणाची विश्वासपूर्ण कात्री नसते.

भित्तीलिंगन : जेव्हा प्रेमिक प्रेमाच्या आवेगात असतात आणि त्यातील एक जण जेव्हा दुसऱ्याचे शरीर भिंत किंवा खांबावर दाबून धरतो (किंवा धरते) आणि आपल्या संपूर्ण शरीराने त्याचे किंवा तिचे शरीर सर्वशक्तीनिशी चेपते तेव्हा त्याला त्याला भित्ती आलिंगन म्हणतात

ही दोन्ही आलिंगने प्रेमसूचक असतात आणि एकमेकांची अंतरे जाणणाऱ्या प्रेमिकांनाच शोभतात.



मैथुनांतर्गत प्रेमालिंगनांचे चार प्रकार असतात

लतावेष्टितक :
वृक्षधिरोधक
तिळ-तांदुलक
क्षिरनीरक

लतावेष्टितक : जेव्हा प्रेयसी प्रियकराला अशी लिपटते जसे की वृक्षाला वेल. आवेगातली बेभान प्रिया त्याचे मुख खाली वाकवून त्याला चुंबनाला प्रवृत्त करते. सोबत किंचित सट् सट् असा आवाज करून त्याच्या डोळ्यांत डोळे घालून प्रेमाने पहाते तेव्हा त्याला म्हणतात लतावेष्टितक.

वृक्षधिरोधक : जेव्हा प्रेयसी प्रियकराच्या एका पायावर आपला एक पायाचा चवडा (नुसती बोटे) ठेवून स्वतःला उंचावते, दुसरा पाय त्याच्या मांडीवर मुडपून ठेवते, डावा हात त्याच्या कमरेभोवती वेटाळते आणि उजव्याने त्याच्या खांद्यावरून त्याच्या मानेभोवती हुकसारखी लटकते, आणि जणू काही एखाद्या वृक्षावर चढायची तयारी आहे असा अविर्भाव करते त्याला वृक्षधिरोधक आलिंगन म्हणावे. अधीर प्रेयसी असे आलिंगन देते तेव्हा प्रियकाराने तिला खंबीर आधार द्यायचा असतो.

वरील दोन्ही आलिंगने उभ्याने करायची आहेत.

तिळ-तांदुलक आलिंगन : या आलिंगनात प्रियकर प्रेयसी मंचकावर चिकटून पहुडलेले असतात. अतिशय आसासून केलेल्या प्रितीच्या भरात ते दोघेही मांड्यांनी एकमेकांच्या मांड्यांना असा विळखा घालतात, अत्यंत आवेगाने असे घासतात जसे की तिळांत मिसळलेले तांदूळ. कोणी

यांना वेगळे करू जाईल तर ते अवघड असते. म्हणून या आलिंगनाला तिळ-तांदुलक आलिंगन म्हणतात

क्षिरनीरक : ही आलिंगनाची सर्वोच्च अवस्थाच समजा. यात प्रिया प्रियकराच्या मांडीवर बसलेली किंवा मंचकावर त्याच्यासोबत असते. आणि ते दोघे एकमेकांना असे लिपटलेले जसे की एकमेकांच्या आत आत खोलवर शिरण्याचा प्रयत्न करत आहेत. एकमेकांत विलीन व्हायचा प्रयत्न करतात. दो जिस्म मगर एक जान म्हणावे तसेच. हे आलिंगन इतके तीव्र, घट्ट आणि आवेगपूर्ण असते की त्या दोघांना वेगळे करणे एकमेकांत विरघळलेल्या पाणी आणि दुधाला वेगळे करण्याइतके अशक्य असते. म्हणून त्याला  क्षीरनीरक आलिंगन म्हणतात.

ही दुसरी दोन आलिंगने संभोगाच्या आधीची आलिंगने असतात.



सुवर्णाभाने शरीराच्या चार अंगांची चार वेगवेगळी आलिंगने सांगितली आहेत. ती खालीलप्रमाणे :

मांड्यांचे आलिंगन

जांघेचं आलिंगन

स्तनालिंगन

कपोलालिंगन

प्रियकर प्रेमाच्या भरात आपल्या सखीच्या दोन्हीही मांड्या किंवा एक मांडी आपल्या दोन मांड्यामध्ये धरून आवळतो. त्यास मांड्यांचं आलिंगन म्हणतात. कधी सखी आपल्या प्रियकरालाही तसंच आपल्या मांड्यांच्या आकड्यात अडकवून ठेवते.

जेव्हा मंचकावर पहुडलेल्या प्रेयसीच्या मध्यभागावर प्रियकर आपला मध्यभाग दाबून धरतो, आणि तिच्या कोमल निर्वस्त्र शरीरावर नखे आणि दातांचे व्रण उमटवतो आणि तिचे मोकळे पसरलेले केस चुंबता चुंबता तिला हैराण करून सोडतो. त्यास जांघेचं आलिंगन म्हणतात.

जेव्हा पुरुष आपली छाती मादीच्या स्तनांच्या मध्ये दाबून धरतो सुखाच्या अतिरेकात उरोजांवरचा दबाव वाढवता वाढवता तिला असे आवळतो की सगळा जोर स्तनांवर येतो. तेव्हा त्याला स्तनालिंगन म्हणतात.

जेव्हा प्रिया आपल्या प्रियकराचा चेहरा प्रेमभराने रेशमी ओंजळीत धरून त्याच्या कपाळाला आपले कपाळ, त्याच्या डोळ्यांना आपले नेत्र, आणि त्याच्या ओठांना आपले अधर जुळवून दाबते तेव्हा ते कपोलालिंगन असते.

काहींच्या मते केस धुणे ( पुरुषाने स्त्रीचे किंवा स्त्रीने पुरुषाचे) हेही एक प्रकारचे आलिंगनच होय. पण वात्स्यायन मानतो की केस धुणे हे वेगळ्या कारणासाठी, वेगळ्या वेळी आणि वेगळ्या प्रकाराने केले जाते आणि त्यामुळे त्याला आलिंगन म्हणता येणार नाही.

आलिंगनाचा विषयच असा आहे की त्याबद्दल विचारणा करणारे पुरुष त्याची माहिती घेताना आणि त्याबद्दल ऐकतानाच खुप सुख प्राप्त करतात. ज्या आलिंगनाने प्रेम वाढते आणि रतीसुखाला भरती येते अशी अनेक इतरही आलिंगने आहेत आणि समागमाच्या वेळी त्यांचाही सढळ हस्ते उपयोग करायला हरकत नाही. एकदा का मैथुनाच्या चक्राला वेग आला की काय योग्य आणि काय अयोग्य हे ठरवणार तरी कोण? तिथे कसले कामशास्त्र आणि विरामशास्त्र?





विभाग दुसरा : पाठ तिसरा

चुंबन चिकित्सा

असे म्हटले जाते की आलिंगन, चुंबन, दाबणे, आणि नखांनी किंवा बोटांनी बोचकारणे या संभोगाच्या आधीच्या क्रिया असतात आणि मारणे, ध्वनी करणे, या गोष्टी संभोग सुरु असताना करायच्या गोष्टी असतात. मात्र वात्स्यायन असे मानत नाही. तो म्हणतो की प्रेमालापाच्या वेळी आधी काय आणि नंतर काय याचे नियम लावणे अयोग्य आहे.

समागमाच्या सुरुवातीच्या दिवसांत चुंबन आलिंगनादी गोष्टी मध्यम स्वरूपातच आचराव्या. फ़ार वेळ त्यांत घालवू नये. आणि सर्व प्रकारांचा मारा एकदम तर करूच नये. ही अस्त्रे हातची राखून ठेवावीत आणि भात्यात जपून ठेवावीत. प्रेम जेव्हा जुने होत जाईल तेव्हा कामेच्छेची भावना जागी करण्यासाठी यातल्या एका एका कामबाणाचा हळूच वापर करावा.

चुंबनासाठी कोणतीच जागा वर्ज्य नाही. मुख्यतः कपाळ, डोळे, पापण्या, छाती, स्तन, अधर, आणि मुखाचा अंतर्भाग म्हणजे जीभ व दात ही चुंबनाची मुख्य स्थाने. लाटदेशातील लोक मांड्यांचा आतला कोवळा भाग, दंड, आणि बेंबी या जागा चुंबनाची मुख्य स्थाने मानतात. मात्र वात्स्यायनाचे मत असे की त्या देशातील कामक्रीडेच्या आवेशात या ठिकाणी चुंबने घेतात, पण इतर देशांतील स्त्री-पुरुषांनी चुंबनात संयम बाळगावा.

तरूण स्त्रीयांच्या दृष्टीतून चुंबनाचे तीन प्रकार पडतात

हळुवार चुंबन



धडधडते चुंबन

स्पर्शचुंबन

जेव्हा एक तरूण स्त्री पुरुषाला तिच्या ओठांना फ़क्त ओझरता निसटता स्पर्श करू देते, विरोध करत नाही, पण स्वतः त्यात भाग घेत नाही तेव्हा ते वरवरचे हळुवार चुंबन असते.

जेव्हा एखादी तरुणी आपली लज्जा किंचितशी (म्हणजे किंचितशीच) बाजूला सारून जेव्हा आपल्या ओठांवर टेकलेल्या ओठांना स्वतःहून स्पर्श करते आणि आपला खालचा ओठ आमंत्रणादाखल पुढे करते मात्र वरचा ओठ ढिम्म हलू देत नाही तेव्हा त्यास धडधडते चुंबन असे म्हणतात.

जेव्हा तरुणी स्वतःहून आपल्या प्रियकराच्या तप्त रसरसलेल्या ओठांना आपल्या ओल्या जिभेने स्पर्श करते आणि त्या भरात त्याच्या हातावर आपला हात टेकवते तेव्हा त्याला स्पर्शचुंबन असे म्हणतात.

अनेक विद्वानांच्या मते चुंबनांचे चार प्रकार असतात

सरळ चुंबन

वक्रचुंबन

आडवे चुंबन



दाबलेले चुंबन

जेव्हा दोन प्रेमिकांचे ओठ एकमेकांच्या ओठांना सरळ स्पर्श करतात तेव्हा ते सरळ चुंबन असते. हे म्हणजे अग्दीच प्राथमिक स्वरूपाचे समजा.

जेव्हा प्रेमिकांचे चेहरे एकमेकांकडे झुकलेले असतात आणि अशा झुकलेल्या स्थितीत घेतलेल्या चुंबनाला वक्री चुंबन म्हणतात.

जेव्हा आपले शरीर प्रियकराच्या आधीन करून सैलावलेल्या प्रियेचा चेहरा प्रियकर आपल्या ओंजळीत धरून वर उचलतो आणि अशा आडव्या चेहऱ्यावरच्या ओठांचे चुंबन घेतो त्याला आडवे चुंबन म्हणतात.

जेव्हा अनावर पिसाटलेला प्रियकर किंवा प्रेयसी सर्व जोर एकवटून जोडीदाराच्या ओठांवर ओठ दाबून चुंबन घेते किंवा घेतो किंवा दोघेही एकमेकांचे घेतात तेव्हा ते दाबलेले चुंबन असते.

एक पाचवाही प्रकार आहे. तो म्हणजे झपाटलेल्या अवस्थेतले अति दाबाचे चुंबन. राकट पुरुष प्रेयसीचा खालचा ओठ दोन बोटांच्या चिमटीत पकडून त्याचे आत्यंतिक जोरात चुंबन घेतो त्याला अतिदाबाचे चुंबन म्हणतात.

चुंबनांचे क्रिडाप्रकारही असतात. उदाहरणार्थ कोण कुणाचा खालचा ओठ स्वतःच्या दोन ओठांनी पकडतं. जो पकडेल तो जिंकला. मग या क्रीडेत सहसा (पण सहसाच, काही पुरंध्री यात खुपच हुश्शार असतात) पुरुषच जिंकतो. तो जिंकला की प्रियेने खोट्टं खोट्टं रागावून तोंड फ़िरवावं

आणि अबोला धरावा. मग तो पुन्हा खेळण्याची संधी देईल. तेव्हा पुन्हा हरावं. असं दोन तीनदा हरल्यावर फ़णकारून निघून जावं. आणि नंतर तो बेसावध किंवा झोपेत असताना, त्याचा खालचा ओठ आपल्या दातांनी असा दाबून धरावा की त्याला सुटताच येऊ नये. आणि मग तिने हसावे, किंचाळावे आनंदाने बेभान होऊन नाचावे, डोळ्यांचे नेत्रकलाप करावेत. भुवयांचा नाच करावा. अशा प्रकारे चुंबनाचा वापर करून अतिशय आवेगपूर्ण समागमाचा आनंद मिळवता येतो. हे केवळ एक उदाहरण आहे. अशाच तंत्रांचा चतुराईने व स्वप्रतिभेने वापर करून नखे लावणे, गुदगुल्या करणे, मारामारी करणे, आणि लटके रुसवे फ़ुगवे करून प्रेमक्रिडेत खुप खूप आनंद निर्माण करता येतो.

जेव्हा पुरूष  मैत्रिणीचा वरचा ओठ चुंबतो, आणि ती त्याचा खालचा ओठ खुणेपुरताच चुंबते तेव्हा त्याला वरच्या अधराचे चुंबन म्हणतात.

जेव्हा प्रेमी युगुलांपैकी भरात आलेला एक जण धुसमुसळेपणाने दुसऱ्याचे दोन्ही ओठ आपल्या दोन ओठांनी आवळतो तेव्हा त्याला कब्जाचे चुंबन म्हणतात. मात्र भरदार मिशीवाल्या पुरुषाचे  असे चुंबन घेताना  स्त्रीला मिशांचा अडथळा येतो.

कधी कधी उन्मादाच्या टोकाला असताना असे चुंबन घेताना जर त्यात दात, जीभ आणि संपूर्ण मुखाचा समावेश झाला तर ती एक मेजवानीच असते. त्याला भांडखोर चुंबन म्हणतात. मात्र दात आणि मुखाचे चुंबन दबाव देऊन घेण्यासाठी सवयीची गरज असते.

चुंबनाचे दुसरेही चार प्रकार असतात

समतोल चुंबन

चंबुचुंबन

दबावाचे चुंबन

हलकेच चुंबन

अशा चुंबनांच्या शरीरावरच्या जागाही वेगवेगळ्या असतात. आणि त्यांचे प्रयोजनही वेगवेगळे असते. म्हनजे चुंबनांचे एक भाषाशास्त्रच असते म्हणा ना.

जेव्हा पुरूष गाढ झोपेत असतो आणि कामेच्छेने तळमळणारी स्त्री त्याला जागे करण्यासाठी हळुवार चुंबने घेते त्याला कामाग्नी चेतवणारे चुंबन म्हणतात.

जेव्हा पुरूष त्याच्या कामात मग्न असतो, किंवा रुसलेला असतो,किंवा त्याचे प्रेयसीकडे दुर्लक्ष असते तेव्हा प्रेयसी त्याला हळूवार मऊशार चुंबन देऊन त्याचे चित्त विचलित करते त्याला चित्तवेधक चुंबन म्हणतात.

कधीतरी पुरूष कार्यकलाप आटोपून खूप उशीरा रात्री घरी येतो. पहातो तर पत्नी गाढ निद्रेच्या आधीन. निद्रिस्त पत्नीच्या चेहऱ्याचे तो हलकेच चुंबन घेतो, अणि नंतर किंचित विलग अशा अधरांचे चुंबन घेऊन तिला जागी करतो . याला जागृतीचे चुंबन म्हणतात. पती उशीरा घरी आला, तर पत्नीने मुद्दाम झोपेचे सोंग घेऊन रहावे, म्हणजे त्याची मनिषा तिला कळेल.

एक यौवना जेव्हा आपल्या आवडत्या व्यक्तीच्या प्रतिबिंबांची, सावलीचे, किंवा चित्राचे चुंबन घेते तेव्हा त्यातून तिची सुप्त मनिषा समजून घ्यायची असते. त्याला म्हणावे “मनिषा चुंबन”

जेव्हा एक स्त्री एका पुरुषासमोर एखाद्या मुलाचे, किंवा चित्राचे किंवा एखाद्या आकृतीचे चुंबन घेते तेव्हा तिला आपली कामना व्यक्त करायची असते. चाणाक्ष पुरुषाने ते “समजून” घ्यायचे असते. अशा चुंबनाला म्हणावे अपरोक्ष चुंबन.

नाटकशाळेत, किंवा महाजनांच्या सभेत, जेव्हा एक पुरुष एका स्त्रीच्या बोटाचे किंवा ती बसलेली असेल तर तिच्या पायाच्या बोटांचे चुंबन घेतो, किंवा केस धुताना स्त्री पुरुषाच्या मांडीवर थकल्यासारखे डोके ठेवून मांडीचे चुंबन घेते तेव्हा ते लक्षवेधी चुंबन असते.

यावर एक श्लोक आहे तो असा...

प्रेयसी जे करील , प्रियकराने त्याच भाषेत तिला प्रतिसाद द्यावा. जर प्रेयसीने चुंबन दिले तर त्यानेही तिचे चुंबन घ्यावे. जर प्रेयसीने चापटी मारली तर त्यानेही तिला प्रेमाने चापटी मारावी.







## विभाग दुसरा : पाठ तिसरा

### दाबणे, खुणा करणे, आणि बोचकारणे

जेव्हा प्रेमाचे भरते येते, तेव्हा नखांनी आणि बोटांनी प्रियकर किंवा प्रेयसीच्या अंगांगांवर खुणा उमटवणे घडते. हे कधी होते? कधी पहिल्या भेटीत, कधी प्रवासाला निघताना, कधी दूरच्या प्रवासावरून विरहाने व्याकूळ होऊन आल्यावर, कधी भांडण, रुसवा संपताना, तर कधी प्रेयसी अंमली पदार्थांच्या अंमलाखाली असेल तेव्हा असे घडते.

पण नखोड्या मारणे हे क्वचितच असावे. प्रेमाची अतीशय अतीव तीव्रता असेल तेव्हाच. आवेगाचा भर आल्यावरच. आणि प्रेयसी किंवा प्रियकराला साहवेल तेव्हाच बरं का! नाहीतर नखं मारणं आणि चावणं यांचा भलताच परिणाम होऊ शकतो.

नखांनी बोचकारण्याचे आठ प्रकार वात्स्यायनाने सांगितले आहेत.

आवाज करून ( खर्खर किंवा खसखस)

अर्धचंद्र

पूर्णचंद्र

रेखा

वाघनखं किंवा पंजा

w



मयुरपंजा

सशाची उडी

नीलकमलपत्र

नखं मारण्याच्या जागा : काखेत, गळ्याखाली, स्तनांवर, जांघेमध्ये, शरीराच्या मध्यभागी, मांड्या. पण सुवर्णाभ म्हणतो की प्रेमाने वेडापिसा बेभान झालेली व्यक्ती जागा बिगा न बघता नखंनी ओरबाडते अशा वेळी जागेची निवड न केलेलीच बरी.

या नखोड्या मारायला नखं कशी असावीत? नखांची नीट काळजी घ्यावी. स्वच्छ. नीट घासलेली, चमकदार, न तुटलेली, बाह्यवक्र(फ़ुगीर). मऊ, दिसायला चकचकीत अशी नखं असावीत. स्त्रीने नखं रंगवावीत.

नखांचे तीन प्रकार असतात.

लहान

मध्यम

आणि मोठी

बंगाली पुरुषांची नखं आकाराने मोठी असतात आणि अशा पुरुषांकडे स्त्रिया आकृष्ट होतात.

दक्षीणेकडच्या प्रांतातला लोकांची नखं लहान असतात आणि त्यांना नजाकत आणि कौशल्याने वापरल्यास सुखाचा भरपूर लाभ होतो.

महाराष्ट्र प्रदेशातील लोकांची नखं मध्यम आकाराची असतात आणि त्यामुळे हे दोन्ही फ़ायदे त्यातून घेता येतात.

हळूवार नखांनी हनुवटी, स्तन, खालचा ओठ, आणि जांघेसारख्या हळव्या ठिकाणी हलकेच खरखर आवाज केला, पण त्यांचा ओरखडा मात्र उठू दिला नाही तर प्रेयसीचे ( किंवा प्रियकाराचे) सारे शरीर रोमांचित होते, गात्रांतली संवेदना जागी होते व अंगावरची लव ताठ उभी रहाते. तेव्हा म्हणायचं ध्वनीचा ओरखडा. अनेकदा प्रियकर प्रेयसीचे केस धुतांना हे करतो व तिला आणि त्याला सुखाची प्राप्ती होते.

जेव्हा गोलाकार नखांनी गळा किंवा स्तनांवर दाब दिला असता कोमल त्वचेवर लालस रंगाची अर्धचंद्राच्या कोरीसारखी आकृती निर्माण होते तेव्हा तिला म्हणावे अर्धचंद्रनक्षी.

जेव्हा दोन बोटांच्या चिमटीत मृदू स्तनाग्र किंवा हनुवटी धरून दाबतो, तेव्हा कोवळ्याशा जागी दोन नखांचे दोन अर्धचंद्र मिळून एक सुंदरसा गोलाकार बनतो. तिला म्हणावे चांद्रनक्षी.

नखाच्या निमुळत्या टोकाने शरीराच्या कोणत्याही मुलायम भागी काढलेल्या लांबच लांब ओरखड्याला म्हणावे रेखानक्षी.

जर ती रेखानक्षी वळणदार असेल नर म्हणावे व्याघ्रनक्षी.

कुशल प्रियकर प्रेयसीच्या स्तनांना आवळताना पाचही बोटांनी एक नक्षी काढतात. तिला म्हणावे मयुरनक्षी. हे कौशल्याचे काम आहे.

अगदी अशीच नक्षी पण स्तनांच्या अग्राभोवती चिमुकली , जणू पाच पाकळ्यांचे फ़ूल, तिला म्हणावे सशाच्या पायाची उडी नक्षी

पाचही राकट बोटे गोऱ्या नितंबांवर निर्दयपणे दाबून धरली असता त्यांची जेव्हा निळी नक्षी उमटते तिला म्हणावे नीलकमलपत्रनक्षी.

प्रवासाला निघताना पती आपल्या पत्नीच्या मांड्या किंवा स्तनांवर नखांच्या रेखा उमटवून जातो. त्याला स्मृतीरेखा म्हणतात.  अशा चार रेषा एकमेकांजवळ उमटवतो.

हे झाले नखपुराण. इथे दिलेल्या खुणा या केवळ उदाहरणेच आहेत.

पुरुष आपल्या कल्पनाविलासाने असंख्य प्रकारच्या खुणा उमटवू शकतात. त्यामुळे या सर्वांची सूची वगैरे करणे अशक्य आहे. वात्स्यायनाचे तर असे मत आहे की प्रेमात चित्रवैचित्र्य हवेच. त्यामुळेच तर कामक्रीडांमध्ये आणि ६४ कलांमध्ये व नेत्रपल्लवींमध्ये निष्णात गणिकांकडे पुरुष आकृष्ट होतात.

नखांची नक्षी विवाहित स्त्रियांवर करू नये. मात्र स्मृतीचिन्हे म्हणून कधीतरी तसे करायला हरकत नाही.

जुन्या प्रेमचिन्हांकडे पाहून स्त्रीला प्रेमाचे भरते येते भले त्या खुणा कितीही जुन्या व अस्पष्ट असो. पण तिच्या स्मृतीत त्या ताज्या असतात. जर अशा खुणा शरीरावर मिरवता येत नसतील तर हळू हळू प्रेम मिलनाप्रमाणेच कमी कमी होत जाते.

जेव्हा एखादी अनोळखी व्यक्ती स्त्रीच्या अंगावर अशा खुणा पहाते तेव्हा त्या स्त्रीबद्दलचा आदर आणि आकर्षण वाढते.

प्रेमचिन्हांचा असा संभार मिरवणारा पुरुषही अगदी सहजासहजी वश न होणाऱ्या स्त्रियांच्याही आकर्षणास पात्र असतो. कारण या उत्कट प्रेमचिन्हांहून प्रेमाला प्रेरित करणारे जगात दुसरे काहीच नाही.





विभाग दुसरा

पाठ पाचवा

चावा घेणे

चुंबनासाठी योग्य असलेली प्रत्येक जागा चावण्यासाठीसाठीही योग्य समजावी. मात्र वरचा ओठ, तोंडाचा आतला भाग आणि डोळे हे चुंबनासाठी योग्य असले तरी चावा घेण्यासाठी मात्र नाहीत याचे भान (बेभान अवस्थेतही) असले पाहिजे.

दात छान असावेत. समप्रमाणात, स्वच्छ, चमकदार, न तुटलेले, आणि धारदार असावेत. त्यांना रंगवता आले पाहिजे.

बोथट, वाकडेतिकडे, पुढे आलेले, सैल, अतीमोठे , खरखरीत असे दात असू नयेत.

चाव्याच्याही तऱ्हा असतात.

चोरटा चावा



www



सुजलेला चावा

टिंब चावा

रेखा चावा

पोवळेरत्नजडित चावा

रत्नहार चावा

ढगफुटीचा चावा

वराह (डुक्कर) चावा



सभोवतालची कांती लालसर गुलाबी होईल इतपतच घेतलेल्या किंचितशा हळुवार हलक्या चाव्याला चोरटा चावा म्हणावे.

जेव्हा आसुसलेल्या चाव्याने कोमल कांतीवर दोन्ही बाजूंनी खड्डा पडतो तेव्हा तो सुजलेला चावा असतो.

जेव्हा फ़क्त छोट्टुशा जागी वरच्या व खालच्या एकेकाच दाताने कलाकारासारखा प्रेमात चिंब होऊन निसटता चावा घेताना एक सुहाना टिंब उमटतो तेव्हा त्याला म्हणावे टिंब चावा.

जेव्हा सर्व दातांनी मिळून अशा टिंबांची एक रेषा बनते तेव्हा तो होतो रेखांकित चावा.

जेव्हा प्रियेची रसरशीत कांती पाहून अनावर इच्छेने दात आणि ओठ असे दोन्ही मिळून चावा घेतला जातो तेव्हा जे उमटते तो पोवळे रत्न चावा. ओठांनी उमटतात ते पोवळे आणि दातांनी उमटतात ते हिरे.

प्रेमालापाच्या अर्धवट धुंद अवस्थेत जेव्हा सर्व दातांनी मोठा चावा घेतला जातो तेव्हा तो बनतो रत्नहार.

धुंदीच्या भरात स्तनांवर ढगफ़ुटीचा चावा उमटवतात. जेव्हा चावा असमान असतो आणि दाता दातातील मधल्या जागेतून एक सुंदर नक्षी बनते तेव्हा ती ढगफ़ुटीसारखी दिसते.

आत्यंतिक बेभान अवस्थेत वराहनक्षी उमटते. एकाबाजूला एक अशी जाड रेखानक्षींची रांग दंड किंवा स्तनांवर उमटवली जाते तेव्हा तिला वराह नक्षी म्हणावे.

चावा घेण्यासाठी लुसलुशीत जागा जास्तच वेड लावते. अशा खुळ्या क्षणाला खालच्या ओठावर चोरटा चावा, किंवा सुजलेला चावा किंवा फ़ारतर टिंब चावा घेतला जातो. तनामनाच्या बेधुंद क्षणाला सुजलेला चावा आणि प्रवाळ रत्नांचा चावा गालावर घ्यायचा असतो. बेभान वादळी मौसमात घेतलेले झोंबणारे चुंबन, नखांची नक्षी आणि चाव्यांची नक्षी हे गालाचे दागिने समजावे. त्यातही डावा गाल तर सुकोमल हळवा गाल. प्रियकराला सदोदित आमंत्रित करणारा.

मंत्रावलेल्या स्वप्नावस्थेतला रेखांकित चावा किंवा रत्नहार हे गळा, दंड किंवा मांड्यांवरचे कालातीत अलंकार समजावे. कपाळावर व मांडीवर रेखांकित चावा शोभून दिसतो.

प्रियेच्या वस्तुंवरही नखे आणि दाताच्या खुणा केल्या जातात. जसे बिंदी, कुडी, झुमका, वेणी, पानाचा विडा किंवा तमाल पत्र यांवर प्रियकराने आपल्या खुणा उमटवून आपली इच्छा प्रकट करावी. चावा ही सुखमय जीवनाची खूण असते.

हे झाले चावा महात्म्य

चावा घेताना त्या त्या देशातल्या चालीरिती आणि देशोदेशीच्या स्त्रियांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन मगच प्रयोग करावेत.

मध्य भारतातल्या, म्हणजे गंगा जमुना खोऱ्यातल्या स्त्रिया संयमित असतात आणि त्यांना चावणे, नखोड्या मारणे असले बाष्कळ प्रकार आवडत नाहीत.

बाल्हिक प्रदेशातल्या ( आताचा बलुचीस्तान) स्त्रियांना ईश्काच्या भरात चापट्या मारलेल्या आवडतात.

अवंतिकानगरीतल्या स्त्रियांना (आताचे उज्जैन) नाविन्यपूर्ण प्रेमप्रकार व चित्रविचित्र प्रयोग करायला व अनुभवायलाही आवडतात.

महाराष्ट्रदेशीच्या रसिक स्त्रियांना चौसष्ट कलांत प्राविण्य मिळवायला आवडते. त्या कलासक्त असतात. पण गुलुगुलु प्रेमालापांच्या भरात कानांशी कुजबुजताना त्या सडेतोड कठोर शब्द वापरतात. आणि त्यांना तसेच ऐकायलाही आवडते. त्यांची प्रेमाची प्रेरणा तीव्र असते.

पाटलीपुत्र( आताचे पाटणा) मधील स्त्रियांच्या आवडीनिवडी महाराष्ट्रातल्या कलासक्त स्त्रियांप्रमाणेच असतात. पण त्या बाहेरून फ़ारच सभ्य साळसूद असतात आणि एकांतात आपले रंग दमादम उधळतात.

द्रविड  देशातील (तमिळ) स्त्रियांना आकांत होईस्तो दाबलेले आणि घासलेले आवडते. पण त्यांचे रेतपतन हळू हळू होते. त्यामुळे त्यांना खूप विलंबित प्रेम आवडते.

वाराणसीच्या स्त्रिया मध्यमा, मनाने सुकोमल असतात. त्यांना सर्वच सुखांची संयमित ओढ असते आणि कुजबुजताना, कठोर शब्द, शिव्या वगैरे त्यांना अजिबात सहन होत नाहीत.

अवंतीच्या स्त्रियांना चुंबनांत आणि चावण्यात विशेष रस नसतो पण विविध कामक्रिडांची आणि आसनांची त्यांना ओढ असते.

माळव्यातील ( आताचा मध्यप्रदेश) स्त्रियांना आलिंगन आणि चुंबनाची ओढ असते पण सलणारे शब्द त्यांना दूर लोटतात. आणि त्यांना मनवायचा सुलभ मार्ग म्हणजे हलक्या सलत्या चापट्या.

अभिरा आणि सिंधु नदीच्या पाच नद्यांच्या खोऱ्यातील ( आजचा सिंध व पंजाब) स्त्रियांना औपरिष्टक आणि मुखक्रिडन आवडते.

अपरातिकेतील स्त्रियांना तीव्र शरीरसुखाची ओढ असते आणि त्यांच्या कामक्रिडेच्या बहरक्षणांना त्या सतत त्स त्स असा आवाज करतात.

लाट प्रदेशातील स्त्रियांची लालसा तर आत्यंतिक तीव्र असते आणि त्याही त्स त्स असा ध्वनी करतात.

स्त्री राज्य, कोसला येथील स्त्रियांची कामलालसा अनावर असते व त्यांचे रेत जास्त असते. त्यांना कामसुखाच्या भरतीसाठी औषधे ( भांग वगैरे उद्दीपक पेये) प्यायला आवडते.

आंध्र देशातील स्त्रिया सुकुमार, कमनीय व नाजुक असतात. त्यांना सुखाची आसक्ती असते आणि त्यांना भरपूर पुष्टावलेले सुख आवडते.

गंददेशातील लावण्यवतींची शरीरे सुकोमल नाजुक असतात आणि त्या गुलुगुलु रसाळ बोलतात.







या सर्वांहून सुवर्णाभाचे मत मात्र चिंतनीय आहे. त्याचे म्हणणे व्यक्ती तितक्या प्रकृती. त्यामुळे अमुक एका प्रदेशातील स्त्रिया अमुकच प्रकारच्या असतात असे विधान करणे चुकीचे आहे. त्याचबरोबर वस्त्रे आणि खेळांबरोबरच आवडिनिवडींची आदान प्रदान चालूच असते आणि त्यामुळे कामक्रिडांचे प्रकार मूळ जागांवरून ओळखावेत पण गावावरून भाव जोखण्याची चूक नये.

आलिंगन , चुंबन आदी गोष्टी कधी कधी कराव्यात त्याचेही नियम आहेत. ज्यांनी कामाचे उद्दीपन होते आणि समोरच्या व्यक्तीचा कामरस जागृत होत जातो अशा क्रिया कलाप आधी करावेत आणि ज्यातून स्वतःला सुख आनंद मिळतो ते कामक्रिडेच्या ऐन भरात करावेत.

या विषयांवर काही काव्यही आहे

पुरुष जेव्हा स्त्रीला चावू जातो

स्त्रीने दुप्पट आवेगाने त्याला चावावे

त्याने जर बिंदू दिला

तर त्याला तिने रेखांकित चावा घ्यावा

आणि त्याने जर रेखांकित चावा घेतला

तर तिने त्याच्या मांडिवर ढगफुटी गोंदावी

त्याने जर तिला चापटी मारली

तिने महायुद्धच पुकारावे



कामसूत्र

युद्धात तिने प्रियकराच्या झिंज्या घट्ट मुठीत धराव्यात

आणि त्याची मुंडी सर्रकन खाली खेचून

त्याच्या खालच्या ओठांचे करकच्चून चुंबन घ्यावे

कामाच्या धुंदीत तिने स्वतःचे डोळे गच्च मिटावेत

आणि त्याच्या शरीराचा जो भाग हाती लागेल त्याचा चावा घेत सुटावे

दिवसा ढवळ्या, गांवात फ़िरतानाही

जेव्हा तिचा प्रियकर तिला आपल्या अंगावरच्या प्रेमखुणा दाखवतो

तिने सूचक हसून मान फ़िरवावी व त्याला डिवचल्यासारखे करावे

आणि रागारागाने आपल्या अंगावरच्या खुणा दाखवाव्यात.

अशा प्रकारच्या उच्छृंखल वागण्याने स्त्री पुरुषांचे प्रेम वयानुसार कमी होण्याऐवजी

शतकपर्यंत वाढच जाते.

www.esahity.com

## विभाग दुसरा

### पाठ सहावा

### पहुडणे आणि मिलनाचे प्रकार

फ़िरता फ़िरता, उभ्या उभ्या किंवा नंतर बैठकीचे प्रेम करून झाल्यावर शय्यामंचकावर कामसुखाचे अत्युच्च स्वप्नवत क्षण अनुभवायचे असतात.

मिलनाच्या गंधमय क्षणी मृगी स्त्रीने असे पहुडावे ज्यामुळे तिची योनी जास्तीत जास्त विस्तारित असेल. या उलट हस्तिनी स्त्री ने निम्न मिलनाच्या क्षणाला असे पहुडावे की तिची योनी कमीत कमी विस्तार पावेल. पण जेव्हा बरोबरीचे मीलन असेल तेव्हा मात्र सामान्य तऱ्हेनेच पहुडणे योग्य. हस्तिनी आणि मृगी स्त्रियांना जे लागू आहे तेच अश्विनींनाही लागू पडते. निम्न मिलनासाठी औषधींचा वापर करून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त सुख मिळवता येते.

मृगिणीने शयनाचे तीन प्रकार करून पहावेत

सताड उघडी मुद्रा

जांभई देताना होते तशी मुद्रा

इंद्रपत्नीची मुद्रा



डोके कमी उंचीवर आणि शरीराचा कमनीय मध्यभाग उचललेल्या अवस्थेत पहुडल्यावर जी अवस्था दिसते ती सताड मुद्रा. अशा वेळी पुरुषाने वेगवान अनिरोध हालचालींसाठी एखादे ओले उटणे, द्रव, किंवा तैल वंगणाचा वापर केल्यास अधिक सुखाची प्राप्ती होते.

मृगिणी जेव्हा स्वतःची पावले जुळवून आपल्या कोवळ्या मांड्या उंच करून दोन्ही दिशांना पूर्ण विलग करते तेव्हा जी स्थिती होते त्याला जांभई मुद्रा म्हणावे.

जेव्हा स्त्री गुढघे मुडपुन पावलांना मांड्यांपर्यंत आणून मांड्या पूर्णतः विस्तारित करते तेव्हा त्याला इंद्राणी मुद्रा म्हणावे. अर्थात ही सोपी नाही. ती जमवायला लवचिक शरीर व योगाची गरज आहे. सुखाच्या कडेलोटासाठी या मुद्रेचा वापर होतो.

आलिंगन आसनाचा वापर मिलनारंभात होतो. आणि धडधाकट अश्विनी स्त्रियांना गुंतागुंतीची आसने आणि दाबण्याच्या आसनांचा उपयोगही मैथुनारंभी करता येतो.

जेव्हा स्त्री आणि पुरुष आपल्या पायांनी एकमेकांना घट्ट विळखा घालतात तेव्हा ते आलिंगन आसन. हे आलिंगन आजुबाजूनेही (कुशीवरचे) करता येते वा उताणे राहून एकमेकांवर असतानाही करता येते. जेव्हा स्त्री किंवा पुरुष किंवा दोघे आपल्या कुशीवर असतात तेव्हा ते कुशीवरचे आलिंगन असते. कुशीवरच्या आसनात पुरुष आपल्या डाव्या अंगावर आणि स्त्री आपल्या उजव्या अंगावर झोपलेली असावी असा संकेत आहे. आणि हा नियम सर्व प्रकारच्या स्त्रियांना लागू पडतो.

विळखा घालून झाल्यावर जेव्हा स्त्री आपल्या मांड्यांत प्रियकराला गच्च आवळते तेव्हा ते दाबण्याचे आसन बनते.

जेव्हा स्त्री आपली एक मांडी प्रियकराच्या मांड्यांतून गुंतवते तेव्हा ते गुंतवळ आसन बनते.

जेव्हा स्त्री प्रियकराचे लिंग आपल्या योनीत अडकवून ठेवते तेव्हा ते अश्विनीआसन बनते. या साठी बरीच तयारी लागते व आंध्रदेशातील स्त्रिया यात वाकबगार जाणल्या जातात.

वर दिलेली सर्व आसने बभ्रव्याने सांगितली आहेत.

सुवर्णाभाने मात्र यात अजून काही भर घातली आहे.

जेव्हा कामाग्नीने चेतलेली प्रिया उताणी पहुडल्यावर आपले दोन्हीही पाय  सरळसोट उंचावते त्या अवस्थेला त्याने अभ्युत्थानासन असं नाव दिलं आहे.

जेव्हा कामातुर प्रेयसी आपले दोन्ही पाय उंचावून प्रियकराच्या खांद्यावर टाकते तेव्हा त्याला तो जांभई आसन म्हणतो

आणि जेव्हा नखरेल प्रिया आपल्या मांड्या ढिम्म जुळवते आणि मग अक्षरशः गुढघ्यांवर आलेला प्रियकर तिची दोन्हीही पावले जुळवून आपल्या भरदार छातीशी टेकवतो आणि आवळतो त्यावेळी ते  बनतं आवळलेलं आसन.

जेव्हा तिचा फ़क्त एक पाय पसरलेला असतो तेव्हा ते अर्ध दबावा आसन असतं

जेव्हा स्त्री आपला एक पाय प्रियकराच्या खांद्याभोवती टाकते व दुसरा सरळ करते व नंतर तो दुसरा पाय खांद्यावर टाकून पहिला सरळ करते. अशा तऱ्हेने दोन्हीही पाय आलटून पालटून खांद्यावर टाकते व सरळ करते तेव्हा त्याला बांबू चिरल्याचे आसन म्हणतात.

जेव्हा प्रेयसीचा एक पाय प्रियकराच्या डोक्यावर ठेवून दुसरा सरळ केलेला असतो तेव्हा त्याला खिळा मारणारे आसन म्हटले आहे.

जेव्हा पुरंध्री दोन्ही पायांची मुटकुळी करून ते स्वतःच्या छातीशी टेकवते तेव्हा ती कर्क (खेकडा) आसन असते.

जेव्हा निमूळत्या मांड्या उंचावून एकमेकांत गुंतवलेल्या असतात तेव्हा ते बनते बंद आसन.

जेव्हा मदनिकेच्या एखाद्या नखरेल क्षणी मदमस्त जुल्मी जांघा एकमेकांत गुंतवलेल्या असतात तेव्हा ते बनते कमलासन.

जेव्हा टिपूर भावक्षणाला प्रियकर प्रेयसीच्या शरीराचा विळखा न सोडवता तिच्या व स्वतःच्या शरीराभोवती फ़िरतो आणि तीही त्याला सतत स्वतःच्या विळख्यात ठेवून त्याला स्वतःभोवती फ़िरवते त्याला फ़िरतीचे आसन म्हणावे. यासाठी देखील बरीच तयारी लागते.

सुवर्णाभाच्या मते अशा प्रकारची आसने खळाळत्या पाण्यात करणे अधिक सोपे जाते. कधी उभ्याने, कधी बसून तर कधी झोपून ही आसने पाण्यात करता येतात. पण वात्स्यायनाच्या मते पाण्यात अशा आसनांचा वापर करणे हे धर्माने निषिद्ध मानले आहे.

जेव्हा युगुलप्रेमिक एकमेकांचा किंवा खांब किंवा भिंतीचा आधार घेतात आणि उभ्यानेच मिलनात दंग होतात तेव्हा ते बनते आधाराचे मैथुन.

पण जेव्हा प्रियकर भिंतीच्या आधाराने उभा असतो, आणि त्याच्या जुळलेल्या हातांवर नितंब ठेवून चढून बसलेली त्याची प्रेयसी आपल्या नाजुक हातांचा घट्ट विळखा पुरुषाच्या मानेभोवती घालते आणि पायाच्या पोटऱ्यांचा विळखा त्याच्या कमरेभोवती घट्ट करते आणि भिंतीला टेकलेल्या आपल्या पावलांच्या मदतीने झोके घेते व मिलनाचा आस्वाद घेते तेव्हा ते असते तरंगासन.

स्त्री जेव्हा आपल्या हातापायांच्या आधाराने एखाद्या चतुष्पाद प्राण्याप्रमाणे जमिनीलगत रहाते आणि प्रियकर जेव्हा एखाद्या बैलाप्रमाणे तिचा ताबा घेतो त्याला म्हटले जाते गो आसन. इतर वेळी छातीशी जे जे केले जाते ते अशा वेळी पाठीशी केले जाते. आणि अर्थातच मऊ स्तनांवर पुरुषाच्या राकट पंजांचा ताबा असतो.

याच प्रकारे कुत्रा, बकरी, हरिण अशासारखे मिलन, गाढव करते तसे रासवट मिलन, मांजर, घोडा मारतो तशी उडी, वाघ मारतो तशी झेप, हत्तीचं आवळणं, अस्वलाचं गुदगुदणं, अशी सर्व प्राण्यांची वेगवेगळी वैशिष्ट्ये आजमावून पहायला हरकत काय आणि कोणाची? स्त्री आणि पुरुष दोघांच्या रक्ताला  वैविध्याची आर्त ओढ असते, व ती अशी  पुर्णत्वाला नेता येते.

जेव्हा एक दांडगा पुरुष दोन स्त्रियांशी मिलन करतो तेव्हा ते संयुक्त मिलन असते.

जेव्हा एक पुरुष अनेक स्त्रियांशी एकत्रितपणे मिलनसुख घेतो तेव्हा त्याला गायींच्या कळपाचे मिलन म्हणतात.

या शिवाय इतरही मिलनाचे प्रकार आहेत ज्यांत पाण्यात मिलनाअचा आनंद उपभोगला जातो. एक हत्ती अनेक हत्तीणींशी पाण्यात खेळतो. किंवा बकऱ्या आणि हरिणीसारखा पाण्यातल्या मिलनाचा आनंद घेता येऊ शकतो.

ग्रामनेरी भागात अनेक तरुण पुरुष आपल्यातल्या एखद्याच्या पत्नीशी एकत्रीतपणे कामक्रीडा करतात. कधी आळीपाळीने तर कधी एकसाथ. एकजण तिला पकडतो, दुसरा तिच्या मुखाशी, इतर तिच्या इतर अंगांशी झोंबतात आणि आनंद लुटतात.

अशाच प्रकारचा एकत्रित कामक्रीडा एका वेश्येबरोबर अनेक पुरूष करतात किंवा कधी कधी राजाच्या अनेक राण्यांच्या जनानखान्यात सापडलेल्या एकट्यादुकट्या पुरुषासोबतही असा प्रकार घडून येतो.

दक्षिणेतील काही देशांत गुदद्वाराच्या संभोगाची प्रथा आहे. हे हीनप्रकारचे मिलन मानले जाते.

अशा प्रकारे मिलनाच्या विविध परकारांच्या माहितीचा समारोप होत आहे.

हुषार, प्रतिभाशाली माणसे मिलनाचे विविध प्रकार स्वतःच्या अक्कलहुषारीने निर्माण करतात. कधी पक्षी तर कधी प्राण्यांच्या मिलनातून त्यांना कल्पना सुचतात. अशा पुरुषांबद्दल स्त्रियांच्या मनात नेहमीच मैत्री, प्रेम आणि आदराची भावना असते.





## विभाग सातवा

### कामक्रीडेतील चापट्या, थपडा आणि त्यातून निघणारे ध्वनी

कामक्रीडा व संभोग हे एका अर्थी द्वंद्वयुद्धासारखेच असतात. मुळातच हे दोन विरोधांतलं आकर्षण असतं. आणि त्यामुळे त्या प्रेमात विरोध ठासून भरलेला असतो. या विरोधी धन ऋण भारांच्या एकत्र येण्यातून काही ठिणग्या उडतातच. यातून आवेगपूर्ण प्रेमाची परिसीमा होते. प्रेमाच्या आवेगात एकमेकांच्या शरीरावर आघात करण्याच्या आणि त्यातूनही आनंद आणि सुखाची निर्मिती करण्याच्या काही विशेष जागा आहेत त्या अशा.:

खांदे

डोकं


उरोजांच्या मधली जागा

पाठ

जांघा आणि शरीराचे केंद्रस्थान

नितंबांची बाजू

इत्यादि.



आघात चार प्रकारे करावा :

उलट्या हाताची थप्पड

बोटांना जुळवून द्रोणासारखा पोकळ आकार करून

मुठीने, बुक्के मारून

हाताची बोटे पसरून पंजा करून

अशा आघातांनी प्रियकर वा प्रेयसीच्या मुखातून वेदनेचे हुंकार उमटतात ज्यांतून संभोगासाठी वातावरणनिर्मिती होते. हे ध्वनी आठ प्रकारचे असतात.

हिंकार : नाकाद्वारे हिं हिं असा आवाज

हुंकार : घशाद्वारे घनगंभीर घुमण्याचा ध्वनी

कूजन : पक्शासारखे कू कूं आवाज

रूदन : रडल्यासारखा आवाज

फ़ूत्कार : जीभ आणि टाळूच्या संगमाने फ़्रू फ़्रू असा आवाज

फ़ट्कार : टाळूवर जीभ आपटून फ़ट फ़ट असा आवाज

सूत्कार : श्वास जोराने घेण्या सोडण्याचा स्स्स्स्स्स् स्स्स्स्स असा आवाज

प्लत्कार : चक् चक् च्चक् असा आवाज

याशिवाय मातृभाषेतले शब्द (जसे आई , ओ मां) किंवा निरर्थक आवाज, किंवा ना ना असे नकारार्थी विरोधाचे आवाज वेगवेगळ्या व्यक्ती काढतात. तसेच कोकिळा किंवा कबूतरासारखे किंवा भूंग्यासारखे किंवा वेगवेगळ्या पक्षांचे आवाज घशांतून उमटतात.

पुरुषाने आपल्या प्रेयसीला मांडीवर बसवून तिच्या पाठीवर बुक्क्क्या किंवा चापट्या माराव्यात. मग तीही त्याच्यावर शिव्यांची लाखोली वहात आणि हिंकार, हुंकार किंवा फुत्कार करत त्याच्या अंगावर आघात करते. संभोगाच्या पुढच्या पायऱ्या सुरू करताना तिच्या उरोजांच्या मधल्या घळीमध्ये पुरुषाने उलट्या हाताच्या थपडा मारत रहावे. सुरूवातीला हळू हळू थोपटल्यासारखे करावे, पण नंतर आघातांची तीव्रता वाढवत न्यावी. त्यायोगे स्त्रीचा कामाग्नी प्रज्ज्वलीत होत जातो. आणि मैथुनाची तीव्रता वाढत जाते.

अशावेळी सवयीनुसार वा त्या त्या व्यक्तीच्या प्रकृतीनुसार हिंकार किंवा इतर ध्वनी निघू लागतात. जेव्हा पुरूष एका हाताची ओंजळ करून पोकळ हाताने प्रेयसीच्या डोकीवर फ़त्कार करतो त्याला प्रश्रीतक असे म्हणतात. यातून मुखातून फ़त् किंवा फ़ुत् असे ध्वनी येतात आणि मैथुन क्रियेच्या वरच्या अवस्थेत रडण्याचे किंवा उसासे टाकण्याचे आवाज निघतात. फ़त्काराचा आवाज बांबू चिरल्यासारखा असतो आणि फ़ुत्काराचा आवाज पाण्यात काही वस्तू पडण्याशी मिळता जुळता असतो. आसासून चुंबन घेताना स्त्रीने स्स्स्स्स असा सित्कार करावा. उत्तेजित अवस्थेत नवथर

स्त्रीच्या तोंडून नकाराचे किंवा “सोडा ना, नको ना “ असे विनवणीचे किंवा “ अगं आई, अरे बाप रे” असे शब्द आणि सुस्कारे, उसासे, रूदनाचे आवाज निघत असतात.

संभोगाच्या सर्वोच्च क्षणाच्या जवळ जातांना पुरुषाने स्त्रीचे स्तन, जांघा आणि नितंबांच्या बाजूला पसरलेल्या पंजाने घट्ट आवळावे, सर्वशक्तीनिशी इतके दाबावे की तिच्या मुखातून हंसिनीसारखे आवाज उमटतील.

या विषयावर दोन सुंदर श्लोक किंवा कविता आहेत

पौरुषात धुसमुसळेपणा आणि खरखरीत राकटपणा असावा

स्त्रीत्वात नाजुकता, कोमलता, अनुभूती, आणि सौंदर्यासक्ती असावी

उत्तेजित चेतनेच्या तीव्रतेत कधी उलटेच घडून येते

पण ती अवस्था जास्त काळ रहात नाही आणि पूर्वावस्था येतेच.

वक्षस्थळाचा त्रिकोण, डोक्याची कैची, गालाची खळी आणि उरोजांवरची नाजुक कळी

यांवर थोपटण्याचे चार वेगवेगळे प्रकार करून

एकूण आठ प्रकारांनी मैथुनाचा आनंद वाढवता येतो

दक्षिणेतील पुरुषांची ही खासियत आहे की

ते स्त्रीच्या वक्षस्थळांवर स्पष्ट दिसतील अशा खुणा उमटवतात.

वात्स्यायनाला हे प्रकार पसंत नव्हते आणि त्यांना तो वेदनामय, जंगली आणि अनुकरणास अयोग्य मानतो.

त्याचबरोबर एका प्रांतातली विशिष्ट मैथुनपद्धती इतरत्र वापरणे अयोग्य असे तो मानतो. तसेच त्या त्या प्रांतातही त्याचा अतिरेक होऊ नये असे त्याचे मत आहे. पांचाळ देशाच्या राजाने आपल्या माधवसेना नांवाच्या प्रेयसीचा मैथुनाच्या वेळी मारून मारून जीव घेतला. कुंतल देशीच्या सतकर्णी शातवाहनाने राणी मलयावतीचा कात्रीने प्राण घेतला. तर नारदेव राजाने हात मोडलेले असतानाही एका नर्तकीला कायमचे अंध केले. म्हणून मैथुनाच्या अत्त्युच्च अवस्थेतही सारासारविवेक जागा असला पाहिजे.

या सर्व कृत्यांना कोणताच नियम लागू होत नाही. संभोगक्रीयेच्या भरात हातून काय घडेल ते ताब्यात रहात नाही.

न सर्वदा न सुर्वासु प्रयोगा साम्प्रयोगिका

स्थाने देशे च काले च योग ऐषां विधीयते

मैथुनाच्या आवेगात कामाग्नीच्या प्रज्ज्वलीत अवस्थेत शरीराच्या हालचालींवर क्षणिक अनिर्बंध मुक्तावस्थेचा अनुभव येतो. लगाम सुटलेला घोडा जसा मोकाट उन्मुक्त अवस्थेत आंधळ्या वेगाने रस्त्यातले खड्डे, आणि अडथळे यांना न जुमानता सुसाट सैरावैरा सुटतो. तसेच काहीसे मैथुनाच्या अनावर आवेगातल्या जोडप्याचे होते. चेतनेचा अग्नी जसजसा पेटत जातो तसतसे विचारांचे लगाम सैल होतात आणि त्या वणव्याच्या भरात काहीही अतिरेक होऊ शकतो. म्हणूनच कामशास्त्राचा अभ्यास केलेल्या व्यक्तींना त्या भरातही संयमाचे आणि सारासरविवेकाचे भान ठेवता

येते. स्त्रीच्या नाजुक अंगांचे रक्षण करूनच तिच्या संपूर्ण सौंदर्यपूर्ण आत्मशक्तीचा आस्वाद घेता येतो. कामक्रीडांचे सर्व प्रकार सर्वकाळ करण्यासाठी नसून योग्य वेळ आणि योग्य जागीच ते उपयोगात आणायला हवेत.

कामकलेत निपुण असलेल्या पुरुषांना वेगवेगळ्या स्त्रियांशी कसे वागावे ते चांगले कळते. प्रत्येक स्त्री वेगळी असते. प्रत्येकीला वेगवेगळ्या आवाजांची आवड असते. कुणाचे मन गुलुगुलु गुजगोष्टींत रमते, तर कुणाला वासनामय उद्दिपक गोष्टी आवडतात. कोणी शिव्या आणि ताड फ़ाड बोलण्याने आकर्षित होतात तर काहींना शुद्ध सात्विक शांततेत सुखाची परिसीमा मिळते. त्यामुळे स्त्री किंवा पुरुषाने आपल्या जोडीदाराची प्रकृती आणि आवड निवड समजून घेऊन त्यानुसार वागावे.





## विभाग आठवा

### पुरुषी पद्धतीने वागणाऱ्या स्त्रिया आणि पुरुषाची कार्यं

जेव्हा मैथुनाच्या अतिरेकाने पुरुष शरीराने थकून जातो, आणि तरीही त्याचे समाधान मात्र झालेले नसते, तेव्हा स्त्रीने त्याच्या सहमतीने  त्याला खाली उताणे झोपवावे आणि त्याच्या क्रिया आपण कराव्यात. यातून त्याला आराम तर मिळतोच, पण त्याच्या कुतुहलाचे शमन होते आणि तिला एका वेगळ्या पद्धतीच्या संभोगाचा आनंदही मिळतो.

हे करण्याचे दोन प्रकार आहेत.

एकतर जेव्हा नेहमीप्रमाणे मैथुन सुरू असते. ती खाली पहुडलेली असते आणि तो मैथुन क्रिया करत असतो आणि मैथुन क्रिया अखंडित चालूच रहाते आणि रतिसुखामध्ये कसलीच बाधा येत नसते.

दुसरा प्रकार म्हणजे जेव्हा स्त्री पुरुषासारखे कार्य करते. त्याची भुमिका वठवते. कधी कधी पुरूष संभोग क्रिया करताना थकतो परंतू त्याच्या कामेच्छेची तृप्ती झालेली नसते. व नायिकेचा कामदाह अजून शांत झालेला नसतो. अशा वेळी पुरुषाला तिने उताणे झोपण्यास सांगावे. अशा वेळी तिच्या सैलसर केसातले फ़ूल त्याच्या छातीवर चुरगळावे. तिने आपली योनीही संपूर्ण बहरलेल्या फ़ुलाप्रमाणे पूर्ण सैल सोडावी. स्वतःचे मऊ मऊ स्तन त्याच्या छातीवर अत्तराप्रमाणे घासावे. आणि ओठांच्या स्मितातून श्वासा निश्वासांतून असे कामुक ध्वनी निर्माण करावे की त्याची कामशक्ती उफ़ाळून येईल. आपल्या ओठांना त्याच्या ओठांजवळ नेऊन त्याला आसासून चुंबन घ्यायची जबरदस्त इच्छा निर्माण व्हावी. त्याला चुचकारावे, फ़टकारावे आणि सांगावे की आधी त्याने तिला जसे छळले तसेच

आता ती त्याला छळून सूड घेत आहे. त्याला चापटावे, चावावे, आता तिने धुसमुसळे व्हावे, वेड्यासारखे खवळावे, उसळावे, थयथयाट करावा. अशा प्रकारे तिने पुरुषाच्या अधिकाराने वागावे. यातही एक खास सुख, आणि आनंद असतो.

स्त्रीला सुख देण्यासाठी पुरुष जे जे करतो ते ते पौरुष होय. ते कसे असते ते पहा

युवती पलंगावर पहुडलेली असता पुरुष गोड गोड गोष्टी बोलून तिला भूल पाडतो. शब्दांच्या  मोहिनीचा परिणाम होत असतानाच त्याने तिची वस्त्रे व अंतवस्त्रे सैल करण्यास सुरुवात करावी. असे करताना ती लटका विरोध दाखवू लागते. अशा वेळी त्याने तिच्या अंगांगावर चुंबनांचा वर्षाव करून तिचा तो वरवरचा विरोध लुळापांगळा करून टाकावा. आणि जसजसे त्याचे लिंग ताठ होत जाईल तसतसे त्याने तिच्या गुप्तांगांवर आणि कामबिंदुवर कधी हळुवार तर कधी मजबुतीने हात फ़िरवत रहावा. कधी हळुवार कुरवाळावे. कधी घट्ट आवळावे. कधी हुळहुळावे. कधी दाबावे. तरीही जर युवती विरोधाची पराकाष्ठा करत राहील तर त्याने आपले मनगट तिच्या दोन मांड्यांच्या मध्ये दमदारपणे खुपसून ठेवावे. जर तिच्या आणि त्याच्या मिलनाची ही पहिलीच वेळ असेल तर ती आपल्या मांड्या घट्ट जुळवून ठेवील. ती जर अगदीच नवतरूण आणि अननुभवी कलिका असेल तर त्याने आपले हात तिच्या नुकत्याच उभाराला येणाऱ्या वक्षस्थळांवर दाबावे. अशा वेळी आपले हात स्तनांवर ठेवून त्यांचे रक्षण करू पहाते.

मग त्याने आपले हात तिच्या काखांतून मागे नेऊन तिला ओढावे आणि तिच्या मानेच्या मागच्या बाजूने कुर्वाळावे. जर ती अनुभवी आणि कामक्रीडांची जाणती स्त्री असेल तर त्याने अशा वेळी दोघांनाही सुखाची अनुभूती मिळेल असे वागावे. अशा वेळी मनातून उठणाऱ्या तरंगांच्या आणि अंतर्मनाच्या आदेशांच्या अनुसरून वागावे. मग त्याने तिची वेणी, अंबाडा किंवा मोकळे केस

मुठींनी धरून तिची हनुवटी आपल्या बोटांनी वर उचलावी आणि ओठांचे रसरसून चुंबन घ्यावे. जर ती अननुभवी युवती असेल तर अशा वेळी हट्टाने विरोध करील आणि पापण्या घट्ट मिटून घेईल. तिच्या शरीराच्या बारीक बारीक हालचालींवर लक्ष ठेवून पुरुषाने तिच्या अंतर्मनाचा कौल जाणून घ्यायचा प्रयत्न करावा व तिला रतिसुख लाभेल असेच वागावे.

सुवर्णाभाचे असे मत आहे की स्त्री संभोगाच्या वेळी आपली नजर स्वतःच्या अवयवांकडे फ़िरवत असते. अशा वेळी पुरुषाने तिच्या संकेतांवर लक्ष ठेवून तो तो अवयव घट्ट आवळावा किंवा हळुवार कुरवळावा.

स्त्रीचे मन वश झाले आहे हे ओळखण्याच्या काही खुणा आहेत. रतीसुखाचा आनंद स्त्रीला होत आहे हे खालील संकेतांवरून ओळखावे. तिच्या पापण्या अलगदपणे मिटल्या रहातील. तिचा संकोच हळू हळू मावळत जाईल. तिचे शरीर आणि एकेक अवयव सैल पडत जातील. आणि ती आपल्या शरीराचे एक एक अंग त्याच्या शरीराच्या अंगांगाशी भिडवू पाहील. अशा प्रकारे प्रिया स्वतःला त्याच्या पौरुषाच्या स्वाधीन करून मोकळी होईल.

या उलट, तिच्या जाणीवा उद्दिपित झाल्यावर, रतिसुखाची इच्छा जागृत झाल्यावर जर पुरुषाकडून तिचे समाधान होत नसेल तर त्याच्याही काही खाणा खुणा असतात.

ती अशावेळी तिचे हात झटकत रहाते. पुरुषाला उठू देत नाही, दूर होऊ देत नाही. आणि तरीही जर तो दूर जाऊ लागला तर तिला अपमान झाल्यासारखे वाटते. ती चावते त्याला. लाथा बुक्क्याही मारते. आणि पुरुषाने क्रिया थांबवल्यावरही स्वतःच ते चालू ठेवते. अशा वेळी पुरुषाने आपल्या बोटांनी तिची योनी आधी हळू हळू कुरवाळावी आणि नंतर घासावी. अशा घासण्याने तिची

योनी मऊ आणि सैल होत जाईल. तोवर त्याचेही लिंग पुन्हा घट्ट आणि ताठ होत असेल. अशा योग्य वेळी त्याने पुन्हा लिंग तिच्या योनीच्या आत सारावे व आपल्या कृतीला पुनः सुरुवात करावी.

पौरुषी क्रिया एकदा नीट समजून घेऊ या



उपसृप्तक : पुढे मागे करणे

मंथन : घर्षण व ढवळणे

डंख : खुपसणे

अवमर्दन : घासणे

पीडितक : दाबणे

आघात : जोर जोरात योनी मुरडणे

वराह आघात :  डुक्करमुसंडी

वृषभ आघात : बैल ढुशी

चिमणी विलास :

संभोगक्रियांच्या विविधतेतून रंजकता निर्माण होते. आणि वैवाहिक आयुष्यातला तोच तो पणा निघून जातो. आधी सांगितल्याप्रमाणे स्त्री पुरुष संबंध म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधले सामाजिक संबंध नव्हेत. त्यांच्यातून मिळणारा आनंद हा इतर कोणत्याही आनंदाहून सर्वश्रेष्ठ असतो.

हा आनंद द्विगुणित करण्याचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे या संबंधांत वैविध्याचा चटकदार मसालेदारपणा आणणं. हे संबंध सपक, अळणी असून चालणार नाहीत. आणि त्यासाठी नित्य नूतन कल्पक गंमतीजमती करायला हव्यात. वर दिलेल्या संभोग पद्धती ह्या केवळ उदाहरण समजाव्या.

उपसृप्तक : पुढे मागे करणे : जेव्हा लिंग योनीच्या समोरासमोर आणून व्यवस्थित आत सारून पुढे मागे करणे याला उपसृप्तक म्हणतात.

मंथन : घर्षण व ढवळणे : मंथन म्हणजे घुसळणे. रवीने ताक घुसळून लोणी काढतात ना तसे. ताठ लिंग हातात धरून योनीच्या आत घालून जोरजोरात ढवळणे व फ़िरवणे याला मंथन म्हणतात.

डंख : खुपसणे : योनी थोडी खाली करून लिंग जेव्हा एकाच झटक्यात योनीत खुपसले जाते व अर्ध्यापर्यंत नेऊन पुन्हा थांबवले जाते तेव्हा स्त्री त्या अपूर्णतून अधिकाधिक सुखाकडे उभारत जाते.

अवमर्दन : घासणे. पुरुष आपल्या बाहूंच्या आधारे प्रेयसीची कटी थोडी उंचावतो. आपले लिंग योनीच्या निम्न भागाशी घर्षण करीत योनीच्या टोकाशी असलेल्या अतिसंवेदनशील भागापर्यंत पोचवतो त्याला अवमर्दन असे म्हणतात.

पीडितक: दाबणे : युवतीला वेदना होतील अशा तऱ्हेने लिंग योनीत खोलवर दाबून ठेवणे याला पीडितक असे म्हणतात.

निर्घात : जोर जोरात योनी मुरडणे : जेव्हा कामप्रेरणेने उद्दिपित झालेला नायक लिंग पूर्णपणे युवतीच्या योनीच्या बाहेर काढून अत्यंत शक्तीने  पुन्हा पुन्हा पूर्णपणे आत घुसवतो व आत बाहेर करतो त्याला निर्घात असे म्हणतात.

वराह आघात :  डुक्करमुसंडी : डुक्कर आपल्या नाकाने जमीन खणतो. तसे लिंगाच्या कठोरतेने मृदू योनीमध्ये एकाच बाजूने खणल्यासारखे करणे याला वराह आघात असे म्हणावे.

वृषभ आघात : बैल ढुशी : बैलाला दोन शिंगे असतात. व तो त्यांच्या आधाराने ढुशी मारतो. तसेच लिंगाने आलटुन पालटून योनीच्या दोन्ही अंगांना घासण्याला वृषभ आघात असे म्हणतात.

चिमणी विलास : संभोगाच्या अंतिम टप्प्यात सुखाच्या अंतिम क्षणी लिंग योनीच्च्या बाहेर पडू इच्छितच नाही. आणि जणू (इंजिनाच्या पिस्टनप्रमाणे) आतल्या आतच अयंत वेगाने मागे पुढे करीत रहाते. त्याला चिमणी विलास असे म्हणतात.

जेव्हा एक स्त्री पुरुषाच्या भुमिकेत जाते तेव्हा या साऱ्या हालचाली (विरुद्ध अंगाने) तिने कराव्यात व पुरुषाने निवांत पहुडून रहावे.

मात्र नायिकेला वरील साऱ्या क्रियांहून अधिक काही क्रिया (आसने) करण्याची संधी असते.

संदशं : आकड्याचे आसन : केसांना लावण्याचा आकडा असतो तसे आसन. यात युवती नायकाचे लिंग आपल्या योनीत घेऊन दाबून खूप वेळ तसेच धरून ठेवते. या आसनात नायकाला आपले लिंग एखाद्या सापळ्यातच अडकले आहे असा भास होतो.

भ्रमरासन : भोवऱ्याचे आसन : हे आसान करण्यासाठी प्रयोगशीलता आणि चिकाटी हवी. यात युवक आपला मध्यभाग उंचावून लिंग एखाद्या खिळ्यासारखे वर ठेवतो. व युवती आपली योनी त्यात अडकवून कुंभाराच्या चाकासारखी गरगरा फ़िरते. यात आनंद मिळतो. पण त्यासाठी सवयीची आणि उत्साहाची गरज आहे.

प्रेखोलित : झोपाळ्याचे आसन : यात पुरुष खाली झोपतो. व स्त्री त्याच्या लिंगात आपली योनी अडकवून झोपाळ्यासारखी मागे पुढे वा उजवी डावीकडे झुलत रहाते.

स्त्री ही जात्याच नाजुक असते. त्यामुळे हे सर्व करत असताना ती समागमाच्या अत्युच्च पायरीच्या आधीच थकण्याची शक्यता असते. अशा वेळी पुरुषाने आपले लिंग योनीच्या बाहेर न काढता, व संभोगाच्या गतीला खीळ पडू नदेता स्त्रीला खाली आणावे व आपण तिच्यावर जाऊन पुढचे काम सुरू करावे.

सहसा स्त्री समागमात पुढाकार घेत नसते. निदान सुरुवातीला तरी ती संकोचत असते. मात्र जेव्हा संभोगक्रियेचे सुकाणू तिच्या हाती सोपवले जाते व पुरुष नुसता पडून रहातो तेव्हा तिच्या अंतः स्फ़ुर्तीला उधाण येते आणि ती तिचे आजवर दबून राहिलेले अंतःस्थ रंग उधळायला सुरुवात करते. यातून दोघांनाही आनंदाची खरी ओळख मिळत जाते.

न त्वेवतौ न प्रसूतां न मृगी न च गर्भिणीम्

न चातिव्यायतां नारीं योजयेत्पुरुषायते

अर्थात ऋतुमती (रजस्वला), प्रसूता, गर्भवती, अतिनाजुक नायिका, अती लठ्ठ नायिका यांनी पुरुषाची भुमिका करू नये.



## भाग नऊ : औपरिष्टक किंवा मुखसंभोग

किन्नर दोन प्रकारचे असतात. एक पुरुषासारखे रहाणारे, वागणारे; दुसरे स्त्रीसारखे वेषभूषा, नखरे आणि बोलण्याचा अंदाज असणारे. तीच नजाकत, तोच नखरेलपणा, तो साधेपणा, तोच लाजाळूपणा, तोच मवाळपणा, आणि तशीच धिटाईही. अगदी स्त्रीसारखाच असला तरी ती स्त्री नाहीच. त्यामुळे स्त्रीच्या मध्यभागाशी, मांड्याच्या मध्ये करायचे कार्यक्रम या किन्नरांना तोंडानेच करावे लागतात. याला नांव आहे औपरिष्टक. या किन्नरांना जे काल्पनिक सुख मिळते ते आणि उपजिवीकाही होते तॊ या औपरिष्टकातूनच. औपरिष्टक हे या स्त्रीकिन्नरांचे सर्वस्वच असते.

पुरुषाच्या परिधानात असणारे किन्नर मात्र त्यांची इच्छा सुप्त ठेवतात. त्यांचे प्रदर्शन करत नाहीत. ते पुरुषाच्या शरीराला मालिश करण्याच्या मिषाने हळू हळू पुरुषाच्या अनावृत्त शरीराच्या छातीवरून मांड्यांकडे मालिश करत जातात. मांड्यांच्या मध्यभागी पोहोचल्यावर मालिश करता करता पुरुषाचे लिंग मोठे आणि ताठ होऊ लागते. अशा वेळी ते त्याच्या खेल्ळत रहातात. जर पुरुषाने त्यांना लिंग तोडात घेण्याचा आग्रह केला नाही तर ते स्वतःच तसे करायला सुरुवात करतात. मात्र जर पुरुषाने त्यांना आग्रह केला तर मात्र खूप आढेवेढे घेत रहातात व पुरूषाच्या इच्छा अधिकाधिक अनावर करत नेतात. आणि पुरुषाची इच्छा अनावर झाल्यावर मात्र लिंग तोंडात घेऊन त्याला हवे तसे सुख देतात.

किन्नरांच्या औपरिष्टकच्या आठ पद्धती आहेत.



नैमित्तिक : वरवरचे

पार्श्वतोदष्ट  : बाजूंनी चावणे

बहिःसंदंश : बाहेरून दाबणे व दंश करणे

अंतःसंदंश : आतून दाबणे

चुंबितक : चुंबन घेणे

परिमृष्टक : चोळणे

आम्रचूषितक : आंब्याप्रमाणे चोखणे

संगर : गिळणे. पूर्ण तोंडात घेणे

या आठही क्रिया क्रमाक्रमाने करायच्या आहेत. किन्नर दर क्रियेनंतर थांबण्याचे नाटक करतो व यजमान पुरुष त्याला पुढची क्रिया करण्यासाठी गळ घालतो.

पुरुषाचे ताठ होत जाणारे लिंग जेव्हा किन्नर आपल्या ओठांनी हलकेच स्पर्शून आपले तोंड त्याभवती फ़िरवत रहातो त्याला नैमित्तिक असे म्हणतात. या क्रियेतून पुरुष “जागा” होतो.

जेव्हा किन्नर पुरुषाचे लिंगाचे टोक हलक्या हाताने एखाद्या कळीला कुर्वाळावे तसे बोटांत धरतो आणि शिस्नाच्या बाजूंना चिमणीच्या दातांनी हलके हलके चावे घेतो तेव्हा त्याला पार्श्वतोदष्ट असे म्हणतात.

बहिःसंदंश: जेव्हा पुरुष किन्नराकडे अधिकाची अपेक्षा करतो तेव्हा किन्नर त्याच्या लिंगाचा पुढचा सुपारीसारखा भाग तोंडात सरकवते आणि अशा प्रकारे ओठांनी दाबते कि ती सुपारी पट्कन तोंडातून बाहेर उडते. असे पुन्हा पुन्हा केल्याने पुरुष अधीर होऊ लागतो. व पुढच्या पायरीकडे वळायला किन्नराला आग्रह करतो.

चुम्बितक : पुरुषाची अधीरता वाढीला लागली की किन्नर त्याच्या लिंगाचे खालच्या ओठांचे घ्यावे तसे रसरसून चुंबने घेऊ लागतो.

परिमृष्टक : लिंगाची अनेक चुंबने घेऊन झाल्यावर किन्नर आपल्या लवलवत्या जिभेच्या खरखरीत स्पर्शाने संपूर्ण लिंगाला आणि विशेषतः लिंगाच्या टोकाच्या सुपारीला मालिश करतो. त्याला परिमृष्टक हे नांव आहे.

आम्रचूषितक : अशा प्रकारे उद्दिपनाच्या अंतिम टप्प्याशी पोचलेल्या अधीर पुरुषाच्या ताठ लिंगाचा अर्धा भाग तोंडाच्या आत घेऊन किन्नर एखाद्या आंब्याप्रमाणे चोखतो. त्याला आम्रचूषितक असे म्हटले जाते.

संगर : अखेर सुखाच्या चरमसीमेला पोहोचलेल्या विव्हल पुरुषाचे संपूर्ण लिंग तोंडात घेऊन किन्नर ते गिळण्याचा अविर्भाव करतो. हाच संगर.

चापटणे, मारणे, नखोड्या मारणे, आदी प्रकारही औपरिष्टकाच्या सोबतीने करण्यात यावेत.

औपरिष्टक हा केवळ किन्नरांनीच करावे असे नाही. कुलटा, दासी, मालिश करून चरितार्थ चालवणाऱ्या स्त्रिया आणि निम्न स्तरीय गणिकादेखील औपरिष्टकाने आपल्या धन्याला आनंद देऊ शकतात.

अनेक आचार्यांच्या मते औपरिष्टक हे कुत्र्यासारख्या निम्न प्राण्याचे काम आहे व माणसाने तसे करू नये. ते धर्माच्याही विरुद्ध मानले जाते. कारण यात पुरुष आपले लिंग किन्नर वा स्त्रियांच्या हवाली करून स्वतःला वेदना आणि हानी करून घेत असतो. परंतू वात्स्त्यायनाच्या मते यात धर्मग्रंथाच्या विरुद्ध असे काहीही नाही. विवाहित स्त्रियांनी हे करू नये एवढेच काय ते धर्मग्रंथ सांगतात. किन्नर वा गणिकांना यात कोणताही प्रतिबंध नाही. पुरुषांनी मात्र जखमा, वेदना आणि शारीरिक कष्ट याबाबत योग्य ती काळजी घ्यायला हवी आणि औषधोपचार व्यवस्थित करायला हवेत.

पुर्वेकडील राज्यांतले लोक औपरिष्टक करणाऱ्या स्त्रियांशी कसलाच संबंध ठेवत नाहीत.

अहिच्छत्र देशातील लोक औपरिष्टक करणाऱ्या स्त्रियांकडे जातात मात्र मुखाने करणाऱ्या कोणत्याच गोष्टी ते करून घेत नाहीत.

साकेत देशातील सज्जन वेश्यागमन करतात व औपरिष्टक करणाऱ्या स्त्रियांकडे जातात पण औपरिष्टक करू देत नाहीत. नगर राज्यातील लोक इतर सर्व करतात पण औपरिष्टक नाही.

यमुनेच्या दक्षिणतीरावरील शूरसेन राज्यातील पुरुष कसलाच विधीनिषेध बाळगत नाहीत आणि सर्व प्रकारच्या स्त्रिया व कामक्रिडांचा भोग घेततात. त्यांची समजूत अशी आहे की स्त्री ही मुळातच अशुद्ध असते. तिचे पावित्र्य, सदाचरण आणि वचन यांवर विश्वास ठेवता येत नाही. पण म्हणून काही तिचा त्याग करणे योग्य नाही. कारण धर्मशास्त्रांच्या मते, गायीच्या थानांना बछडा तोंड लावतो आणि तरीही तिचे दूध आपण शुद्ध मानतो, कुत्र्याचे तोंड अशुद्ध असते, पण शिकारीच्या वेळी तो ज्या हरणाला चावतो, त्याचे मांस आपण खातोच, तसेच पक्ष्याची चोच लागलेले फ़ळ खाली पडल्यावर आपण खातोच. मग स्त्रीच्या मुखाने लिंग धरले तर त्यात त्याज्य असे काहीच नाही.

चुंबन घेताना स्त्रीचे ओठ जर पवित्र आहेत असे समजतो तर औपरिष्टकात काहीच गैर नाही. वात्स्यायनाच्या मते व्यक्ती तितक्या प्रकृती. प्रत्येक व्यक्तीने आपल्याला ज्या प्रकारचा संभोग व कामक्रीडा आवडतात त्या कराव्यात. तसेच देशोदेशी मान्यता वेगवेगळ्या असतात आणि त्यात काहीच चुकीचे नाही.

काही मान्यवर लोक आपल्या सेवेत असे दास दासी बाळगतात जे मुखसंभोग करतात. तसेच काही चांगल्या घरातले दोन पुरुष एकमेकांशी मुखसंभोगाचा संबंध ठेवतात. जनानखान्यातील काही स्त्रियाही एकमेकींशी मुखसंभोग करताना एकमेकींच्या योनींना मुखाद्वारे सुखाची प्राप्ती करून देतात. तसेच काही पुरुषही स्त्रियांना त्यांच्या योनीला जीभेच्या क्रिडा करून सुख देतात व घेतात. योनीची चुंबने घेण्याचे अनेक प्रकार आहेत आणि त्यासाठी मुखचुंबनाचे जे प्रकार आधी वर्णन केले आहेत त्यांच्यातून मार्गदर्शन मिळू शकेल.

जर एक पुरुष व स्त्री एकमेकांच्या मांड्यांत तोंड खुपसून झोपले व औपरिष्टकाने एकमेकांना सुख देऊ लागले तर त्याला काकिला असे म्हटले जाते.

मुखमैथुनाचा आनंद काही वेगळाच असतो यात शंका नाही. अनेकदा स्त्रिया या मुखमैथुनाच्या इतक्या आहारी जातात की त्यांना असे प्रकार टाळणारे भल्या घरातले सभ्य बुद्धीमान पुरुष नकोसे होतात आणि त्या निम्नवर्गातल्या माहुतांशी किंवा गुलामांशी कामक्रीडांत रममाण होतात. सुविद्य ब्राह्मणाने, अमात्य वा राज्यकर्त्याने, सुप्रसिद्ध पुरुषाने मात्र कधीही औपरिष्टक करू नये. कोणत्याही धर्मशास्त्राने त्याला प्रतिबंध केलेला नाही. परंतू समाजात त्याला मान्यता नसल्यामुळे ते टाळणेच योग्य. उदाहरणार्थ कुत्र्याचे मांस खाणे हे कोणत्याच शास्त्राने निषिद्ध नाही किंवा त्यामुळे काही अपायही होत नाही. पण तरीही आपण ते खात नाही ना.


त्याचप्रमाणे संभोगाच्या बाबतीत काही गोष्टी जरी निषिद्ध नसल्या किंवा तर्कशास्त्राने प्रतिबंधित नसल्या तरी त्यांना समाज मान्यता व संकेत नसल्यामुळे चांगल्या लोकांनी त्या टाळाव्यात. स्थळ काळाच्या मर्यादा पाळाव्यात. ज्या देशात रहातो तिथले संकेत पाळावेत. तसेच निसर्गाचे नियम व स्वतःच्या शरीराची ओढ यांची सांगड घालावी. अशा वेळी काही काही गोष्टी गुपचुप, पडद्याआड कराव्या. माणसाचे मन काही त्याच्या चेहऱ्यावरून वाचता येत नाही. आणि सामाजिक वर्तनावरून एखादी व्यक्ती एकांतात काय काय चाळे करत असेल याचा अंदाज घेता येत नाही.

टीप :

समलिंगी संभोग हा भारताच्या काही भागांत खूप पुरातन काळापासून चालत आला आहे. सुश्रुताच्या आयुर्वेदात लिंगावर दातांनी झालेल्या जखमांसाठी काय औषध वापरावे ते दोन हजार

वर्षांपुर्वीच्या पुस्तकांत लिहिलेलेले आहे. भुवनेश्वर येथील शैव मंदिरांत तसेच खजुराहोच्या मंदिरातही औपरिष्टक व मुखमैथुनाचे अनेक लेण्यांतून दर्शन घदते.

असे दिसते की भारतात मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात मुखसंभोगाचे प्रकार मागे पडत गेले आणि त्यांची जागा गुदमैथुनाने घेतली.



## भाग दहावा

### रतिक्रिडेचा आरंभ आणि अंत आणि प्रणय-कलह यांच्याविषयी

रतिक्रीडेसाठी एक सुखशय्यागार असावे. फुलांनी सुशोभित आणि सुवासिक अत्तरांनी सुगंधित असे ते सुखदालन असावे. नुकतेच स्नान करून, सुंदर वस्त्रांनी आणि आभुषणांनी नटलेली सुकोमल ललना या दालनात प्रवेश करताना पुरुषाने आपल्या मित्रांसह आणि परिवारासह तिचे स्वागत करावे. सर्वप्रथम तिला स्वस्थता लाभेल व मन शांत होईल असे वागावे. तिला फ़लाहार व मिठाई तसेच चटकदार पेय देऊन संतुष्ट करावे. हलक्या आवाजात तिला आवडणाऱ्या विषयांवर गप्पा माराव्यात.

त्याने नायिकेला हलक्या हातांनी मंचकावर आपल्या डाव्या बाजूला बसवावे. तिच्या वेणीला हलकेच स्पर्श करावा. तिच्या वस्त्रांना निसटता स्पर्श करावा. तिच्या वस्त्रांच्या गाठी किंचित सैल कराव्यात किंवा तसा स्पर्श करावा. तिला मधुर गप्पांमध्ये गुंतवावे. काही असे विषय किंवा शब्द बोलावेत जे सहसा चारचौघांत बोलले जात नाहीत. त्यातून तिच्या मनाच्या गाठी सैल होत जाव्यात. तिला मदिरा पिण्याचा आग्रह करावा. एकूणच वातावरणाची धुंदी वाढवत न्यावी. एकत्र गाणी गावी. अगदी मनमोकळ्या हावभावांसह किंवा नृत्यासह गायन करावे.  वाद्यवादन करावे. एकमेकांच्या कलांचे प्रदर्शन करावे व एकमेकांच्या कलागुणांची मनापासून आणि भरभरून स्तुती करावी, आस्वाद घ्यावा, आनंद घ्यावा. नायिकेचे मन प्रफुल्लित करावे. हे करत असताना नायकाने नायिकेला हलकेसे स्पर्श, तिच्या वस्त्रांशी चाळवाचाळव, तिच्या उरोजांना आणि नितंबांना ओझरते, निसटते, झाले न झालेसे स्पर्श करत रहावेत.

वातावरणाची नशा गडद होऊ लागली की यजमानाने आप्तेष्टांना आणि दोस्तांना पुष्पगुच्छ, भेटवस्तू, विडे आणि अत्तरे देऊन निरोप द्यावा.

आप्तेष्ट आणि मित्र परिवार आपआपल्या कामाला निघून गेल्यावर नायक आणि नायिकेने कामक्रीडॆला सुरुवात करावी. कामक्रीडेच्या विविध पद्धती या आधीच्या प्रकरणांमध्ये वर्णन केलेलेल्या आहेतच. पण मैथुन आणि संभोगाच्या आधी चुंबन आलिंगनादी कामक्रीडा, आणि कामक्रीडांच्याही आधी सुयोग्य अशी वातावरण निर्मिती आवश्यक असते.

संभोगाच्या समाप्तीनंतर स्त्री व पुरुषाने एकमेकांकडे न पहाता, वेगवेगळे, स्नानगृहात जावे. सर्वांग सचैल स्नान करून व स्वच्छ वस्त्रे परिधान करून बाहेर यावे. नंतर जवळजवळ बसून तांबुलसेवन करावे. नायकाने नायिकेच्या शरीराला स्वहस्ते चंदनाचे तेल चोळावे.  इतर सुगंधित अत्तरेही लावून हलके मर्दन करावे. नंतर कुजबुजत्या स्वरात तिच्याशी काही छानछान गोड गोड बोलावे. तिचे मन रिझवावे. आपल्या डाव्या हाताने तिला कवेत घॆऊन उजव्या हाताने तिला पेय पाजावे. अगदी पाणी असले तरी चालेल. पण जलपात्र स्वहस्ते धरावे.

यानंतर आपापल्या आवडीनुसार मिष्टान्नसेवन करावे, रसपान करावे. फ़ळांचे रस, नारळपाणी, ताडफ़ळाचा रस, नीरा, खजूराचा रस, सूप , लिंबूपाणी, मोसंबीचा रस,  थोडक्यात शुद्ध, साध्या व सात्विक अशा सुधारसांचे सेवन करावे. नंतर प्रेमिकांनी उत्तररात्री घराच्या गच्चीत जावे. शीतल चांद्रप्रकाशात नहाणाऱ्या अद्भूत सृष्टीच्या साक्षीने प्रेमाच्या गुलुगुलू गोष्टी कराव्यात. प्रियकराने प्रेयसीला आपल्या कवेत घेऊन चंद्रकोर दाखवावी, सप्तर्षी दाखवावे, ध्रुव तारा दाखवावा आणि अशा शुभतारकांच्या दर्शनानंतर पहाटेची चाहूल देणाऱ्या शुक्रताऱ्याचे दर्शन घडवावे. सुखमैथुनाचा अंत असा सुखद आणि चिरकाल स्मरणीय तसेच पुन्हा पुन्हा हवाहवासा वाटेल असा करावा.

अभिलाषेच्या अनुसार रतिक्रियांचे प्रकार खालीलप्रमाणे असतात

रागवत : प्रेमातुर रतिक्रिया

आहार्य : आशंकित रतिक्रिया

कृत्रिम : देहभोगाच्या ओढीने केलीली रतिक्रिया

व्यवहित : दुविधेने केलेली रतिक्रिया

पोटारत : देहभोगापोटी किन्नर, दासी किंवा निम्नवर्गीय स्त्रीशी केलेली रतिक्रिया

खलरत : जेव्हा एक पुरुष समज नसलेल्या मुलीला किंवा स्त्री एखाद्या नासमझ मुलाशी रत करते.

अयंत्रितरत : अनेक वेळा मैथुन करणारी जोडपी यंत्रवत करतात तसे मैथुन

रागवत मैथुन : आधीपासून आकंठ प्रेमात पडलेले युगुल जेव्हा प्रथमच भेटते तेव्हा; प्रथमदर्शनी प्रेमात पडलेले तरूण तरुणी; एखाद्या कलहामुळे खूप दीर्घ काळ एकमेकांपसून दूर राहिलेले प्रेमिक; परदेशी गेलेला प्रेमिक परत आल्यानंतरचे प्रेयसीबरोबरचे मीलन. उन्हाने तापलेल्या जमिनीसारखे तापलेले देह जेव्हा पहिल्या पावसाचा अनुभव घेतात तेव्हा त्यांच्या आकर्षणाला पारावार नसतो, नियम नसतात, अडथळ्यांची बाधा नसते. अशा युगलांमधली तीव्रतम ओढ ज्या मैथुनात असते त्याला रागवत मैथुन असे नामकरण केले आहे.

आहार्य मैथुन : जेव्हा स्त्री आणि पुरुष एकत्र तर येतात, पण त्यांना अजून एकमेकांचे मन पूर्णंतः समजलेले नसते. मन आशंकित असते. मन तळ्यात मळ्यात असतं. पाऊल टाकायला धीर होत नसतो. आणि सोडलं तर पळतं धरलं तर चावतं अशी अवस्था असते. अशावेळी थरथरत्या मनाने केलेला स्पर्श, नजरभेट, श्वासोछ्वास, आणि शब्द सुद्धा असाधारण सुख देते. अशा अवस्थेला आहार्य मैथुन म्हटले जाते.

कृत्रिम रतिक्रिडा : एकमेकांच्या प्रेमात नसलेले (किंवा एकमेकांशी विवाहित नसलेले) पण काही कारणांनी एकत्र आलेले स्त्रीपुरुष जेव्हा सर्व चौसष्ट आसनांनी युक्त अशी रतिक्रिया करतात व एकमेकांना सुख देतात तेव्हा ती कृत्रिम रतिक्रिया असते.

व्यवहित रतिक्रिया : नायक नायिका शरीराने एकत्र तर येतात. पण नायकाच्या मनात कोणी दुसरीच सुंदरी असते आणि नायिकेच्या बंद डोळ्यांत स्वप्न असते दुसऱ्याच मर्दाचे. नायक सर्वच्यासर्व चौसष्ट कामक्रीडा तर करतो आणि नायिकेला सुखाच्या शिखरावरही पोहोचवतो. नायिकाही सर्व रंगांत त्याची साथ देते. पण ती फुलत असते दुसऱ्याच कुणाच्या तरी सुखश्वासांनी. शरीरांनी एकमेकांत गुंतलेल्या या नायक नायिकेची मने मात्र दुसरीकडेच गुरफ़टलेली असतात. याला म्हणावी व्यवहित रतिक्रिया.

पोटारत संभोग : जेव्हा एखादा पुरुष पैशाच्या किंवा पदाच्या बळावर पाणीवाल्या किंवा इतर दासीशी संभोग करतो तेव्हा तो पोटारत संभोग असतो. यात एकमेकांना रिझवण्यासाठी आणि सुखशिखरे चढण्यासाठी केलेली आसने किंवा चुंबने, आलिंगनेही नसतात. केवळ झटपट संभोगक्रिया.

खलरत : जेव्हा एखादी शहरी कुलटा एखाद्या अज्ञानी गावंढळ मुलाला फ़सवून त्याच्याशी रत होते किंवा एखादा बाहेरख्याली पुरुष एखाद्या नासमझ गांवंढळ मुलीला फ़सवून तिच्याशी रत होतो त्याला खलरत होणे म्हणतात.



अयंत्ररत : जेव्हा खूप काळ एकत्र राहिलेली जोडपी साऱ्या रतीक्रिया सवयीने एकमेकांची मने ओळखून करतात त्याला अयंत्ररत म्हणतात. यात शरीराहून मन अधिक जवळ आलेले असते आणि सुखापेक्षा त्यागाला अधिक महत्व असते.


© Harshaj Patkar

**प्रेमकलह :**

आता आपण प्रेमकलहांबद्द्दल जाणून घेऊया. प्रेमकलहांना युगुलजीवनात तितकेच महत्त्व आहे जितके चटणी, लोणच्याला जीवनात. तो होणार हे गृहित धरावेच. पण भाताइतके लोणचे होणार नाही याची काळजी घ्यावी.

प्रेमकलहात सर्वात वरचा क्रमांक आहे सवतीमत्सर. पतीच्या तोंडी चुकून एखाद्या परस्त्रीचे नांव येणे, तिचे गुणगान होणे, तिच्याकडे पहाणे, भेटणे तिची वस्तू पतीकडे सापडणे इत्यादी कारणांनी हा सुरू होतो.

जेव्हा एखाद्या स्त्रीला आपल्या पतीचे किंवा प्रियकराचे इतर एखाद्या स्त्रीबरोबर संबंध किंवा ओळख असल्याचे कळते तेव्हा तिचा सवती मत्सर जागा होतो. अशा वेळी नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणून ती जोरदार भांडण करते, कधी मारतेही, स्वतःचे केस फ़िस्कारते, शय्येवरून खाली झोकून देते, माळलेली फ़ुले किंवा दागिने , बांगड्या आदी भिरकावून देते आणि जमिनीवर लोळण घॆऊन आपला संताप जाहीर करते.

अशा वेळी प्रियकराने तिला चुचकारून समजावून सर्वप्रथम मंचकावर आणून बसवावे. पण तिने त्याच्या समजावणूकीला अजिबात बधू नये. त्याच्या बोलण्याला उत्तर देऊ नये. आणि तो तिला उभं करण्यासाठी वाकला की त्याचे केस मुठीत धरून त्यालाच जमिनीवर लोळवावे. आणि त्याच्या हातावर किंवा डोक्यात किंवा ढुंगणावर दोनचार लाथा हाणाव्यात. त्याला जेरीला आणल्यावर तिने दरवाजाकडे जावे.  दरवाजाशी बैठक मारून तोंडाला येईल ते बोलत सुटावे आणि रडून गोंधळ

करावा. मात्र दत्तकाची सूचना आहे की तिने दरवाजा उघडून बाहेर मात्र जाऊ नये कारण मग तिच्यावर दोष यायला सुरुवात होईल.

असा तिचा गोंधळ चालू असताना प्रियकराने धीर न सोडता आपले समजावणीचे तुणतुणे चालूच ठेवावे. जितके जमेल तितके समजावावे. अखेर त्याच्या समजावणुकीचा कळस झाला आणि आता त्याचा संयम सुटणार असे दिसायला लागले की प्रेयसीने अधिक ताणून न धरता त्याच्याकडून बरेचसे कसमे वादे घ्यावेत. हव्या त्या मागण्या मान्य करून घ्याव्यात. आणि मग त्याला शय्यामंचकावर नेऊन स्वतःची तृप्ती करून घ्यावी व अशा रितीने तोंडाला तोंड देऊन सुरू केलेले भांडण तोंडाला तोंड देऊन गोडी गुलाबीने मिटवावे.

जर हे भांडण समोरासमोर होत नसेल तर काय होते. जर आपल्या प्रियकराच्या मैत्रिणीबद्दल प्रेयसीला आपल्या घरी असतानाच कळले तर तिने तडक त्याच्याकडे जावे व त्याला सुनवावे व वरील सर्व नाटक घडवून आणावे. मात्र अशा स्त्रीच्या बाबतीत पुरुषाने जास्त समजावणीचा प्रयत्न न करता ते काम विदूषक, पीठमर्द आदींचा दूत म्हणून वापर करावा व तिला समजावावे.




ज्या पुरुषाला किंवा स्त्रीला चौसष्ट कलांत प्राविण्य असते तिला विद्यांमध्ये पारंगत असणाऱ्या विद्वानांहून अधिक सफ़लता मिळते. कारण विद्येचा प्रभाव जरी इतरांच्या विचारांवर पडला तरी चौसष्ट कलांनी हृदय जिंकता येते. आणि ज्याला इतरांच्या हृदयावर राज्य करता येते त्याला सामाजिक आणि कौटुंबिक बाबतींत जास्त साफ़ल्य मिळते. ज्याला चौसष्ट कलांत चांगली गती आहे त्याला सुजनांकडून तर मान मिळतोच पण वेश्या, विद्वान आणि खलनायकांकडूनही मान मिळतो. स्त्रिया अशा कलाकारांना गुरू मानतात. त्यांची स्वतःची पत्नी तर त्यांच्या प्रेमाच्या बंधनात कायम असतेच पण इतरांच्या पत्नींकडूनही त्यांना आदराची वागणूक मिळते. चौसष्ट कलांत प्रवीण स्त्रियांनाही इतरांकडून वंदनीय मानले जाते.

om

या पुढील भागांत

विवाह विधी व विवाहांचे प्रकार

तरुण मुलीला वश करण्याचे व विश्वासात घेण्याचे मार्ग

पुरुषाला भुलविण्याचे मार्ग

स्त्री किंवा पुरुषाचे मन ओळखण्याचे मार्ग

स्त्री किंवा पुरुषाने आपले मन शब्द न वापरता व्यक्त कसे करावेत

राजघराण्यातील पुरुष व अधिकाऱ्यांचे वर्तन

राजस्त्रियांचे वर्तन

अनेक स्त्रिया असलेल्या पतीच्या ज्येष्ठ पत्नीने कसे वागावे

अनेक स्त्रिया असलेल्या पतीला चतुर स्त्री कसे बांधून ठेवते

विवाहबाह्य संबंध

वेश्यावृत्ती, गणिका, नायिका इत्यादी

प्रणयशक्तीवर्धक औषधे, लिंग वर्धन इत्यादी

असे अनेक विषय लवकरच चर्चेला येणार आहेत.

हे पुस्तक उत्तरोत्तर अधिक सुंदर आणि पूर्ण होत जाईल.

त्यासाठी नियमितपणे वेबसाईटवरून हे पुस्तक डाऊनलोड करत रहा.

हे भाग विनामूल्य मिळवण्यासाठी www.esahity.com या वेबपत्त्यावर भेट द्या.

हे पुस्तक लंपट किंवा कामुक लोकांच्या समाधानासाठी नसून विचारी लोकांना अधिक माहिती पुरवण्यासाठी आहे. त्यामुळे हे पुस्तक तुम्ही आपल्या ओळखीच्या खास मित्रमैत्रिणींना सहजासहजी फ़ॉरवर्ड करू शकता. त्यात संकोच बाळगण्यासारखं काही नाही.

आणि जर तुम्हाला तसं कोणीच जवळचं खास नसेल तर…

ओह…

ईश्वरच तुमचं रक्षण करो.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. नव्याने लेखन करणाऱ्यांना एक मोठा वाचकवर्ग सहजासहजी उपलब्ध व्हावा ही आमची इच्छा. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. वर्षाला चाळीस लाख डाऊनलोड्स जगभरातून होतात.

पण आम्ही अजिबात समाधानी नाही. जगभरातल्या १२ कोटी मराठी लोकांपैकी किमान सहा कोटी तरी वाचक व्हायला हवेत. एक मोठ्ठी चळवळ उभी रहायला हवी. चांगल्या लेखकांना कोटीभर वाचक मिळायला हवेत.

हे अशक्य नाही. आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!